# वर्णमुद्रा

इ–जर्नल
(मुद्रितप्रत, केवळ
खासगी वितरणासाठी)

वर्णमुद्रा

अंक एकोणिसावा / सप्टेंबर–ऑक्टोबर २०२४

किंमत : १५०/– देणगीमूल्य (मुद्रितप्रतीसाठी)



# अनुक्रमणिका


। मुखपृष्ठ ।
अनिरुद्ध आचार्य
। सुरुवातीचे काही शब्द ।
मनोज सुरेंद्र पाठक
। कविता ।
राहुल पुंगलिया, रंजना बाजी, पांडुरंग सुतार
। स्मरणसूक्त ।
तांबेशास्त्री यांचे 'संसारदर्पण'
। सहोदरांचा शोध ।
फ्लोरियन झेल्लर : समीर मोने
। कथा ।
पुलावरचा म्हातारा : अर्नेस्ट हेमिंग्वे
। लेख/ललित लेख/टिपण/मुलाखत ।
डॉ. नंदू मुलमुले यांची मुलाखत : अथर्व देशमुख
व्ही. एस. नायपॉल यांची मुलाखत : अनुवाद : वर्णमुद्रा
तत्त्वभान दर्शन : लेखांक ३ – सुरेंद्र दरेकर
। गंभीर किंवा गमतीदार ।
पी. विठ्ठल यांची फेसबुक पोस्ट
। रेखाटने ।
जितेंद्र साळुंखे
। छायाचित्रे/प्रतिमा ।
आंतरजालावरून साभार



। संपादनसहाय्य ।
नंदिनी देशमुख, शरद बिन्नोर, अभिषेक वाघमारे
। निर्मितिसहाय्य ।
उमा नाबर, महेश गवाणकर, भाग्यश्री बनहट्टी

# सुरुवातीचे काही शब्द

ह्या अंकात बरंच काही आहे. बरंच काही असावं, असा प्रयत्न मी नेहमीच करतही आलो आहे. पुढचा अंक काय आणि कसा असेल, ते मला स्वतःलासुद्धा माहिती नसतं; जसे की, ह्या पुढील अंक नोव्हेंबर-डिसेंबर हा तात्पुरता शेवटचा अंक असेल का हे मला सांगता येणार नाही. तरी तो करून काही दिवस थांबावे असे मला वाटते.

मूलतः किती लोकांनी अंक घेतला/वाचला/मागवला म्हणजे तो सुरू ठेवायचा की बंद करायचा हे ठरवता येते, ह्याचा काही निकष नाही. व्यक्तिशः मी तो मला स्वतःला वाचायला काहीतरी हवे, तोवर सुरू ठेवू शकतो. वर्णमुद्राच्या पुस्तकांसाठीसुद्धा हाच निकष आहे. असो. ते पुढे बघू.

ह्या अंकात समकाळातील काही चांगल्या कविता मिळवता आल्या ह्याचे समाधान आहे. (दरवेळी हाच मोठा प्रश्न असतो, पण मित्र-मैत्रिणी-सुहृद त्यातून मार्ग काढून देतात.) रंजना बाजी ह्यांच्या कविता 'बाबा'मुळे मिळवता आल्या. बाबा म्हणजे आपला सतीश तांबे. त्याला म्हणालो की, ''कथा पाठव'' तर तो म्हणाला की, ''त्याऐवजी माझ्या आजोबांचे 'संसारदर्पण' तू छाप''; मन्या ओक हे त्यावेळी माझ्याकडून अंकात छापतो म्हणून घेऊन गेला होता, तो अंक नंतर निघालाच नाही. (बहुतेक तांबेशास्त्री यांचे 'संसारदर्पण' हे पुस्तकच मी पुनर्प्रकाशित करेन.)

अंकाचे सेटिंग सुरू असताना अगदी शेवटी मित्र पांडुरंग सुतार ह्याने एक दीर्घ कविता पाठवली आणि सौजन्यपूर्ण विनंती केली की, ''वाचून छापावीशी वाटली तर बघ.'' ही कविता म्हणजे एखाद्या आत्मचरित्रपर कादंबरीचा ऐवज आहे. पांडुरंगाने तो कवितेतून मांडून 'मोगॅम्बो'ला खूश केले आहे. भरीस भर म्हणजे ह्या कवितेसाठी जितेंद्र साळुंखे यांनी अतिशय आत्मीयतेने आणि सर्जकतेने आपली रेखाटने तयार करून दिली आहेत, ज्यामुळे अंकाची मूल्य वृद्धी झाली आहे.

अंकातील दोन खास मुलाखती तुम्हाला आनंदी करतील ह्याची खात्री आहे. हा आनंद वाढवत नेण्याचा प्रयत्न जरूर करीन, परंतु तो विचार डिसेंबरअखेर.

**मनोज सुरेंद्र पाठक**



## राहुल पुंगलिया

### पूर्वीचे लोक

पूर्वीचे लोक होते आपल्यासारखेच.
पण त्यांची जीवने काळी-पांढरी होती.
आणि आपली आहेत रंगीनसंगीन.

पूर्वीचे लोक जी भाषा वापरायचे
ती अगदी अशीच भाषा होती, हीच.
जी आता इथे शेजारी उभी आहे,
वापरले जायची वाट बघत.
त्यांचे अर्थही तेच होते
जे पोचतात,
प्रवास करावे लागतात त्यांना.
फक्त त्यांचे अन्वयार्थ निराळे होते,
जे कळायचे नाहीत आपल्याला.

पूर्वीचे लोक असेच घालवायचे दिवस
बोटे मोडत, जांभया देत,
उगीच वर बघत.
पूर्वीचे लोक तुमान घालायचे
आपणही घालतो तसेच कपडे
आणि बाहेर पडतो.

पूर्वीचे लोक कंटाळायचे.
आपण कंटाळे टाळतो.
कर्जावर व्याज भरून
मेटाकुटीला आलेले पूर्वीचे लोक
शेवटचा हप्ता भरला की आनंदात नाचायचे.

ते चालता चालता मध्येच
मटकन खाली बसायचे दमून.
त्यांच्या चारपैकी तीन विहिरींना
पाणी लागायचे.
आणि त्यांच्या गादीखाली
थोडे पैसे ठेवलेले असायचे.
रिकामा हात फिरवल्यावर कळायचे की
पैसे झालेत गायब.
आजही तसेच होते.

पूर्वीचे लोक संतूर वाजवायचे
गाणे गायचे.
आपणही गातो.
पण गळ्यातनं
भलतेच काही निघते.
पावसाळ्यात आपण गात नाही
म्हणून मोर केका फोडतात..

## रंजना बाजी



### १

माझी शेवटची तीन मुलं
मेली पाहिजेत...
नकोत मला ती...

पोटी बारा मुलं असलेली
आमची आई सतत म्हणायची गं...

वृद्ध झालेली आत्या
उघडत होती जुन्या आठवणी
करकरीत संध्याकाळी...

कळत्या न कळत्या
वयातल्या आम्ही,
कळत नसे, का नको
आपण, आपल्याच आईला ...

घरातला बारदाना,
बारा मुलं, पाहुणे,
येणारे जाणारे,
आणि
दुनियाभरची गरिबी...

सदैव कामात बुडलेली आई,
मोठ्यांची सेवा,
लहानांना मदत,
आल्यागेल्यांचं स्वागत...

घरात कधी ज्वारी नसे
कधी नसत डाळीडुळी,
भागवायची ती सगळं
चतकोर भाकरी
पाण्यासोबत गिळत.

तिच्या हातात नव्हतं
मुलं होणं, न होणं...
तिला फक्त माहीत
जन्मलेल्याचं पोट भरणं...

नकोशा अशा आम्ही बहिणी
वाढत राहिलो
रानातल्या बाभळीसारख्या
बिनापोषणाच्या...

किरकोळ रागाच्या भरात
विहिरीजवळ गेलेली धाकटी
परतलीच नाही एक दिवस...

त्यावेळचा आईचा आभाळ भेदणारा
आक्रोश,
शेवटपर्यंत भळभळणारी
तिची ती जखम,
पुढच्या प्रत्येक मंगल प्रसंगी
धाकटीच्या आठवणींनी डोळ्यात आलेलं
महामूर पाणी...
म्हातारपणी तिचा जीव जाताना
तोंडात असलेलं नावही धाकटीचंच...

हे सगळं आता दिसतंय समोर
आणि आता समजतंय...

मुलं मरू देत म्हणताना
किती मरणं मरत होती ती...

उभी राहिली होती ती
जगण्याच्या कोणत्या
टकमक टोकावर...

## २
## निरोप

टाचा वर करून बघितलं
तरी पैलतीर दिसायच्या
काळात पोचलेले आपण..

शांतवत आलेलं असतं पाणी,
राग लोभ त्रागा दुस्वास
तिरस्कार दुराग्रह
सगळंच
खाली बसत आलेलं
आणि वर हळूहळू निवळशंख..

आसक्तीमागं दडलेलं एकटेपण
तिरस्कारामागची असहाय्यता
स्वार्थामागचं आंधळं प्रेम
रागात लपलेली असुरक्षितता

होत जाते सगळ्याची
उकल समज उमज
आणि होतो स्वीकार,
विनातक्रार.

क्षमा, समोरच्याला आणि स्वतःलाही..

ना कसले बंध ना कसले विकार..
विनासक्त समाधानाचा निरोप..
एवढंच उरावं शेवटी..

## ३
## नेटका संसार...

गोष्टी ताणायच्या किती
आणि
नातं तुटायच्या आत
कुठं सोडून द्यायच्या
याचा वेळेत अंदाज करणं

प्रवास अपरिहार्य असताना....
समांतर रेषेत
चालणाऱ्याचीसुद्धा
तशी सोबत असतेच..
मनाची अशीसुद्धा
समजूत घालणं,
अंतर राखून
अलिप्तपणे निरंतर
शेजारी चालत राहणं

संवाद कुठं
विसंवादी होत जातो
हे सवयीनं उमजून,
आधीच ते दार लोटून घेणं

अवघड अस्वस्थ
उत्तरं असणाऱ्या
प्रश्नांना
मौनातून प्रतिसाद देणं

नात्यांच्या, अपेक्षांच्या
जंजाळातही
स्वतःला अलगद बाजूला
कमलदलासारखं
राखून असणं

हळव्या, कातर क्षणी
समजूतदार मिठीसाठी
मनाचा टाहो...
आपल्याच हातांनी
आपले डोळे पुसून,
हसून साजरं करणं..

या सगळ्या गोष्टी
करता करता
पिकत जाते
मुरत जाते
ती ......

स्वतःला मुडपून वाकवून,
जगत राहते नेटानं
चिवटपणे..

आणि लोक म्हणतात,
नेटका केला हो,
हिनं संसार..


वर्णमुद्राचा नवा कथासंग्रह

आधार




किंमत ₹ ६५०/-
सवलतीत ₹ ५२५/- ला पोस्टेजसह
घरपोच मिळेल.
संपर्क : वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स,
शेगाव, जिल्हा बुलढाणा
९९२३७२४५५०
नमूद केलेला मोबाईल नंबर ९९२३७२४५५०
हाच व्हॉटसअॅप नंबर आहे, पत्ता त्यावरच
कळवता येईल.
अकाउंट डिटेल्स :


VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK

किंवा



वर्णमुद्राचा नवा कवितासंग्रह

समाधानांचे निराकरण




किंमत ₹ ६५०/-
सवलतीत ₹ ५२५/- ला पोस्टेजसह
घरपोच मिळेल.
संपर्क : वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स,
शेगाव, जिल्हा बुलढाणा
९९२३७२४५५०
नमूद केलेला मोबाईल नंबर ९९२३७२४५५०
हाच व्हॉटसअॅप नंबर आहे, पत्ता त्यावरच
कळवता येईल.
अकाउंट डिटेल्स :

VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK

किंवा




**वर्णमुद्राचा नवा लेखसंग्रह**

# वसंत आबाजी डहाके : समग्र आकलन

## संपादन

## मंगेश नारायणराव काळे




**किंमत ₹ १०००/-**
**प्रकाशनपूर्व सवलतीत ₹ ७५०/**

ज्येष्ठ कवी वसंत आबाजी डहाके यांच्या कवितेचा प्रवास अर्ध्या शतकाहून जास्त झालेला आहे... त्यांच्या कवितेवर आजवर अनेक अभ्यासकांनी लिहिले आहे...त्यांच्यावर काही विशेषांकही प्रसिद्ध झाले आहेत. जवळ जवळ हजार पृष्ठांचा मजकूर गोळा झालेला आहे. यातून सुमारे पाचशे तीस पृष्ठांचा मजकूर या संपादनाच्या पहिल्या खंडात आला आहे.

नव्वदोत्तर पिढीतील महत्त्वाचे कवी मंगेश नारायणराव काळे यांची दीर्घ प्रस्तावना असलेला आणि त्यांनी संपादित केलेला हा ग्रंथ डहाके यांच्या कवितेचे महत्त्व अधोरेखित करणारा, तसेच डहाकेंच्या एकूणच वाटचालीविषयी सांगोपांग विचार मांडणारा आहे.

पहिल्या खंडात डहाक्यांवर लेख देणाऱ्या सन्मान्य अभ्यासकांची नावे ही अशी आहेत –

विजया राजाध्यक्ष/वसंत पाटणकर/आशा सावदेकर/प्रभाकर बागले/विलास सारंग/केशव मेश्राम/अविनाश सप्रे/विद्यागौरी टिळक/कविता मुरुमकर/रणधीर शिंदे/महेंद्र कदम/इंद्रजित भालेराव/रवींद्र इंगळे-चावरेकर/एकनाथ पगार/दिलीप घोंडगे/नीतीन रिंढे/प्रवीण बांदेकर/राही डहाके आणि प्रभा गणोरकर

कवी, अभ्यासकांना हा महत्त्वाचा दस्तावेज नक्कीच पाथेय ठरेल यात शंका नाही.

---

**संपर्क : वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स,**
**शेगाव, जिल्हा बुलढाणा**
**९९२३७२४५५०**
**नमूद केलेला मोबाईल नंबर ९९२३७२४५५० हाच व्हॉटसअ‍ॅप नंबर आहे, पत्ता त्यावरच कळवता येईल.**
**अकाउंट डिटेल्स :**

VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK

**किंवा**

मुख्य वितरक

**वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स, शेगाव,**
**मोबाईल नंबर : ९९२३७२४५५०**

**वर्णमुद्राचे उप वितरक**
**पुस्तकवाला ॲण्ड कंपनी, पुणे मोबाईल नंबर : ८६२४९७७०२९**

## पांडुरंग सुतार



### थोड्या आयुष्याच्या गोष्टी
### १

तुम्हाला आणि मला आपल्यातल्या प्रत्येकालाच
काहीतरी जास्तच हवे असते
सुख तर कितीतरी जास्त हवे असते
आयुष्यही जास्त हवे असते
आनंदही जास्त, जास्तच हवा असतो
प्रेमही जास्तच हवे असते
दुःख जास्त नको असते आपल्याला,
थोडेदेखील नको असते
आपले जास्त आयुष्य कुणाकुणाचा राग करण्यात,
द्वेष करण्यात,
कुणाकुणाला दुखवण्यात,
नको असलेल्या गोष्टी करण्यात निघून जाते
आपल्याला कळतदेखील नाही...

हवा वाहते शीतल, आपल्याला सुखकारक वाटते,
थोडी जोरात वाहू लागली की,
केस उडू लागतात आपले, कपडेही उडतात
आपण आनंदी होतो, आनंदाला पारावार राहत नाही आपल्या,

नंतर वाऱ्याचा जोर वाढतो,
घों घों आवाज येऊ लागला की, आपण जरा घाबरतो,
वारा नंतर गिरक्या घेऊ लागतो, भोवरे तयार होतात
अखेरीस प्रचंड जोराचा वारा वाहू लागतो
रौद्ररूप धारण करतो,
वादळ निर्माण होते, झाडे कोसळतात,
घरे, झोपड्या कोसळतात,
जे जे वादळाच्या परिघात येते, ते भोवऱ्यात सापडते
आपण वादळात सापडतो
गिरक्या घेत, भोवळत जाऊन पडतो कुठेतरी
जास्तीत जास्तच्या जाळ्यात आपण असे अलगद अडकून पडतो



## २

काळाच्या अनंत असण्याच्या तुलनेत आपले आयुष्य
किती थोडे असते,
अगदी नगण्य.
पण या थोड्या आयुष्यात प्रेमही असावे थोडे
गवतावर ओथंबल्या दवबिंदूएवढे का असेना
फूल उमलण्याआधी असणाऱ्या प्राजक्ताच्या कळीएवढेदेखील का असेना
किंवा चिमणीच्या चोचीत मावणाऱ्या दाण्याएवढे
तेवढ्या थोड्या प्रेमानेही आपल्याला दुःख कळू लागते
दुःखाची ओळख झाली की आयुष्य टवटवीत होऊन राहते
आपल्या आयुष्यावर चढलेली नको असलेली पुटे, खलप्या निघून जातात
पाऊस-सरी जशा झाडांच्या पानांवरची सारी धूळ, जळमटे धुऊन टाकतात
नंतर झाडे टवटवीत सुंदर दिसू लागतात, हिरवीगार तसे नंतर आपणही होऊन राहतो
मिळालेल्या थोड्या आयुष्याचा एक एक क्षण भोगू लागतो
दुःख सोसू लागतो आपसूक
कुणाची सोबत नको असते आपल्याला दुःख सोसताना
पण आपल्या दुःखावर कुणी फुंकर घातली की
कुणाच्याही कवेत मावणार नाही अशी भलीमोठी परतफेड आपण करून टाकतो

## ३


कुणी ऐकले न ऐकले तरी आपण गाणे गातो थोड्या प्रेमाखातर
जीव जडवून घेतो सुरांवर
कुणी वाचली न वाचली तरी कविता लिहितो थोड्या प्रेमाखातर
सुख-दुःखाचा धागा गुंफून बुद्ध होऊ पाहतो थोड्या प्रेमाखातर
चिमणीएवढा आपला जीव हिमालयाला साद घालू पाहतो
त्याला जगातल्या सर्वात उंच शिखराची ओढ लागते
समुद्राच्या उचंबळत्या लाटा रोखू पाहतो
रौरवत्या वादळाला थोपवून धरू पाहतो थोड्या प्रेमाच्या बदल्यात…
थोडे प्रेम मिळाले तरी आपण सर्जनशील होतो
आपल्याला मैत्री कळते आणि मैत्रीची भाषा
माणूस कळतो आणि माणसाचे सुख-दुःख
गवताचा स्पर्श कळतो अन् फुलांचा गंध
पाखराचे गाणे ऐकू येते नि प्रवाहाचा खळाळ नाद
समुद्राची गाज ऐकू येते नि वाऱ्याची सळसळ
थोड्या आयुष्यात आपल्याला कितीतरी अधिक मिळत राहते

## ४

थोड्या आयुष्यात दादांचे बोट धरून चालायला जसे मी शिकलो,
तसेच सुतारकामही शिकलो
ते मेटावर काम करत असताना तिथे बसून मी पाढे म्हणत असे
निंबावर पोपटांचा किलकिलाट सुरू असे
चार वर्षांचा झालो तरी मी आईच्या छातीला बिलगून
राहत असे वानराच्या पिलासारखा
ती करवादत असे, चिडत असे,
पण अखेरीस माझी भूक भागवत असे
भल्या पहाटे उठून ती जात्यावर दळत बसे
डोक्यावर पांघरूण ओढून मी जात्याची घरघर ऐकत बसे
मी मोठा झालो थोडा अन् तिच्यासोबत जाऊ लागलो शेतात
उन्हाचे ती निंदत असे, मी गवत बांधावर फेकत असे
मला असे काम करताना पाहून
तिच्या डोळ्यात करुणा निर्माण झाली
आणि तिचा खरबरीत हात
माझ्या डोक्यावर फिरल्यानंतर ती मला जाणता आली
आता ती निघून गेली तरी ती करुणा सतत माझ्यावर दृष्टी ठेवून असते

## ५

आई कोंबड्यांना दाणे टाकत असे अंगणात
कॉक कॉक करत, पंख फडफडवत कोंबड्या धावत येत
दाण्यांवर तुटून पडत
तिचे पाहून मीही कोंबड्यांना दाणे टाकू लागलो
आईमुळे माझी भूक मला समजली तशी कोंबड्यांची भूकही मला आईमुळे समजली,
नंतर तर अनेक भुका मला जाणता आल्या
कोंबडीच्या पिलाला राळ्याचे दाणे मी भरवू शकलो
ते पिलू मोठे झाले आणि मान उंचावून,
तुरा-कलगी हलवत माझ्यासाठी बांग देऊ लागले



## ६

मांडोळी फिरवत जात असे मी उन्हात मित्रासोबत
आमचे पाय भाजत असत आणि घाम येत असे आम्हाला
तेव्हा पांदीतल्या निंबाखाली सावलीत आम्ही थांबत असू
त्या ऊनवेळी झुडपातल्या खोप्यात पारवा दडून असे अन् झाडाझुडपांसाठी गाणे गात असे
सृष्टीसाठी गायिलेले ते गीत ऐकून
आम्ही आमचा थकवा विसरू शकलो.
सुख-दुःख आम्ही तेव्हा एकत्रितपणे जाणले थोड्या आयुष्यात
मित्र निघून गेला नंतर भोपाळला पोटापाण्यासाठी
मीही स्थिरावलो नोकरीसाठी तालुक्याच्या ठिकाणी शहरात,
आता भेट होत नाही आमची,
वर्षानुवर्षेदेखील नाही,
पण त्याच्या सोबत मांडोळी फिरवली ते दिवस
तर सतत सोबत असतातच ना..




## ७

थोड्या आयुष्यात मला उशिरा का असेना
ऑडेनची ओळख झाली
जरी त्याच्या कविता मला अवघड वाटल्या
उंच डोंगर अनवाणी चढून जाण्यासारख्या
रॉबर्ट फ्रॉस्टही मला महाविद्यालयात गेल्यावर माहिती झाला
आणि माझ्या कवितात तोही असातसा येऊन बसला

हार्डीची मेअर ऑफ कॅस्टरब्रिज मी वाचली तेव्हा
मला एक मुलगी आवडली होती,
मेयर ऑफ द कॅस्टरब्रिजमधल्या सुसानहून ती जरा
लहान होती पोरसवदा पण सुसान नंतर मात्र
तिच्याहून अधिक पोरसवदा झाली,
न्युसन या अमेरिकन खलाश्याने तिला विकत घेतल्यावर,
ती त्याच्यासोबत समुद्र ओलांडून अमेरिकेला निघून गेल्यावर,
लहानग्या एलिझाबेथ जेनचा मृत्यू झाल्यानंतर तर अधिकच
मी सुसानवर अधिक प्रेम करू लागलो होतो नंतर,
कधीकधी माझे डोळे ओले होत असत, तिचा लिलाव सुरू असतानाचे वाचताना
मी ते ओले डोळे तसेच ठेवून पुढे वाचत असे.

फॉकनरची 'ॲज आय ले डाईंग' जेव्हा मी वाचली,
तेव्हा सुतारकाम माझ्या हातून सुटले होते
पण हाताला झालेला हत्यारांचा स्पर्श तसाच होता
शवपेटी करत असताना कॅशच्या हाताला होत

होता तसा,
मला मदत करावीशी वाटली कॅशला,
कादंबरीबाहेर राहून, दूरातून, त्याची तारांबळ पाहून...
मी त्याला मदत करू शकलो असतो
पण फॉकनरने मला तसे करू दिले नाही
कॅशला एकट्यानेच ते करावे लागले
मदत करू न देण्यासाठी जवळजवळ भागच पाडले मला फॉकनरने,
मला राग आला फॉकनरचा, दादांचा येत असे तसा,
पण पळून जात असे राग दूर दक्षिणेकडील डोंगराकडे नंतर,
दादांच्या सुतारकामाची ठक ठक ऐकल्यावर...
तसा फॉकनरवरचाही पळून गेला 'अॅज आय ले डाईंग' वाचल्यानंतर...




## ८

थोड्या आयुष्यात मला किशोरी अमोणकरांचे गाणे ऐकता आले
माझी बदली झाली होती जळगावला
रेल्वेने मी अपडाऊन करत असे
तेव्हा रेल्वे धडधडत जात असताना किशोरी अमोणकरचे गाणे मला ऐकू येत असे
रेल्वेच्या डब्यातल्या गर्दीत एक चिमुकली छोकरी
गाणे गात फिरत असे
खूप गोड गात असे ती छोकरी,
तिच्या गाण्यातून कधीकधी किशोरी अमोणकरच्या
गाण्याचा सूर मला ऐकू येत असे
काळीसावळी होती ती, आणि आनंदी,
तिचा फ्रॉक फाटका होता अन् केस विस्कटलेले
तिच्या आईबाबांना ठाऊक असेल का रेल्वे डब्यातून तिचे असे गात फिरणे?
तिला आईबाबा तरी असतील का?
का अनाथ असावी ती?
कुठे राहत असावी? कोण असावी ती?
तिचे डोळे काळेभोर होते, काळेभोर अन् आनंदाने चकाकत असलेले,
त्या काळ्याभोर सुंदर इवल्या डोळ्यात आनंद ठासून भरला होता,
कुणी भरला असावा आनंद तिच्या डोळ्यात?
तिच्या डोळ्यात आनंदासोबत करुणा होती, बुद्धाच्या डोळ्यांत दिसते तशी.
माझी बदली पुन्हा पाचोऱ्याला झाली,
रेल्वेने अपडाऊन करणे बंद झाले
ती गाणारी इवली छोकरी नंतर मला कधीच दिसली नाही.

रघुवीर यादवचा अभिनय पाहून मला आत्याच्या घरचे दिवस आठवले
आत्याच्या घरी धाडले होते मला सहावीत शिक्षणासाठी
त्या दिवसांत मी जंगलात जात असे आत्यासोबत
घाणेरीच्या वाळल्या काड्यांची मोळी बांधत असे
आणि डोक्यावर वाहून आणत असे
मान दुखत असे अन् उन्हात पाय हुळहुळत असत
आत्या त्या वाळल्या काड्या चुलीत जाळत असे,
भाकरी खरपूस भाजली जात असे,
मिरच्या भाजत असे धगधगणाऱ्या विस्तवावर,
तिखटजाळ ठेचा करत असे
आत्याने बनवलेला ठेचाभाकर खाऊन माझे पोट भरत असे.


आत्याच्या घरासमोरून रेल्वे जात असे धडधडत
रेल्वेच्या डब्याच्या खिडकीतून धावणारा उजेड
मी रात्री अंधारात पाहत बसे
मला तेव्हा घरची आठवण येत असे
पण नंतर मुंबईकडून दुसरी रेल्वे धडधडत येत असे उजेडाचा प्रचंड फोकस उधळत
आणि निघून जात असे धडधडत न थांबता...
घरच्या आठवणींनी दमून नंतर मी झोपी जात असे.



## ९

थोड्या आयुष्यात मला पुस्तकांची सोबत लाभली.
मला वाचता येत नव्हते तेव्हाही पुस्तके मला आवडत,
त्यातील चित्रे, ओळीत शिस्तशीर बसलेली अक्षरे आणि त्यातल्या शब्दांचे आवाज,
त्यातील चित्रे माझ्या डोळ्यांत शिरून बसत.
आणि मनात रुतून राहत,
ओळीत शिस्तशीर बसलेल्या अक्षरांचा साज
घुंगुरमाळांच्या घुंगरांसोबत नादवत राहावा वाटे
शब्दांचा तो नाद अंतःकरणात उतरे आणि तिथे ठाण मांडून बसे.
नंतर मला अक्षरे कळली, कौलारू शाळेत,
सोनू गुरुजींनी शिकवलेली,
मला गोष्टी कळू लागल्या, कविता कळू लागल्या,
दादांचे सुतारकाम सुरू असताना माझे वाचणे सुरू असे,
लाकडांसोबत, हत्यारांसोबत, दादांच्या शरीरावरून ओघळणाऱ्या घामाच्या धारांसोबत,
निंबाच्या झाडावर किलकिलाट करणाऱ्या पोपटांसोबत,
मारुतीच्या पारावर, महादेवाच्या देवळात नादणाऱ्या घंटानादासोबत,
झुळझुळ वाहणाऱ्या नाल्याच्या पाण्यासोबत...
पुस्तकेच घेऊन गेली मला कुठे कुठे,
नायडोंगरीला आत्याकडे,
तारखेड्याला बोर्डिंगमध्ये, शेंदुर्णीला झाडाझुडपांच्या दाटीत लपून बसलेल्या महाविद्यालयात..
तिथे खूप मित्र भेटले मला,
होस्टेलमध्ये राहत असू आम्ही,
जेवत असू रांगेत बसून,

‘वदनी कवळ घेता’ सरताच,
अधाशासारखे बकाबका खात असू,
विहिरीचे पाणी शेंदून ओंजळीने गटागटा पीत असू
तिथे मला भेटली अनेक पुस्तके...
त्या पुस्तकात अनेक जिवाभावाचे आप्त भेटले
अन् पुस्तकांसोबतचे माझे मैत्र अधिक दृढ झाले...
माझ्या जगण्याचे कारण झाले....




## १०

आर. के. नारायण यांच्या मालगुडी डेजमधल्या
गोष्टी मला वाचता आल्या थोड्या आयुष्यात
त्या वाचून मला विधवा केसरआजी आठवत असे,
गावातल्या धोंडू म्हाताऱ्यासोबत तिचा गांधर्व-विवाह होणार अशी अफवा पसरली होती काही दिवस,
केसरआजीच्या कानीही ती आली
तेव्हापासून ती नुसती मनोमन हसत बसे
बोलत नसे काही,
पण तिचा गांधर्व-विवाह धोंडू म्हाताऱ्यासोबत
कधीच झाला नाही
धोंडू म्हाताऱ्याला पोरसोर नव्हते
त्याची बायको कजाग होती सॉक्रेटिसच्या बायकोसारखी
त्याच्या तोंडाचे बोळके झाले होते
अन् तो चिलीम ओढत असे
लांब दांड्याची फरशी कुऱ्हाड तो कायम सोबत बाळगत असे
ताड ताड चालत असे तो माडासारखा
आयुष्यभर बकऱ्या राखत असे,
बकऱ्यांसोबत रानोमाळ फिरून त्याचे पाय फेंगडे झाले होते,
एक दिवस बकऱ्यांमागे रानात असताना तो मेला,
केसरआजी रात्रभर मिणमिण जळणाऱ्या
धुरकटलेल्या कंदिलाच्या वातीसारखी
आयुष्यभर जळत राहिली
कंदिलातले रॉकेल सरले एक दिवस
अन् वात विझून तिच्या सपरात अंधार पसरला
तेव्हा ती आमच्या घराच्या भिंतीलगतच्या
कुडाच्या सपरात राहत असे
तिने दोन बकऱ्या पाळल्या होत्या

ती मेल्यावर भुऱ्या बकरीला पावसाळ्यात दोन पिले झाली
बकरीची ती पिले उड्या मारत असताना
मी बोर्डिंगमध्ये निघून गेलो तारखेड्याच्या, माध्यमिक शिक्षणासाठी

## ११

अनेक गोष्टी आहेत भूतकाळात
इतिहास आहे, प्राचीन, अर्वाचीन,
खऱ्या खोट्या कपोलकल्पित, नीती-अनीतीच्या
सुख-दुःखाच्या, राजा-राणीच्या, देव-दानवांच्या
माणसांच्या, प्राण्यांच्या कथा आहेत,
पण त्यापलीकडे काहीतरी असावे का?
प्रेम, हो प्रेम असेल त्या पलीकडे आणि ते साऱ्यात भरून असेल थोडे थोडे
थोडे असले तरी प्रेम टिकून राहील चिरकाल
दुःख सरून जाईल, वैरही सरेल, रागलोभ सरेल
प्रेम सरणार नाही,
ते वाढतच राहील थोड्या आयुष्यात



## १२

काही गोष्टी आहेत, ओव्यांच्या, अभंगांच्या
त्या काही उडून आल्या नाहीत पाखरांसारख्या
झरल्या नाहीत ढगातून पाऊससरींसारख्या
झगझगीत उमटल्या त्या कागदावर वेदनेच्या
जळजळीत डागासारख्या
पाझरल्या जगण्याच्या चरकातून घामाच्या धारांसारख्या
कधीच मिटल्या न जाण्यासाठी
कोठून आल्या त्या?,
अंतःकरणातूनच तर झरल्या ना त्या आसवांसारख्या, ज्ञानेश्वरांच्या, तुकारामांच्या,
ज्या मी जाणू शकलो थोड्याफार थोड्या आयुष्यात अन् म्हणू शकलो सकाळी, कधी संध्याकाळी,
पसायदान ऐकू शकलो एखाद्या हिवाळ्यातल्या रात्री
कंदिलाचा पिवळा उजेड आसमंतात पसरला असताना
सारवलेल्या ओसरीत घोंगडीवर कोंडाळे करून बसलेल्या,
ज्ञानेश्वरांचे, तुकारामाचे अंतःकरण घेऊन बसलेल्या माणसांच्या मुखातून...
जणू कितीतरी तुकाराम आक्रंदत आहेत,
ओरखडे उमटत आहेत अंधारावर,
दुःखाचा सोहळा सुरू आहे
दुःख नाचते आहे थुई थुई मोरासारखे,
अश्रू ढाळते आहे डोळ्यांतून
कितीतरी ज्ञानेश्वर गाताहेत ओव्या
झांजा, टाळ वाजताहेत,
मृदंगाचा, तबल्याचा नाद घुमतो आहे
मी स्तब्ध होऊन जात असे,
असूनही नसता होऊन जात असे

## १३

मला मित्र मिळाला थोड्या आयुष्यात सावलीसारखा
मी त्याच्या स्नेहाचा सदरा अंगावर चढवला एक दिवस.
तो स्नेह अंगावर वागवत राहतो मी आयुष्यभर
कुणालाही कळत नाही की, तो स्नेह मी सतत पांघरून असतो ते
मी त्याला त्याचा सदरा परत केला,
पण स्नेह काही परत करू शकलो नाही मी त्याला
तो थोडा स्नेह पुरतो आहे मला
दिव्यातल्या तेलासारखा....
त्याने माझी झिजून गेलेली चप्पल घातली एक दिवस त्याच्या पायाला चटके बसले नाहीत
नंतर त्याने मला ती झिजलेली चप्पल परत केली
पण मी दिलेल्या चपलेमुळे त्याच्या पायाला चटके बसले नाहीत,
असे तो आता ज्याला त्याला सांगत सुटतो...

## १४

मला एक मुलगी आवडत असे
तिचे डोळे विशेषतः,
ते सदा करुणेने भरून असत
शेत ती स्वच्छ निंदत असे
आणि तिने वेचलेला कापूस स्वच्छ असे पौर्णिमेच्या चांदण्यासारखा
एका आखाजीला तिच्या गौराईसाठी मी लाकडाचे घोडे बनवून दिले
तेच घोडे तिने तिच्या स्वप्नातल्या राजकुमाराला दिले
घोड्यावर बसून स्वप्नातच ती त्याच्यासोबत क्षितिजापर्यंत रपेट मारून आली
नंतर निंबाच्या फांदीला बांधलेल्या झोक्यावर बसून माझ्यासाठी तिने गौराईचे गाणे म्हटले
लग्न होऊन ती छकड्याच्या गाडीत बसून सासरी निघून गेली
पण तिचे करुणेने भरलेले डोळे ती मला कायमचे देऊन गेली माझ्या थोड्या आयुष्यात



## १५

मला लाकडाला रंधा नीट मारता येत नसे,
तासताही येत नसे लाकूड नीट,
करवत लाकडात तिरकी शिरून लाकूड तिरके कापले जात असे,
एक दिवस काकाने ते पाहिले आणि मला सुतारकामाचे धडे दिले
तिरकेपण डोक्यातून निघाले नि सरळपण अंतःकरणात शिरले
नंतर मी पांभरीचे लाकूड नीट कापले नि नीटच तासले, तिला फणही नीट बसवले,
मला खूप आनंद झाला नंतर मी बनवलेली नवी पांभर पाहून,
त्या पांभरीवर पेरलेले बी सरळ रेषेत उगवले...

काका वारले लवकर, कॅन्सर झाला होता त्यांना
बिड्या ओढत ते उंट छाप, सुतारकाम करताना
रिकामपणात गप्पा मारताना धूर सोडत बिडीचा
फुफ्फुस निकामी झाले होते त्यांचे
घसा खरखरू लागला होता
अविरत खोकला सुरू झाला होता झडीच्या पावसासारखा
अखेरीस ते गेले, प्रखर उन्हाचा दिवस होता तो,
त्यांच्या चितेच्या ज्वाला उठल्या तेव्हा ऊन जास्तच बोकाळले होते
कुणीतरी आठवणीने त्यांच्या चितेवर लाकडांसोबत
उंट छाप बिडी बंडल ठेवून दिले होते
लहानपणी बिड्या सरल्यावर टाकून देत तो वेष्टनाचा लाल कागद
त्या लाल कागदावरचे उंटाचे चित्र मला आवडे
उंटाची ती चित्रे मी जमवून ठेवली होती
मला काका आवडत सुतारकाम करताना
बिडीचा धूर सोडताना....

त्यांचे अक्षर खूप सुंदर होते,
त्यांचे तिसरीचे कित्ते ठेवलेले होते मोठ्या लाकडी पेटीत,
रुक्मिणी स्वयंवरासोबत,
लाकडावर नक्षी काढण्यासाठीची हत्यारे ठेवली असत त्या मोठ्या लाकडी पेटीत
त्यांचे अक्षर पाहून मला तसले अक्षर काढावे वाटत असे
त्यांच्यासारखे सुतारकाम करावे वाटत असे
आणि ते गेले मला लाकूड नीट कापायचे शिकवून
माझे अक्षरही काहीसे काकांच्या अक्षरांसारखे झाले...

माझे हस्ताक्षर कवितेच्या वहीत सुरक्षित आहे
काकाने ते कधी पाहिले नाही
कविता त्यांना कळल्या असत्या का?
मला राहून राहून वाटते की त्यांनी माझी कवितेची वही पाहायला हवी होती,
तिच्यातले हस्ताक्षर पाहून म्हणायला हवे होते की,
''तुझे अक्षर सुंदर आहे''
मी बनवलेली नवी पांभर त्यांनी पाहयला हवी होती,
त्या पांभरीवर पेरलेले सरळ रेषेतले पीक पाहायला हवे होते,
पण ते गेले आणि ते तसेच राहून गेले
थोड्या आयुष्यात माझे हस्ताक्षर कायमचे पोरके होऊन राहिले



## १६

नद्या चिरंतन आहेत, डोंगर उभे असतात सदासर्वकाळ,
समुद्र खळाळत असतो अनंतकाळ,
लाटा उसळतात अन् विरून जातात पुन्हा पुन्हा
नव्याने येतात उचंबळून
पाखरू गाणे गाते अन् सूर विरून जातात,
विरलेले सूर विसरून ते उडून जाते अन्नाच्या शोधात,
पुन्हा येते परतून, गात राहते गाणे
दुःखही सरते, सुख येते परतून
सुख-दुःखाचे रहाटगाडगे सुरू असते चिरंतन
आसवे झरल्यानंतर डोळे टवटवीत होतात स्वच्छ
होतात गवतफुलांसारखे
गवतफुले उमलतात, डोलत राहतात वाऱ्यावर
झडून मातीवर पडतात
पण गवतफुलांनी दिलेला आनंद आपल्याला आयुष्यभर पुरतो
हे उमगून आले की आपण सुखावतो थोड्या आयुष्यातदेखील

## १७

कधी ते कळले नाही, थोड्या आयुष्यातच,
कवितेचा एक शब्द आला दुखरा होऊन
त्याच्यापाठी येत राहिले अनेक शब्द, दुखरे होऊन
मी भांबावलो, घाबरलो, बसून राहिलो कासावीस होऊन
मला मरणाची तहान लागली कितीतरी
तहान लागली की मी नदीतल्या पाण्याची ओंजळ भरून घेत असे
भागवून घेत असे माझी तहान,
सारेच पाणी ओंजळीत थांबत नसे,
काही झरून जात असे ओंजळीतून
तसाच भागवू लागलो मी तहान शब्दांकडून
दुखऱ्या शब्दांचे दुःख शोषून
धरू पाहिले मी शब्दांना अंतःकरणाच्या ओंजळीत, काही निसटून गेले ओंजळीतून,
पण माझ्या बोटांना चिकटून असलेली शब्दांच्या दुःखातील करुणेची ओल
अविरत पाझरत राहते माझ्या अंतःकरणात
माझ्या मनाची लालसा शमते काहीशी,
पण लालसा पुरती शमत नाही अजूनही....






वर्णमुद्राचा नवा कवितासंग्रह

**अश्वत्थयुग्मांचे श्लोक**

किंमत ₹ ५७५/-
सवलतीत ₹ ४७५/- ला पोस्टेजसह
घरपोच मिळेल.
संपर्क : वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स,
शेगाव, जिल्हा बुलढाणा
९९२३७२४५५०
नमूद केलेला मोबाईल नंबर ९९२३७२४५५०
हाच व्हॉटसअॅप नंबर आहे, पत्ता त्यावरच
कळवता येईल.
अकाउंट डिटेल्स :

VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK


किंवा

## १८

कितीतरी युगे लोटलीत सत्याला अंत नाही,
असत्य निघून जाते खाली मान घालून, अंधारात,
अदृश्य होते, नंतर त्याचा मागमूसही उरत नाही,
पण ते किती विध्वंस करून जाते असले की
उद्ध्वस्त करून टाकते आपले स्वप्न
ते पाखरांचे पंख छाटून टाकते
नि मुलांचे हसू हिसकावून घेते
भुकेल्या माणसाच्या तोंडातला घास काढून घेते
ते ओरबाडते तुमचे अस्तित्व,
तुमचे विचार गाडून टाकू पाहते ते
जाळून टाकते तुमची जिज्ञासा
तुमची संवेदना ते बोथट करून टाकते दगडासारखी
तुमचे प्रेम ते मारून टाकते चुटकीसरशी
तुमचा भूतकाळ ते उद्ध्वस्त करते
वर्तमान उद्ध्वस्त करते
आणि भविष्यकाळाला उद्ध्वस्त करू पाहते
पण अखेर हरते ते, हरतेच, अन् उरते फक्त सत्य,
त्या सत्यातूनच निर्माण उभे राहते, सृजन टरारून येते
प्रेम उगवते पुन्हा गवताला अंकुर फुटल्यासारखे,
लहरते डोंगरदऱ्यातून, समुद्रावरून येणाऱ्या वाऱ्यावर

## १९

माझी आशा आणि आकांक्षा तर फार मोठी आहे
समुद्राएवढी, कदाचित आकाशाएवढी,
कदाचित त्याहूनही मोठी, जिला मोजदाद नाही ना अंत, अशी,
पण मला चिवचिवता येत नाही चिमणीप्रमाणे
उडताही येत नाही या झाडावरून त्या झाडावर
वाहता येत नाही झुळ झुळ झऱ्यासारखे
वाहता येत नाही वाऱ्यासारखे
बरसता येत नाही निर्मळतेने ढगांसारखे
बसून राहतो मी खिडकीत चिमणीची चर्रर अप चिवचिव ऐकत
पाहत राहतो तिला भरकन उडताना
ऐकत राहतो झुळझुळ वाहणाऱ्या पाण्याचा मंजूळ नाद
वाऱ्यात झुलणारी गवतफुले पाहत राहतो
आनंदित होतो थोड्या आयुष्यात



## २०


मोठी आहे माझी आशा, फार मोठी,
थोड्या आयुष्यात निरभ्र आकाश धुराने भरून जाते, काळवंडून जाते मन
आशा धुळीस मिळते, निराशा घेरून टाकते
काम करून, दमून झोपी गेलेली माणसे,
काळजी वाहून थकून अंथरुणावर पडलेल्या बाया
खेळून, अभ्यास करून, थकून,
उद्याची स्वप्ने पाहत गाढ झोपी गेलेली मुले
झाडाझुडपातल्या घरट्यात, खोप्यात गाऊन गाऊन
आनंदाने निजलेली पाखरे
पायावर मान ठेवून रवंथ करत, डोळे मिटून
पायावर डोके ठेवून बिनघोर विसावलेली जनावरे
रात्रंदिवस सावली देत उभी असलेली झाडे,
सुगंध धारण करून फुललेली फुले
आंबट-तुरट, कडू-गोड चवीचा गर धारण करून
गाभुळलेली, पिकलेली फळे, हे सारे
मिसाईलचा, बाँबचा, ग्रेनेडचा स्फोट होताच,
नष्ट होऊन जाते, राख होऊन राहते
बंदुकीतून, मशीनगन्समधून गोळ्या येतात सूं सूं करत,
आरपार जातात अन् असत्याचे नसते करून सोडतात
घरे, इमारती, चर्च, देवळे उद्ध्वस्त होतात,
ऐतिहासिक स्मारके उद्ध्वस्त होतात
जिवापाड जतन केलेल्या सांस्कृतिक खुणा नष्ट होतात,
मी दुःखी होतो थोड्या आयुष्यात ...

## २१

मी प्रवास करतो या गावाहून त्या गावाला,
या शहरातून त्या शहरात,
ओळखी, अनोळखी माणसे दिसतात, बाया दिसतात, मुले दिसतात,
हसतात, बोलतात, हाय/नमस्कार करतात
घरे, दुकाने, देवळे दिसतात,
मी पाहतो सारे थोड्या आयुष्यात
शेत दिसते नांगरलेले, ढेकळे दिसतात,
ऊन खात असलेली, पावसाची वाट पाहत असलेली कधी पेरलेली असतात शेते,
इवलाली रोपे लहरत असतात वाऱ्यावर,
फुलण्याची, बी धरण्याची आस धरून आनंदाने डोलत असतात,
पीके भरात असतात, कणसे भरून असतात दाण्यांनी
कापूस फुटला असतो चांदण्यासारखा,
शेंगा पोटात पुरल्या जातात,
सारे कसे सुरू असते देवाने ठरवल्याप्रमाणे
मी पाहतो ते सृष्टीचे अस्तित्व युगानुयुगे अस्तित्वात असलेले,
क्षणोक्षणी बदलणारे, नवे रूप धारण करणारे
ऱ्हास होणारे, पुन्हा जन्म घेणारे...
थोड्या आयुष्यात ते नवल मी पाहतो, अचंबून जातो

## २२

थोड्या आयुष्यात मी अजिंठ्याची शिल्पे पाहिली
अर्धवर्तुळात असलेल्या पाषाणाला कोरून
निर्माण झालेला बुद्ध मला पाहता आला,
क्षणभर ते कारुण्य अंतःकरणात अनुभवता आले
तिथून होत असलेल्या नदीचा उगम मी पाहिला,
तिच्या उगमाजवळ निर्माण होणारा
करुणेचा ओलावा मला जाणता आला,
झाडाझुडपांनी वेढलेले, ऊनपावसात न्हाऊन निघालेले
पाषाणात चिरंतन होऊन असलेले
करुणेचे रूप मला पाहता आले,
वेरूळचे कैलास लेणे मला पाहता आले,
स्तब्ध होऊन अचंबून जाता आले,
माझ्या किडामुंगीच्या आयुष्याला तो महान स्पर्श,
या थोड्या आयुष्यातच मला लाभला,
मनोमन मला त्या महान कारागीरांचे ऋणी होता आले



## २३

मीनाक्षी मंदिर पाहावयाचे मनात होते माझ्या या थोड्या आयुष्यात,
रामेश्वर मंदिर पाहावयाचे होते,
दक्षिणेकडे असलेले ते एक महान मंदिर असल्याचे
ऐकून होतो मी
कोणार्कचे सूर्यमंदिर पाहायचे होते,
सूर्याच्या रथाची चाके पाहायची होती
कन्याकुमारी पाहयचे मनात होते माझ्या,
कन्याकुमारीला तीन समुद्रांचा मेळ असल्याचे
वाचले होते मी पुस्तकात,
ते सारे मला पाहता आले थोड्या आयुष्यात
तिथे अद्‌भुत शिल्पे दिसलीत दगडावर कोरली,
गोपुरे दिसली उंचच उंच
खांब दिसले पाषाणाचे नक्षीदार
कमानी दिसल्या पाषाणाच्या सुंदर कोरलेल्या
कुणीतरी अमानवी मेंदू असलेल्या लोकांनी
निर्माण केलेली ती कला असावी,
श्रद्धा, निष्ठा असावी वाटले...
देवतांचे दर्शन मला तिथे सहज झाले नाही,
झालेच नाही,
हालअपेष्टेनेदेखील नाही,
ते गाभाऱ्यात बंदिस्त असलेले देव दिसलेच नाही
माझ्या डोळ्यांना,
पण शिल्पे दिसली अन् त्यामागची प्रचंड शक्ती दिसली
थोड्या आयुष्यात त्यामुळे मी दिपून गेलो,
आणि त्या निर्माण करणाऱ्या हाताना मनोमन वंदन करून घेतले,
मला ठाऊक आहे, तेवढ्याने मी उतराई होणार नाही त्यांचा
पण त्यांचे ऋण या जन्मी माझ्याच्याने फिटणारे नाही

समुद्र पाहिला मी कन्याकुमारीला, खळाळता,
सुंदर, नजरेच्या पार असलेले पाणी,
आणि स्मारक विवेकानंदांचे समुद्रात, पाण्याने वेढलेले,
विवेकानंद मी पाहिले नाहीत,
रामकृष्ण परमहंसांचा नरेंद्र मी प्रत्यक्षात कधी पाहिला नाही
पण त्यांचा स्पर्श झालेली समुद्रातली ती प्रचंड शिळा मला दिसली,
त्यांच्या डोळ्यांनी मला तिथला अपार करुणेचा
अगाध सागर पाहता आला
मी नावेत बसलो,
हिंदकळणाऱ्या पाण्याचे तुषार अंगावर मला घेता आले थोड्या आयुष्यात



## २४

मला माणसे दिसली उघडी, बाया दिसल्या अर्धवट लुगड्यातल्या, काळ्या, काटकुळ्या,
मासेमारी करताना, टोपलीत मासे विकताना,
मंदिराच्या आसपास फुलांच्या माळा हातात धरून
आर्जवे करत असलेल्या,
कधी मनात कसली तरी आस धरून,
मंदिराच्या प्रवेशद्वारी डोक्यावरचा पदर सावरून,
निरागसता धारण करून, रांगेत उभ्या असलेल्या,
खूप आनंदी दिसल्या त्या आनंदी नि सुखी
त्यांनी कधी विचार केला नसावा आयुष्याचा
थोड्या वा दीर्घ आयुष्य लाभावे असा
समुद्राकाठी वाढल्या त्या,
समुद्रावर वाहणारे वारे अंगावर घेत,
जगल्या काम करत, मासोळ्या विकत, प्रेम करत,
समुद्र पाहत, आकाश पाहत,
नारळीपोफळीची झाडे पाहत,
पाखरे पाहत उडणारी, गाणारी,
आणि माणसे पाहत आजूबाजूला जगणारी
समुद्राकाठी झोपड्यात त्यांना मुलेबाळे झाली,
समुद्राकाठी त्या म्हाताऱ्या झाल्या,
उघडीनागडी नातवंडे खेळवत बसल्या
समुद्राकाठीच एक दिवस मरून गेल्या
मासोळीसारख्या, अलगद जगण्याच्या जाळ्यात अडकलेल्या,
जीवनसागरात सुख-दुःखाच्या लाटांवर लहरणाऱ्या ..

## २५

मुले दिसली समुद्रकिनारी
कसलाच विचार करत नसलेली, आयुष्यासंबंधी बेफिकीर असलेली,
पाखरांसारखी, झाडांसारखी, त्यांच्या आयांसारखी, बाबांसारखी,
ती वाढताहेत, मोठी होताहेत झाडांच्या रोपासारखी,
पाखरांच्या पिलांसारखी
त्यांना प्रेम मिळेल, कदाचित दुःख मिळेल,
पण ते भोगतील दुःख आणि
मिळालेल्या थोड्या प्रेमासोबत जगतील आनंदाने थोड्या आयुष्यात ...




## २६

थोड्या आयुष्यात मला श्रद्धा ठेवता आली देवावर,
रोज देवपूजा करत असत दादा,
चंदन उगाळत सहाणेवर
घरभर दरवळे चंदनाचा गंध
वाटे आपल्या घरात देवाचे अस्तित्व भरून आहे
दादा दररोज मारुतीला पाणी घालत,
मारुतीचा पार आमच्या घरासमोरच होता.
दादा नसले की आपोआप माझ्यावर पूजेची पाळी येई.
लाकडाच्या जुन्या काळ्या झालेल्या देव्हाऱ्यात
लाल मंद्र्यावर बसून असत देव,
ते देव मला कधी ओळखता आले नाहीत,
दादा आता नाहीत पण रोज सुतारकाम करत असल्याप्रमाणे ते करत असत ती देवपूजा,
ती बसून आहे माझ्या अंतःकरणात खोलवर,
ते कधी खोटे बोलले नाहीत,
सुतारकामाच्या मजुरीचा कुणाकडे कधी त्यांनी तगादा लावला नाही
आल्यागेल्याला कधी दुखवले नाही,
ते मोठ्याने बोलत,
मारुतीच्या पारापलीकडे त्यांचा आवाज जात असे,
सुतारकाम करताना येणाऱ्या ठकठक आवाजासारखाच....
त्यांना आयुष्यभर पोटभर मिळाले नाही तरी त्यांनी कधी देवाकडे तक्रार केली नाही,
आम्हा भावंडावर त्यांचे खूप प्रेम होते त्यांच्या रागावण्याइतके
किंवा सुतारकाम करत असताना त्यांच्या अंगातून निघणाऱ्या घामाएवढे,
किंवा रात्री अंथरुणावर पडल्यावर त्यांच्या कंबरेतून निघणाऱ्या ठणकेएवढे

पाखरांनी नुकत्या जन्मल्या पिलांना लावावा
किंवा सुतारकाम करताना लाकडाला लावावा
तसा जीव लावला त्यांनी आम्हाला थोड्या
आयुष्यात ....

## २७

मला भीती वाटत असे काळोखाची,
आमचे घर गावाच्या टोकाशी होते पूर्वेला
मारुतीच्या पाराजवळ
पलीकडे एक घर होते केसूबाबाचे,
नंतर ते लोक निघून गेले कुठेतरी घर सोडून,
ते घर उजाड झाले
रात्री अंधार दाट भरलेला असे पूर्वेला बारोकडे,
बारोजवळचा वड अधिक काळाकुट्ट दिसे,
नाल्याकाठचे महादेवाचे देऊळ दिसे काळोखात
उभे
पण दादा असत सोबत, आई असे आणि भीती
पळून जात असे काळोखात नाल्यापलीकडे...




## २८

बोर्डिंगमध्ये होतो तेव्हा जेवण करण्याआधी
'वदनी कवळ घेता' म्हणत असे मी...
मला कळत नसे त्याचा अर्थ
घाईघाईने अर्धवट श्लोक म्हणून मी जेवत असे
अधाशासारखा,
ताटातली भाकरी सरल्यावर, भाजी सरल्यावर
देवासारखी वाट पाहत असे भाकरीची,
भाजीची...
जेवण वाढणारा मित्र कधी रांगेच्या दुसऱ्या
टोकाशी असे
कधी भाकरी भाजली नसे
चुलीतला जाळ नि तव्यावर भाजणारी भाकर मी
पाहत बसे,
भाकरीची ती वाट पाहण्याची वेळ सरल्यानंतर
मिळालेल्या चतकोर भाकरीने माझी भूक भागत
असे अन् देव भेटला असे वाटून,
पोट भरल्याचा ढेकर देऊन मी शाळेत धूम ठोकत
असे,
रांगेत उभा राहत असे प्रार्थनेसाठी हात जोडून
'या कुन्देन्दु तुषार हार धवला' म्हणत असे डोळे
मिटून

भोसले सर मराठी शिकवत असत मॅट्रिकच्या
मुलांना अभ्यासात 'मूर्तिपूजक' कविता होती
शांता शेळके यांची,
कवितेवर तोवर जीव जडला नव्हता माझा
नको वाटत असत कविता
पण ''हरणांनो, पाडसांनो'' आवडत असे मला
''देवा, तुझे किती सुंदर आकाश'' आवडत असे
''थांब जरासा, बाळ'' आवडत असे
कठीण वाटत असे मला कविता गणितासारखी
अवघड वाटत असे जोगेश्वरीचा डोंगर चढून
डोंगरापलीकडे असलेल्या मावशीच्या गावाला

जाण्यासारखी,
पण मी 'मूर्तिपूजक' ऐकली भोसले सरांच्या तोंडून
कवितेचा अर्थ मला उमगला
कवितेसोबतच देवाच्या अस्तित्वाचा शोध लागला थोड्या आयुष्यात…
श्रद्धा अधिक प्रगाढ झाली देवाच्या अस्तित्वावर
टेनिसनच्या 'इन मेमोरियम'मधल्या
It is better to be loved and lost
Than never to be loved at all
या ओळी वाचून….
चिरंतन झाली,
किट्सच्या Truth beauty
Beauty is truth ओळी वाचल्या……
थोड्या आयुष्यात देवाचे शब्द ऐकू आले मला अंतःकरणात.



## २९

अजूनही थोडे आयुष्य हवे आहे मला
एक लहान मुलगी रडते तिची लाकडाची बाहुली हरवली म्हणून,
मला तिला लाकडाची बाहुली बनवून द्यायची आहे,
दुसरी एक मुलगी तोंड उतरून बसली आहे
मैत्रीण खेळायला आली नाही म्हणून,
तिच्यासोबत खेळायचे आहे मला,
एक छोटा छोकरा रडतो आहे स्फुंदून, स्फुंदून
मित्र खेळायला घेत नाही म्हणून,
अजूनही मला त्याचा मित्र होता येत नाहीये,
दुसरा एक मुलगा हाका देतो आहे कुणाला तरी,
कुणीच ओ देत नाही त्याच्या हाकेला,
मला ओ द्यायची आहे त्याच्या हाकेला

माझ्या वडिलांची तसबीर नाहीये माझ्या घरात
एका चित्रकाराकडून मला त्यांची तसबीर काढून घ्यायची आहे
आणि त्या तसबिरीत त्यांच्या डोळ्यांत समाधानाचे भाव चितारून घ्यायचे आहेत मला…

आईचे एक जुने पातळ पडून आहे कपाटात,
तसे नवेच आहे ते,
ती नेसली होती फक्त एका दिवाळीला ते एकदा,
ती गेली नंतर आणि पातळाची घडी तशीच राहिली.
ते पातळ बायकोला नेसायला सांगणार आहे मी.


एक मुलगी होती कॉलेजात जिला एक पुस्तक हवे होते रेफरन्ससाठी
मला सापडले होते ते लायब्ररीच्या एका कपाटात
तिने ते मला मागितले,

मला ते तिला देता आले नाही...
किती वर्षे झाली या गोष्टीला
तिची क्षमा मागायची आहे मला
कुठे असेल ती ? या जगात ती असेल तरी का ?
आणि ती मला भेटेल तरी का ?
ओळखेल तरी का ती मला ?
नाही ओळखले तरी तिची क्षमा मागायची आहे मला

मनात खूप गोष्टी आहेत बाकी,
त्या साऱ्याच मी सांगत बसणार नाही तुम्हाला
असे कितीतरी न फिटणाऱ्या ऋणांचे ओझे फेडायचे
आहे मला, या थोड्या आयुष्यात...



# तांबेशास्त्री यांचे ‘संसारदर्पण’


संसार-दर्पण.
—लेखक व प्रकाशक—
— मुद्रक —
किंमत १ रुपया.

**दत्तात्रय गोविंद सडेकर लोकमित्रकर्ते यांचा अभिप्राय**

आमच्या मतें हें ‘संसारदर्पण ह्मणजे प्रपंचशास्त्र’ आहे. याचें वाचन कोणीहि एकानें करण्यापेक्षां संध्याकाळी जेवणखाण झाल्यावर अर्धा तास आपल्या घरच्या मंडळीस जवळ बसवून त्यांना वाचून दाखविले तरच आपल्या व त्यांच्या अंतःकरणावर थोडा तरी परिणाम होऊन लेखकाचा हेतु सिद्धीस जाणार आहे.

शास्त्रीबुवांच्या या ग्रंथाची अपूर्वता अनेक दृष्टींनीं आहे. ‘पुढच्यास ठेंच मागचा शहाणा’ या नात्यानें संसाराच्या खवळलेल्या समुद्रांत संचार करतांना त्यांना जे जे कटु अनुभव आले व कोणाही संसार-यात्रेकरूस जे जे अनुभव येणें शक्य आहे त्यांचे निर्भीडपणें पण सहृदयतेने उद्घाटन करून शास्त्रीबुवांनी संसार-शात्राचा जो सर्व बाजूंनी विचार केला आहे त्यावरून प्रपंचशात्रासंबंधी कांहीं स्थूल सिद्धांत काढणेही विचारी मनुष्यास शक्य झाले आहे. शिवाय स्वतःच्या मुलांसाठीं ह्मणूनच हा अनुभव व शिकवण सांगितली असल्यामुळे विवेचनांत कोणत्याहि प्रकारचा संकोच तर दिसून येत नाहींच; पण वात्सल्यबुद्धीमुळे संसार-दर्पणांतील अनुभवांचे बोल अत्यंत सरस, हृदयस्पर्शी व मधुर उत्तरले आहेत आणि ह्मणून आम्हांप्रमाणेच हें सर्वांगसुदर पुस्तक संसारांत पाऊल टाकणाऱ्या नवविवाहितांना, संसाराच्या शैलशिखरावर विहरत असलेच्या प्रापंचिकांना व संसाराची धुरा खालीं ठेवण्यास शरीरानें व मनानें तयार झालेल्या वयातीत गृहस्थांसही हें दर्पण सर्व दृष्टींनी संग्राह्य होईल असा भरंवसा आहे. या दर्पणांतील खडे मार्मिक बोल स्वस्थ चित्तानें ऐकून, अंतःकरणांत ठसवून व मनाच्या मुशींत पचवून

शास्त्रीबुवांनी दिलेल्या उद्‌बोधक इशाऱ्याप्रमाणें सर्व स्त्रीपुरुष संसाराचा गाडा हांकतील तर त्यांचा संसार सुखाचा व समाधानाचा होईल हें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

ही अनुभवांची खाण, चुकलेला मार्ग दाखविणारी वनदेवता, अंतःकरणांस जागृत करणारी चैतन्यमूर्ति सर्वांस संतोषित करो इतकें श्रीकुलस्वामिनीकडे मागणें मागून हे दोन शब्द संपवितो.


नम्र,
द. गो. सडेकर.
प्रो. धनंजय प्रेस–खानापूर (बेळगाव.)

## इतर अभिप्राय

'केसरी'कर्ते या पुस्तकास प्रपंचशास्त्र ह्मणतात. 'महाराष्ट्र'कर्ते मुलांच्या शिक्षणक्रमांतील पुस्तकांत हें पुस्तक ठेवावें ह्मणतात व इतर सर्व वर्तमानपत्रकार याची प्रशंसा करतात. पहिल्या आवृत्तीचीं पुस्तकें लग्नांत वधुवरांस देणग्या देण्यासाठींच फार खपली, यावरून याचे महत्त्व सिद्ध झाले आहे.

## पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

हें पुस्तक मी केवळ माझे मुलांचे उपयोगासाठीं लिहिलें आहे. आरंभीं पुस्तक लिहिण्याचा विचारही नव्हता. तोंडानेच कांहीं गोष्टी सांगून मुलांस संसाराची माहिती करून द्यावी असा विचार होता; पण थोरल्या मुलाचे वय १० वर्षांचे असल्यामुळे त्याचे ध्यानांत सर्व गोष्टी राहणार नाहींत व कित्येक गोष्टी या वयांत त्यास कळणारही नाहींत, असें मनांत आले; शिवाय धाकटा मुलगा अगदींच लहान आहे. त्यास या गोष्टींचा आज कांहींच उपयोग होण्यासारखा नाहीं. मुलें मोठीं झाल्यावर त्यांस संसाराची माहिती करून द्यावी तर तेथपर्यंत मी वांचतोच असा नेम नाहीं, याकरितां मुलांस करावयाचा बोध लिहून ठेवावा असें मनांत आलें व त्यामुळें हें पुस्तक तयार झालें. सारांश केवळ स्वतःचे मुलांसाठीं म्हणजे स्वार्थबुद्धीनेंच हें पुस्तक तयार झालें. स्वतःसाठीं लिहिलेल्या पुस्तकास प्रस्तावनेचीही वास्तविक गरज नाहीं, पण पुस्तक–लेखक स्वार्थी असला तरी पुस्तक स्वार्थी नसतें. त्याचा स्वभाव घरींचिया उजेड करावा। परकीया अंधेरु द्यावा । ऐसें नेणेचि गा पांडवा। दीपू जैसा ।। असा उदार असतो. यामुळें हें पुस्तक केवळ माझ्या मुलांसच शिकवणीच्या गोष्टी सांगेल व इतरांस सांगणार नाहीं असें होणार नाहीं असा विचार मनांत आला व प्रस्तावना लिहिली. कोणत्याही पुस्तकास मुद्रणसंस्कार झाल्यावांचून त्याचें अस्तित्व निर्भय नसतें व त्याचा सार्वत्रिक उपयोग होत नाही. या गोष्टी खऱ्या असल्या तरी सदर पुस्तकास मुद्रणसंस्कार करणे आमचे शक्तीबाहेर असल्यामुळे


Poona City
*5th August 1918*

I have great pleasure in certifying that Vidyabhushan Tambe Shastri is a good Sanskrit and Marathi scholar. He is also a Marathi poet of merit. His special qualification, however, consists in delivering lectures in the form of Purans, in a new-fashion and these are highly appreciated in the Maharastra. He is a public spirited man and deserves encouragement and support from all Marathi speaking public.

**Bal Gangadhar Tilak.**

पुणें शहर ता० ५ आगष्ट १९१८.

विद्याभूषण तांबे शास्त्री यांचें संस्कृत व मराठी वाङ्मय यांतील प्रशंसनीय प्राविण्य पाहून मला मोठा अभिमान वाटतो. ते प्रतिभामान् कवी आहेत; पण त्यापेक्षांही त्यांची आधुनिक पद्धतीनें पुराण सांगण्याची शैली अधिक परिणामकारक असल्यानें महाराष्ट्रांत शास्त्रीबुवांची पुराणें अत्यंत लोकप्रिय झालीं आहेत. त्याचप्रमाणें शास्त्रीबुवांत सार्वजनिक कळकळ विशेष असल्यानें महाराष्ट्राकडून आश्रय व प्रोत्साहन मिळण्यास ते सर्वस्वी पात्र आहेत.

**—बाळ गंगाधर टिळक.**

आम्ही तो विचार बरेच दिवस मनांत आणला नाहीं.

सदर पुस्तकांत अभिनव असें कांहीं नाहीं; त्यांत शास्त्रीय गहन विचार नाहींत, नवीन शोध नाहींत की चित्ताकर्षक अशी सृष्टिचमत्कृतींचीं वर्णनेंही नाहींत. फक्त माझे प्रपंचांतील अनुभव जरा व्यवस्थित रीतीनें एकत्र केले आहेत व त्यावर मला सुचलेले विचार लिहिले आहेत. माझे अनुभव कांहीं ठिकाणीं माझ्यापुरते असण्याचाही संभव आहे व मी लिहिलेले विचार हे संसारशास्त्राचे सिद्धांत आहेत असेंही मी म्हणत नाहीं.

माझी मुलें व इतर लोक या पुस्तकाचा उपयोग आपले संसारांत करून घेतील तर त्यांचा बराच फायदा होईल. हें पुस्तक वाचण्याची ईश्वरानें त्यांना बुद्धि द्यावी अशी प्रार्थना करून ही प्रस्तावना संपवितों.

**विद्याभूषण – तांबेशास्त्री**

## आवृत्ति दुसरी

पहिली आवृत्ति संपून बरींच वर्षे झालीं पण पैशाचे अभावी दुसरी आवृत्ति काढण्यास वेळ लागला. लोकांची मागणी तर पुष्कळ. या आवृत्तीस श्री. ग्वालेर सरकार यांकडून १०० रु. व श्रीमंत पटवर्धन सं० जमखंडी व श्री. बाबासाहेब इचलकरंजीकर यांनीं अनुक्रमें ५० व २५ रु. पाठवून मदत केली आहे. या आवृत्तीत कांहीं सुधारणा केल्या आहेत व उपयुक्त मजकूर घातला आहे. सेंट्रल प्राव्हिन्सेसमध्यें सरकारने शाळाखात्यांत हें पुस्तक मंजूर केलें असल्यामुळे हें लोकमान्य व राजमान्यही झालें आहे, यास्तव या पुस्तकास लोक आश्रय देतील अशी उमेद आहे.

**विद्याभूषण – तांबेशास्त्री**

## फोटोबद्दल वाचकांस विनंति

आमचे मित्र श्री. द. गो. सडेकर यांनीं 'संसार–दर्पणा'चे वाचकांस आमचा फोटो देण्याचें आश्वासन दिलें. परंतु वाचकांस या फोटोचें कारण काय? फोटो पाहण्याचे मुळाशीं पूज्य भावना व मनोरंजन हे दोन

## अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठें. |
|---|---|
| धडा १ ला—विषयाचें महत्त्व .... .... | १–७ |
| धडा २ रा—प्रपंचशिक्षणाचीं कांहीं साधनें | ८–१३ |
| धडा ३ रा—प्रवासवृत्ताचा नमुना .... | १४–१८ |
| धडा ४ था—प्रपंचशिक्षणाचे उपयोगी गोष्टी ( धर्मसमजुती व म्हणी ) | १९–२५ |
| धडा ५ वा—संसार म्हणजे काय? .... | २६–२७ |
| धडा ६ वा—संसाराचे कांहीं प्रकार .... | २८–२९ |
| धडा ७ वा—संसार चालविणारी मंडळी .... | ३०–३५ |
| धडा ८ वा—संसारपद्धति व राज्यपद्धति .... | ३६–३८ |
| धडा ९ वा—सांसारिक कामें नेमून देतांना ध्यानांत ठेवण्याच्या गोष्टी .... | ३९–४२ |
| धडा १० वा—घरधनी व घरधनीन .... | ४३–५१ |
| धडा ११ वा—कुटुंबांतील मंडळींचे हक्क .... | ५२–५७ |
| धडा १२ वा—यजमान व यजमानीन यांचे गुणावगुण .... .... | ५८–६१ |
| धडा १३ वा—विभक्तपणा व एकत्रपणा .... | ६२–६८ |
| धडा १४ वा—एक नमुनेदार कुटुंब .... | ६९–७५ |
| धडा १५ वा—यजमाननींचे अधिकारांतील स्त्रियांचीं कामें .... | ७६–९४ |
| धडा १६ वा—पुरुषांचीं कामें व कर्तव्यें .... | ९५–१०८ |

| | पृष्ठें. |
|---|---|
| धडा १७ वा—वस्तुसंग्रह व ग्रंथसंग्रह .... | १०९–११६ |
| धडा १८ वा—कपडे व दागदागिने .... | १[illegible]७–१२३ |
| धडा १९ वा—उसनवारी, उधारी व कर्ज वगैरे | १२४–१३६ |
| धडा २० वा—आतितअभ्यागत व धर्मकृत्यें .... | १३७-१४१ |
| धडा २१ वा—गोठा व गुरेंढोरें .... | १४२-१४५ |
| धडा २२ वा--वादविवाद .... .... | १४६-१४७ |
| धडा २३ वा--शेती, बागाईत, व्यापारधंदा व नोकरी .... | १४७-१५१ |
| धडा २४ वा--पुरुषांचीं आणखीं कर्तव्यें .... | १५२-१५५ |
| धडा २५ वा--मागील धड्यांचा उपसंहार .... | १५६-१६० |
| धडा २६ वा--घरगुती औषधें .... | १६१-१६८ |
| धडा २७ वा-- मुलांस उपदेश .... .... | १६९-१७८ |
| उपसंहार— .... .... ... .... | १७९-१८० |

हेतु असतात. अलौकिक बुद्धिमान् व प्रख्यात देशभक्त अशा विभूतींचे फोटो जवळ ठेवणें ठीक आहे, कारण ते पूज्य असतात. पण 'कोटश्च कीटायते' अशा माझ्यासारख्याचा फोटो कशाला? मनोरंजनाच्या दृष्टीनें पाहिलें तरी आमचा बावळट चेहरा, तिरवी दृष्टि, लंगडे पाय व गबाळी पोषाख असलें दृश्य पाहण्यापेक्षां एकाद्या सुंदरीचा फोटोच लोकांस जास्त आवडेल! आमच्या चेहऱ्यांत सामान्य लोकांपेक्षां कांहीं विलक्षण गोष्ट तरी पाहिजे होती. आह्मांस चार डोळे, दोन डोकी, हत्तीसारखे कान अगर शिंगे असतीं तरीसुद्धां आमचा फोटो लोकांनीं कौतुकानें पाहिला असता; पण तेही आमचे नशिबीं नाहीं! मग फोटो देण्यांत मजा ती काय? बरें तें असो; पण फोटो तरी कोणाचा काढावयाचा? आमच्या स्थूल देहाचा कीं लिंगदेहाचा? स्थूल देहाचा फोटो काढण्यांत अर्थ नाहीं. कारण त्याचें रूप कायम नाहीं, काळगतीनें बदलणारे आहे. सूक्ष्म-देहाचा (वासना-देहाचा) फोटो काढण्याचा क्यामेरा विकत मिळत नाहीं ही अडचण आहे! तथापि आमच्या मित्रांची इच्छा पूर्ण करण्यासाठीं आम्ही आमच्या वासनादेहाचा अदृश्य फोटोच देत आहो. हा अदृश्य फोटो पाहण्याची ज्यांस गुरुकिल्ली प्राप्त होईल त्यांस तो दृश्य होईल. पुस्तक वाचतांना जे वाचक पुस्तककर्त्यांचे विचारांशीं समरस होतील त्यांचे स्थूल देहांत पुस्तककर्त्यांचा वासनादेह ताबडतोब प्रवेश करील व तो त्या स्थूल देहाचा अभिमानी बनेल. अशावेळी त्या वाचकानें एक दर्पण घेऊन त्यांत आपलें तोंड पाहवें. पुस्तककर्त्याचेहि तेंच प्रतिबिंब होय. अशा रीतीनें वाचकांनीं पुस्तककर्त्यांचा अदृश्य फोटो पाहावा. ज्यांची जास्त हौस असेल त्यांनी त्यावेळीं पाहिलेलें आपले प्रतिबिंब पुढील वलयांत उठवावें ह्मणजे पुस्तककर्त्यांचा यथातथ्य फोटो होईल.

**उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।। आत्मैव ह्यात्मनो बंधुः आत्मैव रिपुरात्मनः ।। भ.गीता ।।**

**।। श्रीशं वन्दे ।।**

# संसार-दर्पण

### धडा पहिला.

## विषयाचें महत्त्व

इंग्रजी, संस्कृत वगैरे भाषा व अनेक प्रकारच्या विद्या शिकविण्याच्या जशा शाळा आहेत, तशा संसार शिकविण्याच्या शाळा नाहीत; असें असूनही लोक संसार करितात! यावरून संसार करणे सोपे आहे, त्यांत शिकण्यासारखें कांहीं नाहीं असें कोणास वाटेल, पण खरोखर संसारासारखें कठीण व कल्पकतेचें दुसरें कोणतेच काम नाहीं असें समजावें. बरीचशी पाठशक्ति असणारा मुलगा एकमार्गी असला तरी चांगला विद्वान होईल, पण तो उत्तम संसारी होईल असें ह्मणतां येणार नाहीं; कारण संसारांत एकमार्गीपणा चालत नाहीं, चौरसपणा लागतो, आतां जगांतील सर्व लोक संसार शिकण्याच्या शाळेत न जातांही संसार करीत आहेत हें खरें पण अशा लोकांपैकी शेंकडा नव्याण्णव लोकांचे संसार अव्यवस्थित असतात असें आढळतें; हे लोक जर संसाराचें शिक्षण घेते तर त्यांस हल्लींपेक्षां जास्त चांगला संसार

करतां आला असता. निरक्षर मनुष्यही व्यवहारापुरतें करा तरी बोलतोच पण त्याचें बोलणें साक्षर मनुष्याप्रमाणें व्याकरणशुद्ध नसतें. अशिक्षित संसाऱ्याची तऱ्हा अशीच असते. तो संसारांत वारंवार चुका करतो व शेवटी नुकसानींत येतो ह्मणून संसारांत पडणाऱ्या मनुष्यानें संसाराचें शिक्षण घेणे योग्य आहे.

आपले देशांत संसाराचे शिक्षण देणारी जर आज एकही शाळा नाहीं तर शिकावयाचें कोठें? असा प्रश्न येतो; परंतु संसाराचें शिक्षण घेण्यास शाळेतच गेलें पाहिजे असा अर्थ नाहीं तर 'केल्याने देशाटन पंडितमैत्री सभेत संचार । शास्त्रग्रंथ विलोकन मनुजा चातुर्य येतसे फार' या श्लोकांत सांगितलेलीं चातुर्याचीं साधनें संसाराचे उपयोगी पडतील. मात्र ही साधनें मिळविली पाहिजेत म्हणजे प्रवास केला पाहिजे. विद्वानांचा सहवास केला पाहिजे, सभांना गेले पाहिजे व शास्त्रग्रंथ वाचले पाहिजेत. प्रवासादि गोष्टी केवळ मजेकरितां करावयाच्या नसून ज्ञानाकरितां करावयाच्या आहेत हें ध्यानांत ठेवून केल्या तरच त्यांचा खरा उपयोग होईल. पुष्कळ वेळां साध्य कोणतें व साधन कोणतें याचा मनुष्य विचार करीत नाही व कांहीतरी उगाच उद्योग करीत राहतो. कित्येक वेळा भलतेच साध्य समजून मनुष्य फसतो तर कित्येक वेळा भलतेच साध्य ठरवून तो आपले नुकसान करून घेतो! या साध्यसाधनांचा विचार फार महत्त्वाचा आहे यास्तव तो पुढच्या धड्यांत स्वतंत्रपणे करूं.

प्रत्येक घर हीच गृह-शिक्षणाची शाळा आहे. गृह-शिक्षण हेंच प्रपंच-शिक्षण होय व परंपरेने हें गृह-शिक्षण आजतागायत घरोघर चालू आहे; परंतु या शिक्षणावर असा आक्षेप येईल की, वाडवडील अडाणी असतील व त्यामुळें त्यांना 'संसाराचें ज्ञान नसेल तर असल्या अव्यवस्थित गृह-शिक्षणाचा उपयोग काय? हा आक्षेप अगदीच खोटा नाहीं, अंशतः खरा आहे; पण असल्या अव्यवस्थित गृह-शिक्षणाचाहि उपयोग आहे असे आह्मी ह्मणतों. भूमितिशास्त्रांत क्रमिक सिद्धता व क्रमविरुद्ध सिद्धता असे सिद्धांत ठरविण्याचे दोन प्रकार आहेत. चार व तीन यांचा गुणाकार बारा होतो हा सिद्धांत आहे व तो सिद्ध करायचा आहे असें समजा. हा सिद्धांत आपणांस दोन प्रकारांनी सिद्ध करतां येईल. गुणाकार म्हणजे बेरजेचा संक्षेप होय. ४ X ३ याचा अर्थ ४+४+४ असा आहे. या तीन संख्यांची बेरीज केली तर ती १२ होते ह्मणून ४ X ३ = १२ हें सिद्ध झालें व ही क्रमिक सिद्धता झाली. आतां क्रमविरुद्ध पद्धतीनें हाच सिद्धांत सिद्ध करूं, ४ X ३=१२ होत नाहींत असे मानलें तर बारापेक्षां कमी किंवा जास्त होतात असे मानावें लागेल. आपण अकरा होतात असे मानूं. प्रथम ४ ही संख्या दोनच वेळ मांडून बेरीज करूं ४+४=८ ही बेरीज आली; यांत किती मिळविले तर ११ होतात हे पाहूं ८+३= ११ आठांत तीन मिळवून अकरा होतात. चार मिळवून अकरा होत नाहींत बारा होतात. यावरून ४ X ३= १२ हेंच सिद्ध. ४ X ३=११ होणार नाहींत अगर बारांहून अन्य अशी कोणतीहि संख्या होणार नाहीं हें सिद्ध करता येईल. व्यवस्थित संसार चांगला हें ठरविण्यास क्रमिक रीतीनें सिद्धता करावी लागते. अव्यवस्थित संसार ही क्रमविरुद्ध सिद्धता करण्याची पद्धति होय. ज्या चुकांमुळे वडिलांचे नुकसान झालेलें मुलास दिसेल त्या चुका तो पुढे करणार नाहीं, हाच अव्यवस्थित संसार पाहण्यांत फायदा आहे व तो अगदीच कमी किंमतीचा आहे असे आह्मांस वाटत नाहीं. चांगल्यांतून जसें चांगले निघतें तसें केव्हां केव्हां वाइटांतूनही चांगले निघतें.

आमचे लोकांस पूर्वी हें बरें-वाईट गृहशिक्षण मिळण्याची जी सोय होती ती मात्र दिवसेंदिवस नष्ट होत चालली आहे! ही सोय नष्ट होण्याची कारणें याप्रमाणें आहेत. (१) मुलांचे आई- बाप त्यांच्या लहानपणीं मरणें (२) मुलें अभ्यासाकरितां व नोकरीकरितां परगावीं गेल्यामुळे त्यांस आईबापांचा

सहवास नसणें (३) आईबापांचे सहवासांत असणारी मुलें अनुभव घेण्यास लायक नसणें. या तीन कारणांपैकी पहिलें कारण ह्मणजे मुलाचे आईबाप मरणें हें सर्वस्वी ईश्वराधीन आहे. दुसरें कारण परिस्थितीनें उत्पन्न झालें आहे त्यास उपाय नाहीं; पण तिसरे कारण मनुष्यानेंच उत्पन्न केलें आहे, तेव्हां तें त्यास नष्ट करतां येईल. सुबुद्ध व तरतरीत मुलगा आईबाप बहुतकरून नोकर बनविण्यासाठीं शाळेत घालतात व अगदीं रद्दड मुलगा संसारासाठीं घरी ठेवतात! या चालीनें शेंकडा नव्याण्णव लोकांचे संसार बुडाले आहेत; कारण केवळ सांगकाम्या अशा मुलाकडून संसारांत आईबापास थोडीबहुत मदत झाली तरी तो मुलगा स्वतः आपले अकलेनें संसार करण्यास समर्थ होईल ही आशा व्यर्थ आहे. कोणत्या चुकीनें नुकसान झाले, कोणत्या कृतीनें फायदा झाला व काय केलें असतां काय होईल इत्यादि गोष्टी रद्दड मुलाचे लक्षांत येणार नाहींत, अर्थात् असा मुलगा आईबापांचे सहवासांत संसारांतील अनेक कामें वर्षानुवर्षं करीत असला तरी तो संसार करण्यास लायक होणार नाहीं.मुलगा जरी सांगकाम्या आहे तरी तो उद्योगी व आज्ञाधारक असेल तर आईबापांस फार प्रिय होतो व आपला मुलगा आतां संसारांत वाकबगार झाला अशी त्यांची समजूत होते; पण ती खोटी असते..

आपण हुषार, शहाणे व उत्तम संसारी असा मिथ्या भ्रम उत्पन्न होऊन अखेर त्या मुलाचें फारच नुकसान होतें. मुलगा काटकसरी किंवा कंजुष असला की हा उत्तम संसारी होईल; उद्योगी असला कीं हा उत्तम संसारी होईल. निरोगी व धट्टाकट्टा असला की हा उत्तम संसारी होईल असे अनुमान आईबाप करीत असतात; पण जें कार्य अनेक कारणांच्या संघाताचें फळ असतें त्या अनेक कारणांपैकी एकादें दुसरें कारण दृष्टीस पडतांच तेवढ्यावरून तें कार्य सिद्ध होईल असें ठरविणें हें दूषित अनुमान होय. मातीचीं घागर तयार करण्यास माती, पाणी, चाक, थापटणे व कुंभार इतक्या मुख्य साधनांची जरूर असते. यांपैकी एक जरी कमी असलें तरी घागर होणार नाहीं; तसेंच सर्व साधनांची अनुकूलता आहे पण घागर करण्याची कुंभारास इच्छा नाहीं तर घागर तयार होईल काय? सारांश उत्तम संसारी होण्यास लागणाऱ्या अनेक गुणांपैकी एकादा गुण मनुष्याचे अंगी असला तर तेवढ्यानें तो उत्तम संसारी होईल असें अनुमान करतां येणार नाहीं.

उत्तम संसारी होण्यास गुण तरी कोणते पाहिजेत? असें कोणी विचारलें तर गुणांची पूर्ण यादी देतां येणार नाहीं; पण सामान्यतः इतके सांगतां येईल की, उत्तम राजा होण्यास जे गुण पाहिजेत तेच उत्तम संसारी होण्यास पाहिजेत. संसारास राज्याची उपमा बरोबर लागू पडते. राजाचा प्रजेवर ताबा तर घरचे मंडळीवर गृहपतीचा ताबा. राजाची विविध धर्मांच्या प्रजेविषयीं समदृष्टि तर विविध मनोधर्माच्या मुली, सुना, पुत्र, पुतणे वगैरे मंडळीविषयीं गृहपतीची समदृष्टि. राजास सेनेची जरूर तर गृहपतीस नोकरांची जरूर. राजास युद्धाचा प्रसंग तर गृहपतीस वादाचा प्रसंग. राजास शत्रूचीं कारस्थानें पाहावी लागतात तर गृहपतीस भाऊबंदांचीं कारस्थानें पाहावी लागतात! सारांश राज्य व संसार अगदी तुल्य आहेत. एकाचा व्याप मोठा व दुसऱ्याचा छोटा एवढाच फरक बाकी महत्त्व सारखेंच.

संसारोपयोगी असा एकादा दुसरा गुण अंगी असल्यानें जे लोक एका पिसानें मोर होतात ते संसारांत शेवटीं फसतात. बापाचे पश्चात् नालायक मुलाचे हातीं संसार आला की, तो आपणास सर्वज्ञ असा संसारपंडित समजतो व मन मानेल तसा वागतो. तो मोठेपणाचे नादी लागतो व आपली जमा आणि खर्च यांचा मेळ पाहत नाहीं. जमेपेक्षां खर्चाची बाजू वाढली तर जमेची वाढ कशी होईल अगर खर्चाची छाटाछाट कशी करतां येईल याचा तो विचार करीत नाहीं; अथवा त्या गोष्टी करण्याची त्यास अक्कल नसते असें म्हटलें तरी चालेल. असा मनुष्य आपले व एकंदर कुटुंबाचाहि नुकसान करितो.

तो चुकीची दुरुस्ती करीत नाहीं व आपलें अज्ञान झांकण्याचा मात्र यत्न करूं लागतो. त्याचे भाऊ नोकरीवर असल्यास त्यांस आपणांवर दैवी आपत्ति आल्याचीं तो पत्रें पाठवितो व पैसे मागतो. भाऊ प्रथम प्रथम त्यास पैशाची मदत करतात पण प्रतिवर्षी या संसारपंडिताची दैवी आपत्ति वाढत चालली की ते कंटाळतात व मदत करीतनासे होतात. बाहेरील मदत बंद झाली की कर्ज होतें व वतनवाडी सावकाराचे घरांत जाते! गुरांचे रोग, टोळधाड, अतिवृष्टि, अनावृष्टि; धरणीकंप हत्यादि अनेक दैवी आपत्तींपेक्षां संसारांत बेअक्कलपणाची आपत्ति जास्त मोठी आहे!!

वरील विवेचनावरून मतिमंद मुलगा संसाराचा अधिपति करणें योग्य नाहीं असें दिसून येईल; असा मुलगा त्याचे लायकीप्रमाणें संसारांतील एकाद्या कामावर नेमला तर हरकत नाहीं पण त्यास मुख्य यजमान करूं नये. बहुधा बाप हुषार मुलांस विद्या शिकवून नोकरीस लावतात व आपण संसार करितात, बहुतेकांचे संसार गरिबीचे असल्यामुळे बाहेरून पैशाचे पुरवठ्याची जरूर असते व गरिबीच्या छोट्या संसारास घरी एकादा हुशार मनुष्य असला की भागतें. यास्तव बापानें संसार करणे व मुलांनी नोकरी करून पैसा पुरविणें हें योग्य आहे; या पद्धतींत एक दोष आहे तो असा – बाप मेला की मुलाला नोकरी सोडून संसाराकरितां घरीं राहावें लागतें व हा मुलगा कितीही हुशार असला तरी संसाराविषयीं अगदीं अनभिज्ञ असतो, यामुळे संसाराची घडी बसविण्यास त्यास फार जड जाते. हा जडपणा ज्या संसाराची सूत्रे त्याचे हाती येतात त्या संसाराच्या अव्यवस्थित व सुव्यवस्थितपणावर अवलंबून असतो. जेथें धड जमा– खर्च ठेवलेला नाहीं व ठेवलेला असल्यास अनागोंदी पद्धतीचा. आपली जमीन किती व कोठें आहे याचेंही घरांत टांचण नाहीं व संपत्तीची मोजदाद नाहीं. असला बेदाद व अव्यवस्थित संसार अकस्मात् गळ्यांत पडला तर कितीही हुशार मनुष्य असला तरी तो गोंधळून जाईल व केव्हां आपण बुडेल व केव्हां दुसऱ्यासही बुडवील. वेळच्या वेळी व चोख जमाखर्च ठेवलेला, आपले जमिनीचे नकाशे, संपत्तीची यादी, वार्षिक धार्मिक कृत्यांची व त्यांचे खर्चांची यादी, आपल्या वतनासंबंधाच्या सनदा, कोर्टाचे निवाडे वगैरे सर्व कागद, ठेवी, उसनवारी वगैरेचें टांचण, देवाचे नवस व लोकांस दिलेली वचनें यांचे स्मरणार्थ टांचण इत्यादि भरपूर साधनसामग्री असलेला संसार गळ्यांत पडला तर फारसे जड जात नाहीं; पण संसाराविषयीं कांहींच अनुभव नसल्यामुळे हुषार मनुष्याचे हातूनही आरंभी बऱ्याच चुका होतील व त्याचा तोटा होईल. अनुभव घेतां घेतां मनुष्य शहाणा होतो; पण तें शहाणपण त्यास फार महाग पडतें.

वरील अडचण अंशतः दूर होण्यास दोन उपाय आहेत. आपले हातपाय थकत आले की, नोकरींचे उत्पन्न घरचे उत्पन्नापेक्षां कमी असल्यास बापाने मुलास नोकरी सोडण्यास सांगावें. संसारसूत्रे त्याचे हातीं द्यावीं, मुलास मुखत्यारीनें संसार करण्याची परवानगी द्यावी व आपण देखरेख ठेवून तो चुकेल तेथे आपण दुरुस्ती करावी. आपले सर्व अनुभव मुलास सांगावेत व त्यास सावध करावें. मनुष्य कितीहि शहाणा असला तरी त्यास आपले पूर्वजांचे अनुभव कळावेच लागतात; अनुभव कळले नाहींत तर तो फसतो, अमुक मनुष्य दिसण्यांत सभ्य पण लबाड आहे, अमुक म्हशीस वितेवेळी वाईट खोड आहे, अमुक जमिनीत पावसांत उमळ येऊन जलमय होतें इत्यादि मागील अनुभव न कळले तर नुकसान होतें, सबब बापानें मुलास हे सर्व अनुभव सांगावे. आपणांस केव्हांतरी मरावयाचें आहे व आपला अधिकार दुसऱ्याकडे जावयाचा आहे, मग आपणच जिवंतपणीं तो दुसऱ्यास दिला तर काय वाईट? माझे कसेबसे हातपाय चालताहेत, मग आजच मुलास नोकरी सोडण्यास सांगून पैशाचे नुकसान कां करा? असें पुष्कळांस वाटतें, पण बापाचे साधारण हातपाय चालत असतांच मुलाने नोकरी सोडण्यांत होणारें

नुकसान हेंच शेवटीं फायदेशीर पडते. संसाराची परंपरा न बिघडण्याचा व पुढील पिढीस संसाराचे शिक्षण देण्याचा हा एक उपाय झाला. दुसरा उपाय असा आहे की, प्रत्येक संसारी मनुष्यानें आपले सर्व अनुभव रोज लिहून ठेवावे, म्हणजे त्या लेखापासून पुढील पिढीस फार उपयोग होईल. मुलांसाठी संपत्ति मिळवून ठेवण्याइतकेंच त्यांसाठीं अनुभव लिहून ठेवणें महत्त्वाचे आहे.

❑






पूर्वप्रभा आणि पश्चिम आभा
शिरीष चिंधडे
४२४/-
पुस्तक आढावा-ओळखपर लेख




लकडी पूल ते लंडन पूल
शिरीष चिंधडे
४८४/- प्रवासवर्णन




जगावेगळी जीवने
शिरीष चिंधडे
३२४/- निबंध




सृजनस्रोत
शिरीष चिंधडे
४२४/- ओळखपर लेख

संपर्क : वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स, शेगाव, जिल्हा बुलढाणा
९९२३७२४५५०
नमूद केलेला मोबाईल नंबर ९९२३७२४५५० हाच व्हॉटसअॅप नंबर आहे, पत्ता त्यावरच कळवता येईल.

अकाउंट डिटेल्स :
VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK

किंवा



# पुलावर बसलेला म्हातारा
## अर्नेस्ट हेमिंग्वे, अनुवाद : वर्णमुद्रा

स्टीलची फ्रेम असलेला चष्मा घातलेला एक म्हातारा मनुष्य सडकेकाठी बसून होता. त्याचे कपडे अगदी मळून गेलेले होते. नदीवर पिपं घालून पूल तयार केला होता आणि घोडागाड्या, ट्रक्स, मुलं, माणसं, स्त्रिया त्यावरून जात होते. घोडागाड्या नदीच्या उभ्या चढावाच्या काठावर खडखडत चढत आणि मग पूल पार करत. सैनिक त्या घोडागाड्या मागून जोर लावून ढकलत. ट्रक्स मोठ्याने घुर्र आवाज करत हा कठीण चढ चढत आणि शेतकरी घोट्याएवढ्या फुफाट्यातून पायी जात असत. पण ह्या सर्व गदारोळात तो म्हातारा स्थितप्रज्ञासारखा तिथे न हलता-डुलता बसून होता. तो इतका थकला होता की, पुढे जाण्याचं त्राण त्याच्यात शिल्लक उरलं नव्हतं.

पूल ओलांडून शत्रू कुठपर्यंत पोचला आहे हे पाहण्याची जबाबदारी माझी होती. बराच पुढे जाऊन एक चक्कर टाकून मी पुलावर परत आलो. आता पुलावर फारशा घोडागाड्या नव्हत्या आणि पूल पार करणाऱ्यांची गर्दीसुद्धा कमी झाली होती, तरी तो म्हातारा अजून तिथेच बसून होता.

''कुठले आहात बाबा आपण?'' मी त्याला विचारले.

तो हसून म्हणाला, ''मी सॅन कार्लोसचा आहे.''

ते त्याचं शहर होतं. त्यामुळे त्याचं नाव उल्लेखताना त्याला आनंद होत होता, म्हणून तो हसत होता.

''मी पशुपालन करत असे,'' तो म्हणाला.

''अच्छा!'' मी म्हणालो, पण मला त्याचं काय म्हणणं आहे त्याचा नीट अर्थबोध झाला नाही.

‘‘हो, मी पशुधनाची देखभाल करण्यासाठी तिथे थांबलो होतो. सॅन कार्लोस सोडणारा मी शेवटचा माणूस होतो.’’

तो तसा गुराखी वा मेंढपाळ तर दिसत नव्हता. मी त्याचे मळलेले कपडे, त्याचा स्टीलच्या फ्रेमचा चष्मा पाहून म्हणालो की, ‘‘बाबा कोणत्या पशूंची देखभाल करायचे तुम्ही?’’

‘‘विविध प्रकारचे.’’ तो मान हलवत म्हणाला. ‘‘त्यांना तसंच सोडून यावं लागलं.’’

मी पुलावरची रहदारी, पुढे एब्रो नदीचं ते वळण आणि आफ्रिकेतल्या सारखं ते दृश्य बारकाईने न्याहाळत होतो. मनातल्या मनात गणित करत होतो की आणखी किती वेळाने अंदाजे तो कोलाहल ऐकू येणार आहे, जेव्हा दोन्ही सैन्यं एकमेकांना भिडतील? तो म्हातारा अजूनही तिथून निघण्याची चिन्हं दिसत नव्हती.

‘‘हं, तर कोणकोणते पशू होते?’’ मी पुन्हा विचारलं.

‘‘तीन एकूण,’’ तो म्हणाला. ‘‘दोन बकऱ्या आणि एक मांजर. तशा कबुतरांच्या चार जोड्या पण होत्या.’’

‘‘अच्छा, तर त्या पशुधनाला सोडून आलात तुम्ही.’’ मी म्हणालो.

‘‘हो, तोफेचे गोळे कुठूनही येऊन पडत.’’ सैन्याचा कॅप्टन मला, तिथे राहायचं नाही म्हणाला.

‘‘आणि तुम्हांला परिवार नाही का?’’ मी म्हणालो. पुलाच्या शेवटी काही अंतिम घोडागाड्या खडखडत उतरताना मी पाहिलं.

‘‘नाही, माझे ते पशुपक्षी तोच माझा परिवार. मांजर तर तगून जाईल म्हणा, पण बाकीचे कसे टिकतील कुणास ठाऊक.’’

‘‘तुम्ही कुणाचे समर्थक आहात?’’ मी विचारलं.

‘‘मला राजकारणात काही रस नाही.’’ तो म्हणाला. ‘‘मी शहात्तर वर्षांचा आहे. बारा किलोमीटर तुडवून मी इथवर पोचलो आहे, आता मला नाही वाटत की मी आणखी चालू शकेन असं.’’

‘‘पण तुम्ही इथे नका थांबू, ही जागा सुरक्षित नाही. तुम्ही थोडा पूल पार करून जा, तिथे तुम्हाला ट्रक्स मिळतील, ते तुम्हाला टोर्टोसापर्यंत सोडून देतील.’’

‘‘मी थोडा थांबतो इथे, मग जातो. ट्रक्स आणखी कुठे जातात?’’ त्याने विचारलं.

‘‘बार्सिलोनाकडे.’’ मी म्हणालो.

‘‘तिकडे तर माझं कुणी ओळखीचं नाहीये. तरी मी तुमचा खूप खूप आभारी आहे.’’ तो म्हणाला.

निस्तेज हरवलेल्या डोळ्यांनी त्याने एकवार माझ्याकडे पाहिलं. मग आपली काळजी कुणाला तरी शेअर करण्यासाठी तो पुन्हा म्हणाला, ‘‘मला विश्वास आहे, मांजर तिचा रस्ता शोधून घेईल. मांजरी सक्षम असतात, पण बकऱ्यांचं कसं होईल? तुम्हांला काय वाटतं, बकऱ्या कसं करतील?’’

‘‘मला तर वाटतं की, तुमचे सगळेच प्राणी ह्या आपत्तीत सहीसलामत राहतील.’’

‘‘असं म्हणता? कशावरून?’’

‘‘का नाही?’’ दूरवर नदीकाठी नजर फिरवत आणि आता तिथे कोणत्याही घोडागाड्या नसल्याचं पाहत मी म्हणालो.

‘‘म्हणजे तोफेचे गोळे, त्यातून कसे वाचतील ते? मला तर त्यासाठीच काढून दिलं नं तिथून?’’

‘‘कबुतरांच्या पिंजऱ्याचं दार उघडून आलात नं तुम्ही?’’ मी विचारलं.

‘‘हो.’’

‘‘मग ते तर उडून जातील.’’

‘‘हो. पण बाकीच्यांचं काय ?मला वाटतं, आता बाकीच्यांचा विचार मी सोडूनच द्यावा.’’

‘‘हं, तुमचा आराम झाला असेल तर तुम्ही आता लवकर निघा, बाबा. हळूहळू पूल पार करण्याचा प्रयत्न करा. मला निघावं लागेल,’’ मी म्हणालो.

‘‘आभार.’’ तो म्हणाला व उठून उभा राहिला. पण त्याचे पाय थरथरले व पुन्हा मटकन् तो खाली बसला.

‘‘मी तं केवळ त्यांचं संगोपन करत होतो,’’ तो आता मनाशीच बडबडत होता. केवळ त्यांचं संगोपन.

आता त्याच्यासाठी काही करायचं शिल्लक उरलं नव्हतं. तो ईस्टरचा रविवार होता. फॅसिस्ट फौजा वेगाने एब्रोच्या दिशेने कूच करत होत्या. त्या दिवशी आभाळात राखाडी रंगांचे ढग खूप खाली येऊन थांबल्याने शत्रूची विमानं उड्डाणं भरणार नव्हती. ही एक गोष्ट आणि मांजरं आपली देखभाल स्वतः करू शकतात हा एक विचार.

–बलवत्तर नशिबाच्या नावे म्हाताऱ्याच्या बाजूला केवळ इतकंच उरलं होतं.

❑

(रचना समय : सप्टेंबर २०१८. हिंदी अनुवाद : सुशांत सुप्रिय. मराठी रूपांतर : वर्णमुद्रा)





**तत्त्वभान**

**श्रीनिवास हेमाडे**

**किंमत : ₹ ६८०/–**

**सवलतीत ₹ ६००/– ला पोस्टेजसह घरपोच मिळेल.**

**संपर्क : वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स, शेगाव, जिल्हा बुलढाणा ९९२३७२४५५०**

**नमूद केलेला मोबाईल नंबर ९९२३७२४५५० हाच व्हॉटसअॅप नंबर आहे, पत्ता त्यावरच कळवता येईल.**

**अकाउंट डिटेल्स :**

VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK

**किंवा**



# फ्लोरियन झेल्लर


## समीर नारायण मोने



एक माणूस आहे. फक्त पंचेचाळीस वर्षांचा. फक्त म्हणण्याचे कारण असे की, तो एक लेखक आहे.. वाङ्मय सृष्टीत पंचेचाळीस हे वय 'फक्त' म्हणण्यासारखेच. वयाच्या बाविसाव्या वर्षापासून तो लिहीत आलेलाच आहे. अतिशय गुणसंपन्न, दर्जेदार आणि तरीही लोकप्रिय असे वेगळ्याच प्रकारचे लेखन तो करतो. लेखनाच्या विविध प्रांतात तो मुशाफिरी करतो. त्याची घोडदौड अतिशय जोमदारपणे सगळीकडेच चालू असते.. त्याने अनेक कादंबऱ्या, नाटके लिहिली आहेत. सिनेमांच्या पटकथाही तो लिहितो, तो फक्त लेखकच नाही तर दिग्दर्शकही आहे. आपली नाटके तर त्याने दिग्दर्शित केली आहेतच, पण स्वतःच्या नाटकांवर आधारित दोन सिनेमांचेही त्याने दिग्दर्शन केले आहे. अशा या सर्वगुणसंपन्न माणसाचे–लेखकाचे नाव आहे फ्लोरियन झेल्लर.

फ्लोरियन झेल्लर हा फ्रेंच माणूस. फ्रेंच भाषेतून तो लिहितो. पण जागतिक वाङ्मयात आज त्याने मानाचे स्थान पटकावलेले आहे. नाट्यविश्वातील एक अतिशय महत्त्वाचा नाटककार म्हणून तो गणला जातो. एकंदरीत पंचेचाळीस भाषांतून त्याच्या साहित्याचे, विशेषतः नाटकांचे अनुवाद झालेले आहेत. त्या नाटकांचे प्रयोग झालेत. त्याच्यावर तसेच त्या प्रयोगावरही पुरस्कारांची खैरातच होतेय. झेल्लर हा नाटकातील एक चमत्कार आहे असे म्हणायला काहीच हरकत नाही. त्याचे लिखाण एक वेगळेच रसायन आहे. ते तिरकस आहे, मर्मग्राही आहे, तरीही हृदयाला भिडून अस्वस्थ करून मानवी भावनांचा एक अनोखा पट ते निर्माण करते. ते घाबरवणारेसुद्धा ठरते, कारण ते अगदीच सगळ्या माणसांच्या जीवनाशी निगडित वाटते आणि मग आपल्या आयुष्यातही असे घडू शकते असे वाटून हरेक व्यक्तीला

हादरवून टाकते, दचकवते. म्हणूनच ते लिखाण वैश्विक ठरते. याचमुळे जगातल्या इतक्या म्हणजे पंचेचाळीस भाषांत त्या लिखाणाचे भाषांतर होते आणि गाजते. अगदी मराठीतही त्याच्या नाटकांची भाषांतरे, अनुवाद, रूपांतरे होऊन त्यांचे प्रयोगही झालेत. ते प्रचंड यशस्वीही ठरले आहेत. हा माणूस आणि त्याचे लिखाण हे एक अजबच प्रकरण आहे. वयाच्या पंधराव्या वर्षी या मुलाला दम्याचा अटॅक आला, जोरदार झटका होता तो. त्या झटक्यामुळे त्याच्या मेंदूला रक्तपुरवठा कमी होऊन हा मुलगा कोमात गेला, काही दिवस तो कोमात होता. त्यामुळे त्याच्यात आमूलाग्र बदल घडला. जीवनाला पूर्ण कलाटणी देणारा तो प्रसंग होता. झेल्लर स्वतः या प्रसंगाबद्दल टिप्पणी करतो की, ''त्या क्षणामुळं, त्या घटनेमुळे त्याच्या आयुष्यात काळजी (मानवजातीबद्दल) आणि लिखाण घुसलं.''




हा मूळचा कादंबरीकार पुढे नाटककार म्हणून नावारूपाला आला. तो लिखाणातील चमत्कार आहे, असे मगाशी म्हटलं, त्या गोष्टीवर कुणाचाही विश्वास चटकन बसेल. या माणसाने लहानपणी फारसे काही वाचलं नाही की नाटकं बघितली नाहीत. नाट्यसृष्टीत वावरण्याचं तर फार दूरच. तो सांगतो, ''घरात संस्कृती, कलासंस्कृती असं काही अस्तित्वातच नव्हते. पुस्तकेही फारशी नव्हती. पण लहानपणी वेगळ्याच प्रकारे गोष्टी, कहाण्या मला सामोऱ्या आल्या. याला कारणीभूत माझी आई. माझे इंजिनीयर वडील जर्मनीत काम करायचे आणि मी आई सोबत फ्रान्स मध्ये राहायचो. तिच्या अंगांगात नाटक भिनलेले होते. तिला टैरो कार्ड वापरून, वाचून भविष्य सांगता येत असे. तिच्यामुळेच विविध घटनांचा अर्थ कसा लावायचा, लोकांना अर्थपूर्ण निवेदन कसं करायचे. कहाण्या कशा पटवून द्यायच्या, हे मी शिकलो.''

अतिशय मान्यवर अशा शास्त्रीय संशोधन संस्थेत झेल्लरला प्रवेश मिळाला होता. तिथे तो शिकतही होता. पण त्याचे मन काही तिथे रमेना. तेथून तो बाहेरही पडला. त्याला स्वतःच्या लिखाणावर लक्ष केंद्रित करायचे होते. विसाव्या वर्षी त्याने पाऊल उचलले. पुढे तेविसाव्या वर्षी तो सगळ्यात तरुण शिक्षक म्हणून त्या संस्थेत कामही करू लागला. पण तोवर त्याने लिखाणाला सुरुवात केली होती आणि तो गाजूही लागला होता.




वयाच्या बाविसाव्या वर्षी झेल्लरने 'आर्टिफिशियल स्नो' ही आपली पहिली कादंबरी लिहिली. त्याची तिसरी कादंबरी 'द फॅसिनेशन ऑफ एव्हिल' प्रचंड गाजली. फ्रान्समध्ये घराघरात झेल्लर हे नाव पोचले. फ्रान्समधील साहित्य क्षेत्रातील प्रतिष्ठेच्या 'प्रिक्स गोंकोर्ट' या पुरस्कारासाठी या कादंबरीचे नामांकनही झाले. २००७ मध्ये त्याला याच कादंबरीसाठी 'प्रिक्स इंटराली' हा पुरस्कारही प्राप्त झाला. या नंतरही त्याने अजून दोन कादंबऱ्या लिहिल्या. परंतु या यशानंतर तो कादंबरीलेखनात फारसा रमला नाही. तो नाट्यलिखाणाकडे वळला. झेल्लरने त्या क्षेत्राकडे जवळपास पाठच फिरवली. त्याच्या म्हणण्यानुसार तो त्या कादंबऱ्यांतून स्वतःशी नाळ बांधू शकेनासा झाला, त्यात त्याला जी प्रसिद्धीची चौकट मिळाली




त्यातही तो स्वतःला, स्वतःच्या प्रतिमेत बसवू शकत नव्हता. म्हणून त्याने कादंबऱ्यांकडे पाठ फिरवली. ''मला यश मिळालं पण तरीही आपण नाहीसे व्हावं ही भावना, कादंबऱ्यांमुळे बळावली.'' असं झेल्लर सांगतो. हा खरा विरोधाभास, स्वतःला झाकून व्यक्त होण्याचं माध्यम म्हणून मग तो रंगभूमीकडे वळला आणि त्याला ते एकदमच भावलं. पण तेही त्याच्या आयुष्यात अपघातानंच आलं. त्याला एक ऑपेरा लिहिण्यासाठी गळ घालण्यात आली. त्या आधी त्याला रंगभूमी, रंगमंचाची फारशी ओढ नव्हती. पण त्याचं संगीतावर फार प्रेम होतं. त्या प्रेमापोटी त्यानं ऑपेरा लिहिण्याचं मान्य केलं. पण मग त्याच्यावर या क्षेत्राची मोहिनीच पडली. गारूड झालं. तो म्हणतो, ''सरते शेवटी मला जगायचा मार्ग सापडला. एकट्यानं स्वतःच्या धुनकीतून कादंबरी लिहिण्यापेक्षा दिग्दर्शक, नट, प्रेक्षक, सादरीकरण यांचा विचार करत नाटक रचणं त्याला जास्त समर्पक वाटले.''

२००४ मध्ये त्याचे पहिले नाटक मंचस्थ झाले. 'ल औत्र' आणि मग जवळपास दरवर्षी त्याचे एक नाटक येतच राहिले. पण त्याचे सर्वात गाजलेले नाटक म्हणजे 'द फादर'(Le P²re). हे २०१२ मधले नाटक. हे जगभर गाजले. २०१४ मध्ये लंडन तर २०१६ मध्ये न्यूयॉर्कमध्ये ते रंगभूमीवर आले, गाजले. २०२० मध्ये त्यावर सिनेमाही निघाला, ज्याची पटकथा आणि दिग्दर्शनही झेल्लरचेच होते. झेल्लरने आतापर्यंत एकूण १४ नाटके लिहिली आहेत. पण झेल्लर जगभर पोचला तो खऱ्या अर्थानं 'फादर'मुळेच. अत्यंत अस्वस्थ करणारा तो अनुभव कुणीच नाकारू शकत नाही. त्याच्यावर पारितोषिकांचा वर्षाव झाला. २०१४ मध्ये या फ्रेंच नाटकाला सर्वोत्कृष्ट नाटकाचा फ्रान्समधला सर्वोकृष्ट पुरस्कार 'मोलिएर अवॉर्ड' मिळाले. लंडनमध्ये गार्डियनने त्याला 'वर्षातील सर्वोत्कृष्ट नाटक म्हणून गौरविले. अमेरिकेत ब्रॉड वेवर लेखनासाठीच्या 'टोनी अवॉर्ड'साठी त्याचे नामांकन झाले. इंग्रजी रूपांतर 'ख्रिस्तोफर हॅम्पटन'ने केले. तो फ्रेंच 'फादर' बघून भारावून गेला होता. खरंतर 'मदर', 'फादर' आणि 'सन' अशी त्रिनाट्यधाराच निर्माण केली झेल्लरने. पण खऱ्या अर्थाने गाजले ते 'फादर' हेच नाटक. त्यावर २०२० साली जो सिनेमा निर्माण झाला, त्यात काम केलेल्या अँथनी हॉपकिन्स या नटाला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचे ऑस्कर मिळाले तर झेल्लरला आधारित पटकथेचे. ऑतिविया कोलमनला अभिनेत्रीसाठी ऑस्कर नामांकन होते. 'फादर' सिनेमा व नाटक सर्वत्र तुफान गाजले. अगदी भारतातही वेगवेगळ्या भाषांत त्याचे प्रयोग झाले. ग्लाडेन ग्लोब वॉर्डस्मध्येही सिनेमाला चार नामांकने होती. 'द टाइम्स'ने 'दशकातील महान सिनेमांपैकी एक' असा त्याचा गौरव केला. फोर्बस्ने २१ व्या शतकातील 'उच्च १५० सिनेमांत' त्याचा समावेश केला.



'सार्वकालिक ३० उत्कृष्ट सिनेमां'तही त्याचे नाव आहे.

'फादर' मध्ये असे काय आहे की त्याचा एवढा गौरव व्हावा. तर सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे त्यातील वैश्विक सत्य. डिमेन्शिया या आजाराचे भयावह सत्य चित्रण. विस्मरणाच्या आजाराने ग्रस्त माणसाच्या दृष्टिकोनातून केलेले चित्रण हा एक वेगळाच दृष्टिकोन, हे नाटक वाचताना, सिनेमा-नाटक बघताना सगळ्याच ठिकाणच्या प्रेक्षकांना आपली आई-बाप-आजी आठवतात आणि भीती दाटून येते, आपलेही असे तर होणार नाही ना? बाकी अभिनय वगैरे गोष्टी झकास आहेतच, पण त्यातील आशय फारच अस्वस्थ करून जातो. 'फादर' आणि एकंदरीत लिखाणाची प्रेरणा हेराल्ड पिंटर या ज्येष्ठ नाटककाराच्या लिखाणातून तसेच 'थिएटर ऑफ ॲब्सर्ड' चळवळीतून मिळाल्याचे झेल्लर आवर्जून नमूद करतो. शिवाय झेल्लर आपल्या लिखाणातून कसलाही उपदेश, भाष्य करत नाही. फक्त तो वेगवेगळ्या पात्रांच्या दृष्टिकोनांतून प्रसंग मांडत जातो. तिरकस आणि विचक्षण अशा आपल्या शैलीतून. त्याच्या लिखाणाबद्दल फ्रेंच नाटकातील एक अभिनेता म्हणतो की, फार थोड्या शब्दांत तो भावनांचे जबरदस्त दर्शन घडवतो.

खुद्द झेल्लर 'फादर'बद्दल बोलताना म्हणतो- ''मला काय म्हणायचं ते अगदी शेवटी मला आकळलं. या नाटकाने प्रेक्षकांच्या मनातही (डिमेंशियाग्रस्त नायकाप्रमाणे) गोंधळ, शंका निर्माण होते, की नेमकं आपल्याला काय कळतंय? मी छोट्या छोट्या कपारी वाचकाच्या मनात निर्माण करू बघतो, ज्यात ते स्वतःच आपल्या स्थानाचा शोध घेऊ बघतात. काहीतरी हातात गवसतंय, असं वाटत असतानाच एकदम मार्गच बदलतो आणि तुमच्या हातून सगळंच निसटून जाते.'' आणि तो हे जे सांगतोय, ते सगळंच झेल्लर साध्यही करतो. त्यातून एक विचित्र विनोदही तयार होतो. पण तो विनोद बोचरा आणि तितकाच करूणही असतो हे झेल्लरचे कसब, तो 'फादर'ला उपशीर्षक देतो. तेही अत्यंत उपरोधिक 'एक दुःखी प्रहसन.' खरोखर अत्यंत यथार्थ.

५ कादंबऱ्या, १४ नाटके आणि २ सिनेमे झेल्लरने बनवली. तो अजूनही खूप रचना करेलच. या शतकातला तो एक महान रचनाकार आहे. २०२३ सालांत फ्रान्समधली सर्वोत्कृष्ट उपाधी, किताब त्याला बहाल करण्यात आला. 'फ्रान्स लेजन ऑफ ऑनर'. खरंतर तो या विश्वाचा 'लेजंड ऑफ ऑनर' आहे.

❑




# डॉ. नंदकुमार मुलमुले यांची मुलाखत

## अथर्व देशमुख



नमस्कार माझं नाव अथर्व. आज आपल्यासोबत जॉईन झालेले आहेत डॉ. नंदू मुलमुले सर. आणि ही त्यांनी लिहिलेल्या 'सिनेमा पॅराडिसो' या पुस्तकासंदर्भातील मुलाखत आहे. सर, थँक्यू, तुम्ही जॉईन झालात आणि मुलाखतीला होकार दिलात. सरांचे हे पुस्तक इटालियन दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेल्या सिनेमांवरील पुस्तक आहे. पुस्तक मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केले आहे आणि हे पुस्तक २०२१ साली प्रकाशित झाले आहे. मी सरांचा परिचय करून देतो : डॉक्टर नंदू मुलमुले यांनी मनोविकारशास्त्रात एम.डी.चे पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीत दहा वर्षे काम केले आहे. वेगवेगळ्या वृत्तपत्रांत त्यांनी लेखन केले आहे. त्यांनी आत्तापर्यंत 'जग बदलणाऱ्या मनाच्या प्रयोगशील कथा', 'मनांतरी', 'रचनेच्या खोल तळाशी', 'संभ्रमाचे सांगाती' ही पुस्तकं लिहिली आहेत आणि अर्थातच ज्याबद्दल आपण बोलणार आहोत, ते 'सिनेमा पॅराडिसो' हे पुस्तकसुद्धा त्यांनी लिहिले आहे. या पुस्तकात सरांनी त्यांना आवडलेल्या इटालियन दिग्दर्शकांनी दिग्दर्शन केलेल्या चित्रपटांवर लिहिले आहे. या पुस्तकात सरांनी एकूण नऊ चित्रपटांवर लिहिले आहे. ते नऊ चित्रपट पुढीलप्रमाणे – 'सिनेमा पॅराडिसो', मला वाटतं या सिनेमाच्या नावावरूनच पुस्तकाला नाव देण्यात आले आहे, 'अ प्युअर फॉर्मलिटी', 'मलेना', 'द स्टार मेकर', या चारही चित्रपटांचे दिग्दर्शक ज्युसेप्पे टोर्नेटोर हे आहेत,

'ब्लो अप' या सिनेमाचे दिग्दर्शक मायकेल अँजेलो अँटोनियोनी हे आहेत. 'उंबेर्तो डी' या चित्रपटाचे दिग्दर्शक व्हिटोरियो डी सिका हे आहेत, 'ला स्ट्राडा', 'एट अँड हाफ', या दोन्ही चित्रपटांचे




दिग्दर्शक फेडरिको फेलिनी हे आहेत आणि 'जर्मनी इयर झिरो', या चित्रपटाचे दिग्दर्शक रॉबर्टो रोजेलिनी हे आहेत. या सर्व चित्रपटांचे दिग्दर्शक इटालियन असले, तरी 'अ प्युअर फॉरमॅलिटी' हा चित्रपट फ्रेंच भाषेतील आहे आणि 'ब्लो अप' हा चित्रपट इंग्लिश भाषेतील आहे. पुस्तकाच्या कव्हरवरील फोटो हा 'स्टारमेकर' या चित्रपटातील आहे, ज्याबद्दल सरांनी पुस्तकात लिहिलेलेच आहे. या पुस्तकात सरांनी प्रत्येक चित्रपटाचे कथानक आणि त्यांना त्या चित्रपटाबद्दल काय वाटले, त्यांचे त्याबद्दलचे opinion काय आहे, याबद्दल सांगितले आहे. पुस्तकात सरांनी सिनेमाबद्दल लिहिले आहेच, पण गेस्टाल्ट किंवा व्यूहमानसशास्त्र, अस्तित्ववाद, पोस्ट-मॉडर्निझम, नववास्तववाद, अतिवास्तववाद या संकल्पनांबद्दलसुद्धा लिहिले आहे, याबद्दल आपण मुलाखतीत बोलणारच आहोत. सर, पहिला प्रश्न हाच की अशा प्रकारे सिनेमांवर आणि तेही फक्त इटालियन दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेल्या सिनेमांवर लिहावे असे तुम्हांला का वाटले?

**डॉ. मुलमुले :** पहिली गोष्ट अशी आहे की, पाश्चात्त्य चित्रपट ज्याला आपण वर्ल्ड सिनेमा म्हणतो, म्हणजे थोडक्यात कलात्मक दर्जा असलेले जागतिक कीर्तीचे आणि जागतिक सिनेमा म्हणजे विविध देशातले सिनेमा, हा विषय मला पहिल्यापासून आकर्षित करीत होता. आपल्याकडे जे काही इंग्रजी सिनेमे उपलब्ध व्हायचे, तेवढे सिनेमे लहानपणी पाहायचा प्रयत्न केला. आणि अर्थातच उपलब्धता सीमित होती, जे सिनेमे मुंबईच्या फक्त काही ठरावीक न्यू एम्पायर, न्यू एक्ससेंचर, स्टर्लिंग, रिगल्स, strand एवढ्या चित्रपटगृहांत लागायचे. ही गोष्ट मी १९८०-८५ सालची करतो आहे. तेव्हा इतर छोट्या गावांमध्ये हे सिनेमे येणं दुरापास्त. जेव्हापासून इंटरनेट खुलं झालं, आणि पाश्चात्त्य चित्रपट आपल्याला बघायला मिळाले. पाश्चात्त्य चित्रपटांमध्ये युरोपियन आहेत, अमेरिकन आहेत, आफ्रिकन आहेत, कोरियन आहेत, चायनीज आहेत, जपानी आहेत, इराणी आहेत. अशा स्वरूपाचे चित्रपट ज्याला आपण जागतिक सिनेमा म्हणतो, याच्यामध्ये कलात्मक चित्रपट, खरं सांगायचं तर माझ्या दृष्टीने चित्रपटाच्या कॅटॅगरीज् दोनच. चांगला चित्रपट आणि वाईट चित्रपट. चांगला चित्रपट तो जो तुम्हांला एंटरटेन करतो, म्हणजे तुमचं मनोरंजन करतो, त्याव्यतिरिक्त तुम्हांला काहीतरी एखादी आत्मदृष्टी देऊन जातो, जो चांगला चित्रपट नाही, कोणालाही वाईट चित्रपट काढायचा नसतो; पण तो वाईट होतो, कारण काही अंगावर विचार केला जात नाही किंवा काही जुन्याच गोष्टी वापरल्या जातात, म्हणून मग तो वाईट चित्रपट. त्याच्यामुळे कमर्शियल आणि पॅरलल किंवा मेनस्ट्रीम सिनेमा आणि काय म्हणतात त्याला, प्रायोगिक सिनेमा, एक्सपेरिमेंटल, अशी काही कॅटेगिरी मानत नाही मी. एक साधं उदाहरण मी देतो- आपल्याकडे बिमल रॉय यांनी काढलेले चित्रपट हे जरी मेनस्ट्रीम सिनेमा असले, म्हणजे त्याच्यामध्ये कथा आहे, गाणी आहेत, हीरो-हीरोइन, कधी कधी आहेत कधी कधी नाहीत; पण तो एंटरटेनिंग सिनेमा होता आणि तो अत्यंत कलात्मक सिनेमा होता.

म्हणजे बिमल रॉय उगाचच दाढी वाढवून आणि खांद्यावर शबनम बॅग बाळगून कधी हिंडले

नाहीत, पण त्यांनी काढलेले 'दो बिघा जमीन', 'प्रेमपत्र', त्याच्यानंतर 'बंदिनी' हे असे सिनेमे होते, हे जागतिक कलात्मक चित्रपटाच्या रांगेत जाऊन बसू शकतात. त्यामुळे चित्रपटाच्या कॅटेगरीज् दोनच – चांगला आणि वाईट. आता हा जो चांगला सिनेमा आहे, तो जगभर निघतो. त्या सिनेमाचा अभ्यास इंटरनेट ओपन झाल्यापासून सगळ्यांना उपलब्ध झाला आणि तो मीही पाहायला लागलो. मला या चित्रपटांवर लिहावंसं वाटलं, याचं कारण असं की सर्वसामान्य वाचकाची हे सगळं माहीत करून घेण्याची अत्यंत मोठी भूक आहे. दुर्दैवाची गोष्ट आहे की, चित्रपटांवर लिहिणारे फार कमी लोक आहेत. आणि अशा चित्रपटांना ज्यांना आज यूट्यूबच्या माध्यमातून पाहताही येते, पण पाहता येत नसतं, तरी त्या चित्रपटांविषयी जाणून घ्यायची अपार इच्छा वाचकांमध्ये आहे. वाचकांची तर पुढची गोष्ट झाली, मला स्वतःला असं वाटलं की हे इतके सुंदर सिनेमे आहेत की यांच्यावर आपण लिहावं. मग भले कुणी वाचो न वाचो किंवा ज्याला वाचावंसं वाटलं तो वाचेल, तो पुढचा भाग. पण यांच्यावर लिहावं वाटलं कारण ते चॅलेंजिंग आहे. आणि मी मुळात एक मानसशास्त्रज्ञ, मानसरोगतज्ज्ञ असल्यामुळे माणसाच्या मनाच्या अंतरंगाचं जे सखोल दर्शन मानसशास्त्र अभ्यासकाला, जो अभ्यासक आहे, त्याला होतं, ते इतरांना सांगणं, म्हणजे जे मला आवडलं ते इतरांना सांगणं, याची एक अनिवार हौस एक लेखक म्हणून मला आहे. आणि त्या दृष्टीने मी या चित्रपटांवर लिहायला सुरुवात केली. कारण या चित्रपटांवर याच्यापूर्वी कुठेही मराठीत मी वाचलेलं नाही, नव्हतं. उदाहरणार्थ 'उंबेर्तो डी'वर कोणी लिहिल्याचं मला आठवत नाही. 'eight and half' वर कोणी लिहिल्याचं मला आठवत नाही. आणि 'जर्मनी झिरो इयर' इतका सुंदर सिनेमा १९४७ साली तयार झाला, त्याच्यावर कोणाला लिहावंसं का वाटलं नाही? इतका सुंदर सिनेमा. त्याच्यामुळे मला असं वाटलं की लोकांना जाणून घेण्याची इच्छा आहे, मला लिहिण्याची इच्छा आहे, मला त्याच्यामध्ये असे खूप विविध पैलू दिसत आहेत, की ज्यांच्यावर लिहिलं पाहिजे. म्हणून मग इटालियन चित्रपटांवर मी, कारण मी इटालियन चित्रपट आधी पाहिले, 'सिनेमा पॅराडिसो' पाहिला, मग मला ज्युसेपे टोर्नेटोर हा जो दिग्दर्शक आहे, त्याचा ' मलेना ' पाहिला. मला तो आवडला म्हणून मग याचे अजून कुठले आहेत, हा इतका चांगला दिग्दर्शक आहे, मग याचा 'अ प्युअर फॉर्मलिटी' आहे. मग विचार केला याचा अजून कुठला आहे का, तर 'स्टार मेकर' गाजलेला आहे. मग तोही पाहिला.आणि त्या प्रत्येक चित्रपटावर कोणीही लिहिलेलं नाही, ज्युसेपे टोर्नेटोरबद्दल मराठी वाचकांना माहिती नाही. एक लेख लिहिला, मग दुसरा, तिसरा, चौथा. मग इटालियन चित्रपटांचे दालन आहे, ते इतकं समृद्ध आहे, त्याच्यामध्ये मी अजून व्हिटोरिओ डी सिकाला हातच लावला नव्हता, फेलीनीला हातच लावला नव्हता, रोसेलीनीला हातच लावला नव्हता. मायकेल एन्जलो अँटोनियोनी हा आपल्याला माहितीही नाहीये, इतका मोठा दिग्दर्शक आहे. त्याने सिरीज काढलेली आहे तीन सिनेमांची, ज्यांच्यावर बासू भट्टाचार्य यांची सीरिज् आहे. असे अनेक चित्रपट आहेत, असे अनेक दिग्दर्शक आहेत. व्हिटोरिओ डी सिका म्हणजे इटालियन चित्रपटाचा पितामह, ज्याच्या चित्रपटांवरनं सत्यजित रे यांना स्फूर्ती मिळाली, म्हणजे त्याचा 'बाइसिकल थीफ' हा जगात गाजलेला चित्रपट. तेव्हा मग हळूहळू मी इटालियन चित्रपटांवरच लिहायचं आणि पुस्तक करायचं ठरवलं, कारण चित्रपटांवर लिहिणारे खूप लोक असतात, पण त्याच्यात सुपर स्पेशलायझेशन करायचं, तर आपण असं करूया की इटालियन चित्रपटाचाच एक कोलाज तयार करूया, म्हणून एक, दोन, तीन, चार, पाच, सहा. मग मी लिहीत गेलो. आणि मला जे आवडले ते ते टाकले आहे. ज्युसेपेचे चार आवडले तर चार टाकले. मला लोकांनी विचारलं, एका दिग्दर्शकाचे चार आणि बाकीच्यांचे? मी म्हणालो, ठीक आहे, जेवढे जेवढे

आवडले. आता कसे आहे, ‘बायसिकल थीफ’वर इतक्या जणांनी लिहून झाले आहे, आमच्या भाषेमध्ये त्याचा ‘रसिक बलमा’ झालेला आहे. एखादे गाणे ऐकून ऐकून त्याचा कंटाळा, वीट येईपर्यंत ऐकायला लागावं, म्हणजे त्याचा ‘रसिक बलमा’ होणे. म्हणून मग मी म्हटलं, व्हिटोरियो डी सिकाच्या दुसऱ्या सिनेमावर लिहू. मग मला ‘उंबेर्तो डी’ सापडला. फेलिनीवर तर मराठीत कोणी लिहिलेच नाही. ‘ला स्त्राडा’वर कोणाचा तरी एक लेख आहे, असे आठवते. परंतु ‘एट अँड हाफ’सारखा सिनेमा, जो सिनेमा समजतसुद्धा नाही; पण एकदा समजला की माणूस त्याच्या प्रेमात पडतो. आणि मग तो खजिना सापडला. मग इटालियन चित्रपटांवरच नऊ लेखांचं एक पुस्तक तयार झालं.

**अथर्व** : सर, तुम्ही त्याबद्दल बोललेच आत्ता. ज्युसेपे टोर्नेटोर या दिग्दर्शकाने दिग्दर्शित केलेल्या चित्रपटांवर चार लेख आहेत. पुस्तकातील एकूण नऊ लेखांपैकी चार लेख एकाच दिग्दर्शकावर आहेत. त्याबद्दल काही सांगू शकाल का?

**डॉ. मुलमुले** : त्याबद्दल मी सांगितलेच. मी एक पाहिला, दुसरा पाहिला, तिसरा पाहिला, चौथाही पाहिला. मी आत्तापर्यंत पाचशे-सहाशे पाश्चात्त्य सिनेमे पाहिले असतील. प्रत्येक सिनेमावर तुम्हांला लिहावं वाटत नाही.पण ज्या सिनेमावर लिहावं वाटलं त्या सिनेमावर मी आवर्जून लिहिलं. ज्युसेपे टोर्नेटोरच्या ‘सिनेमा पॅराडिसो’ला ऑस्कर मिळालं, मात्र ‘मलेना’ला मिळालं नाही. ‘स्टारमेकर’ला मिळालं नाही. ‘प्युअर फॉर्मलिटी’ हा इतका चांगला सिनेमा असूनही त्याकडे दुर्लक्ष झालं, म्हणून मग असं म्हटलं की ज्या चित्रपटांना ऑस्कर नसेल मिळालं किंवा इतर मोठे मानसन्मान मिळाले नसतील, तरीसुद्धा ते सिनेमे लोकांपर्यंत जायला पाहिजे. कारण ऑस्कर मिळण्यामध्ये अनेक पैलू असतात. त्यामध्ये इतर अनेक गणितं असतात. दरवर्षी ते काही इटालियन चित्रपटाला देणार नाहीत. इतरही कॉम्पिटिशनमध्ये असतात. थोडंफार मागेपुढे होतं. त्याच्यामुळे कदाचित हे सिनेमे इतके लाइमलाईटमध्ये आले नसतील. पण म्हणून मग मी विचार केला की मग ज्युसेपे टोर्नेटोरवरच चार लेख लिहायचे. त्याने आपल्या आयुष्यात साधारणपणे १५ सिनेमे तरी काढले असतील. तर माझ्या मनात विचार आला, त्यावरच एक पुस्तक का करू नये. पण त्याचे इतर सिनेमे मला इतके भावले नाहीत. त्याच्यामुळे मी विचार केला की, ‘इटालियन सिनेमा’ हे सबटायटलिंग घेऊ. जपानी दिग्दर्शक अकिरा कुरोसावा याचा प्रत्येक चित्रपट हा एक हिरा आहे. आणि अकिरा कुरोसावाच्याच दहा चित्रपटांवर एक पुस्तक होईल इतका तो मोठा दिग्दर्शक आहे. सध्या मी इराणी चित्रपटांवर लिहितोय. इराणी चित्रपटांमध्ये माजिद माजिदी हा असा एक दिग्दर्शक आहे, ज्याच्या एकट्याच्या सिनेमावर पुस्तक होऊ शकेल. तर अशी गोष्ट ज्युसेपे टोर्नेटोरबद्दल मला वाटली नाही, म्हणून मग इतर इटालियन दिग्दर्शकही या पुस्तकात घेतले. असा हा प्रवास झाला.

**अथर्व** : सर, तुम्ही पुस्तकात मांडलेल्या ज्या संकल्पना आहेत, गेस्टाल्ट किंवा व्यूहमानसशास्त्र, अस्तित्ववाद, पोस्टमॉडर्निझम, नव वास्तववाद आणि अतिवास्तववाद, तर या चळवळींबद्दल किंवा संकल्पनांबद्दल सांगू शकाल का?

**डॉ. मुलमुले** : याच्यामध्ये पहिली संकल्पना चित्रपटाशी निगडित आहे आणि इतर मानसशास्त्राशी निगडित आहेत. मी जेव्हा सिनेमा पाहतो तेव्हा एक मानसशास्त्रज्ञ म्हणूनही पाहत असतो. आणि मला त्याच्यात मानसशास्त्राच्या काही संकल्पना, काही बीजं लपलेली दिसतात. मग त्याच्याविषयी मी लिहितो. कारण हा एक दृष्टिकोन आहे जो इतरांजवळ नाहीये. त्यामुळे इतर जण लिहीत नाहीत. लिहू

नाही शकत. कारण त्याला अभ्यास लागतो त्या विषयाचा. तो माझा अभ्यास असल्यामुळे मला– उदाहरणार्थ मायकेलअँजेलो अँटोनियोनी चा 'ब्लो अप' नावाचा सिनेमा आहे. हा सिनेमा या गेस्टाल्ट संकल्पनेवर आहे. गेस्टाल्ट म्हणजे, ही एक जर्मन संकल्पना आहे, ती असं सांगते, हे जग जसं आहे, तसं आम्हाला दिसत नसून आम्ही जसं पाहतो तसं हे जग आमच्यासाठी आहे. आणि हे समजणं अतिशय सोपं आहे. प्रत्येकाचं जग हे त्याच्या नजरेतून त्याला जे दिसत आहे ते आहे. इतरांना तेच जग, तीच घटना, तेच लोक वेगळ्या प्रकारे दिसत असतात, प्रत्येकाला. याला गेस्टाल्ट म्हणतात. केशवसुतांच्या कवितेच्या ओळी अशा आहेत की,

**विश्वाचा विस्तार केवढा**
**ज्याच्या त्याच्या डोक्याएवढा**
**सृष्टिकेंद्रके कवण्या ठायी**
**ज्याच्या त्याच्या आहे हृदयी**

म्हणजे आपलं विश्व आपल्या डोक्यापुरतं – Your eyes cannot see what your brain does not know. Your eyes will only see what your brain wants to see.

अशा दोन गोष्टी आहेत. म्हणजे ज्याचं ज्ञान तुम्हांला नाही ते तुम्ही पाहू नाही शकत कारण तुम्हांला माहितीच नाही हे काय आहे. आणि तुम्हांला तेच दिसतं जे तुम्हांला बघायचं असतं. उदाहरणार्थ, दोन मित्रांचं भांडण झालेलं आहे. आता हा मित्र त्या मित्राकडे दुरून पाहतोय आणि तो तिसऱ्याशी काहीतरी कुजबुजतोय. आता तो काही त्याच्या कामाचं बोलत असेल पण मला काय वाटतं, हा माझी निंदानालस्ती करतोय. आपले गैरसमज होतात. ते गैरसमज का होतात, कारण आपल्या मेंदूला तोच विचार करायचा आहे जो आपण करू इच्छितो. की हा वाईट आहे, हा माझ्याशी भांडला,आता हा दुसऱ्या सोबत कुजबुजतोय, म्हणजे हा माझी निंदानालस्ती करत आहे. म्हणजे–

My eyes are seeing what my brain wants to see.

त्याच्यामुळे एखादा अतिशय धार्मिक इसम आहे, आपल्याकडे या घटना पेपरमध्ये नेहमी येतात, पपई मध्ये गणपतीचं तोंड दिसलं, झाडाच्या खोडामध्ये हनुमानाचं तोंड दिसलं, आपल्याला लहानपणी चंद्राकडे पाहताना ससा दिसायचा. कारण आपल्याला सांगायचे की ससा आणि हरीण आहे त्याच्यामध्ये. तुम्ही रेल्वेमध्ये बसलात, तुमच्या डोक्यामध्ये एखादा विचार असतो आणि रेल्वेत थडक–थडक सुरू झालं, की तुम्हांला ते खंडाळ्याच्या घाटावरती– खंडाळ्याच्या घाटावरती तेच ऐकू येतं. तुम्हांला परदेशी–परदेशी गाणं ऐकायचं असेल तर त्या रेल्वेशी जुळवून घ्यायचं. मग पूर्ण प्रवास होईपर्यंत तेच गाणं ऐकू येतं. थोडक्यात म्हणजे जे आपल्या मेंदूत आहे तेच आपल्याला दिसतं. गेस्टाल्ट हा जो व्यूहमानसशास्त्राचा जो एक भाग आहे, तो असं सांगतो की जगात घटना घडतात त्या घटना आम्ही आमच्या मनाप्रमाणे इंटरप्रेट करतो आणि हा सिनेमा जो आहे तो पूर्ण या संकल्पनेवरती आहे. आणि याचा शेवट अतिशय अद्‌भुत आहे. तो सिनेमा प्रत्येकाने पाहिला पाहिजे. माझ्या पुस्तकातील लेख वाचून पाहिला तरी चालेल. मी तुम्हांला त्या लेखातील छोटे फिगर दाखवतो त्यावरून तुम्हांला कल्पना येईल, की व्यूहमानसशास्त्र कसं काम करतं. एक आकृती मी दाखवत आहे. आता ही आकृती पाहिल्यावर तुम्हांला आपोआप कळतं की आतमध्ये त्रिकोण आहे. खरं म्हणजे इथे तीन फेसेस आहेत.

याच्यामध्ये जागा रिकामी आहे. पण आपल्याला त्रिकोण दिसतो. याचं कारण असं की आमच्या मेंदूला अशा प्रकारची आकृती पाहायची सवय लागलेली आहे. तुम्हांला दुसरी आकृती दाखवतो. आता इथे ठिपके ठिपके आहेत. इथे आम्हाला आपोआप कुत्रा दिसतो. आता अजून एक आकृती बघा. आता आम्हाला याच्यामध्ये एक फुलदाणी ठेवलेली तरी दिसेल नाहीतर दोन माणसे एकमेकांकडे तोंड करून दिसतात. याला म्हणतात फोर ग्राउंड बॅकग्राऊंड. यावरून आपल्याला वेगवेगळ्या आकृत्या दिसतात. आता हे एक चित्र बघा. या चित्रामध्ये काही जणांना एक म्हातारी दिसेल आणि काही जणांना एक तरुणी दिसेल. तरुणी आणि म्हातारी, हे आपल्या पाहण्याच्या दृष्टिकोनावर अवलंबून आहे. हा चित्रपट एक रहस्यपट म्हणून सुरू होतो. एक फोटोग्राफर आहे आणि तो सहज असा कॅमेराने फोटो काढत सुटलेला आहे. आणि दूरवर त्याला एका बगीच्यामध्ये एक स्त्री दिसते, तिच्याबरोबर एक पुरुष आहे. आणि थोड्या वेळाने त्याला असं दिसतं की पुरुष नाहीसा झालेला आहे. तो तिथे फोटो क्लिक करत राहतो. तो घरी येतो आणि ते डेव्हलप करतो तेव्हा त्याला असं दिसतं की पुरुष नाहीसा कुठे झाला? तर त्याला त्या झाडीमध्ये एक पिस्तूल धरलेला हात दिसायला लागतो. तो फोटो तो इनलार्ज करत जातो. आणि जसा तो इनलार्ज करत जातो तशा विविध आकृत्या त्याला दिसायला लागतात. त्याला झाडाच्या खाली एक प्रेत पडलेलं दिसत. त्याला झाडातून एक पिस्तूल बाहेर आलेली दिसते. आता हे आहे की नाही? तुम्ही एखादा फोटो मॅग्निफाय केला तर त्याच्यात अनेक आकार तुम्हांला दिसतील. तुम्ही ढगाकडे पाहा. तुम्हांला त्यामध्ये राक्षस दिसतो, म्हैस दिसते, काय वाटेल ते दिसतं. तर याचं कारण असं आहे की तुमच्या मनामध्ये एक अनामिक शंका आहे की या स्त्रीबरोबरचा पुरुष कुठे गेला? आणि काहीतरी गूढ गोष्ट दिसते आहे इथे. तुम्ही खूप रहस्यकथा वाचलेल्या आहेत. तुम्हांला असे वाटत आहे की कोणी याला मारलं तर नाही? मग तुमच्या संकल्पनेप्रमाणे त्या गोष्टी 'ब्लो अप' केल्यानंतर त्या ठिपक्या-ठिपक्यांमध्ये, तुमचा मेंदूच रिकन्स्ट्रक्ट करतो त्या इमेजेस्

आकृती १ : क्लोझर किंवा समावेशनाचे तत्व :



आकृती २: समावेशन



आकृती ३: आकृती आणि आधारभूमी : चेहरे की फुलदाणी?





आणि त्या दिसायला लागतात. आता त्या खऱ्या आहेत, खोट्या आहेत, हे सगळं आभास आणि वास्तव याची सरमिसळ आहे. याला मी 'भास्तव' असं नाव दिलं आहे, भास आणि वास्तव याच्यामधलं. याच्यामुळे खरं खोटं कोणी ठरवू शकत नाही. ही झाली एक संकल्पना. दुसरी संकल्पना आपण जी बोलत होतो, ती म्हणजे वास्तववाद.

इटालियन चित्रपट याच्यासाठी महत्त्वाचे आहेत की, इटलीमध्ये जेव्हा आपल्याकडे मूकपट होते तेव्हा तिथे बोलपट निर्माण व्हायला सुरुवात झाली होती आणि जेव्हा आपल्याकडे अत्यंत प्राथमिक स्वरूपात बोलपट निर्माण होत होते त्यावेळी तिथे फार मोठे मोठे सिनेमे निर्माण झाले. इटालियन चित्रपट आपल्या चित्रपटापेक्षा जवळपास ५० वर्षे पुढे आहे, संकल्पनेच्या बाबतीत, क्रिएटिव्हिटीच्या बाबतीत, तंत्रज्ञानाच्या बाबतीमध्ये. दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान खूप टंचाई झाली सगळ्या गोष्टींची. आणि रोम ही जी इटलीची राजधानी आहे तिथले जे स्टुडिओज् होते, त्यातल्या काही क्रिएटिव्ह दिग्दर्शकांना असे वाटायला लागले की आपण वास्तववादी कलाकार निवडले पाहिजेत. आपण समजा एका गावात घडलेल्या भूकंपाची कहाणी सांगतो आहे, तर त्या भूकंपामध्ये सापडलेले खरोखरच त्या गावातले लोक नट म्हणून घेतले तर? सामान्य माणसातला अभिनय टिपता आला पाहिजे आपल्याला. मोठ्या कलाकाराला घ्यायचं, मग त्याला मेकअप करायचा, त्याला खेड्यातला माणूस दाखवायचा, असं कशाला करायचं? मग निओरियालिजम (नववास्तववाद) हा त्यांनी स्वीकारला. मग त्याच्यामध्ये सगळ्याच बाबतीत रियालिजम, रियालिजम म्हणजे तिथलीच सिच्युएशन, तिथलेच कलावंत, ते बोलतात तीच भाषा, आणि तिथलेच लोक मदतीला, तिथलेच कपडे, अशा प्रकारे नववास्तववादामध्ये, सिनेमा हा वास्तववादाच्या, वास्तवाच्या जवळ आला, लोकांना तो आपला असा वाटायला लागला. उदाहरणार्थ या पुस्तकामध्ये 'उंबेर्तो डी' हे एका माणसाचं नाव आहे. या माणसाचं नाव आहे उंबेर्तो डी. हा माणूस एक रिटायर्ड क्लर्क आहे आणि तो महायुद्धाच्या नंतर जी बिकट आर्थिक परिस्थिती आली, डोलारा कोसळला त्याच्यामध्ये जगण्याची धडपड करत आहे. तो म्हातारा झालेला आहे आणि एकटा आहे. याची कहाणी सांगताना व्हिटोरियो डी सिकानी विचार केला की, असा म्हातारा आपल्याला सामान्य लोकांमधूनच मिळाला पाहिजे. तो सहा महिने फिरत राहिला. आणि एक दिवशी रोमचा रस्ता ओलांडताना त्याला आपल्या संकल्पनेतला माणूस तिथे दिसला. एक साठीचा म्हातारा, त्या माणसाने आयुष्यात कधी सिनेमात काम केलं नव्हतं, सिनेमा दुरून पाहिला होता. पण त्याला व्हिटोरियो डी सिकाने ट्रेनिंग दिलं, राजी केलं आणि त्यानेच ही भूमिका निभावली, जी जगप्रसिद्ध झाली. 'उंबेर्तो डी' हा विटोरिओ डी सिकाच्या सर्वोत्कृष्ट सिनेमांपैकी एक आहे, 'बायसिकल थीफ' इतकाच.

तर तो काम करणारा माणूस कोण आहे? सामान्य माणूस होता तो. तो खरंच पेन्शनर होता. PWD खात्यातून निवृत्त झालेला होता. त्याला ट्रेनिंग देऊन त्याला काम करायला लावलं, हा झाला नववास्तववाद किंवा निओरियालिझम. त्याचे उद्गाता म्हणजे व्हिटोरियो डी सिका, त्याच्या अगोदर रोसेलिनी, फेलिनी असे लोक होते. फेलिनी मग नववास्तववादातून बाहेर पडला. पण असे सगळे लोक. इटलीमध्ये ही चळवळ १९३०-३५ साली सुरू झाली, ज्या काळी आपल्याकडे अत्यंत सामान्य प्रतीचे चित्रपट तयार होत होते त्याकाळी.

अस्तित्ववादाची संकल्पना 'प्युअर फॉर्मलिटी' नावाचा जो ज्युसेपे टोर्नेटोरचा चित्रपट आहे त्यामध्ये दिसते. खरं म्हणजे अस्तित्ववाद आपल्याला नवीन नाही. अस्तित्ववाद आणि शून्यवाद ही

गौतम बुद्ध आणि त्याच्यानंतर त्याचे शिष्य, ज्याच्यामध्ये नागार्जुन आहेत, अशा लोकांनी ही संकल्पना इसवी सनाच्या अडीच/तीन हजार-चार हजार वर्षांपूर्वी स्थापन केलेली आहे. आपल्या तत्त्वज्ञानामध्ये ते आहे. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानामध्ये अस्तित्ववादाची मुहूर्तमेढ किरकेगार्डनी रोवली. हे जर्मन तत्त्वज्ञ होते. याच्यामध्ये शॉपेनहॉवर आला, विसाव्या शतकाच्या सुरुवातीला सार्त्र आला. अस्तित्ववाद काय सांगतो? की माणसाच्या अस्तित्वाला तसा कुठलाच अर्थ नाही. आम्ही एका अर्थहीन जगामध्ये जन्म घेतला. या जगाचं प्रयोजन काय आहे? कोणाला माहिती नाही. जगण्याचं प्रयोजन काय आहे? कोणाला माहीत नाही. आम्ही त्या आमच्या जन्माला अनेक अर्थ देतो. आम्ही म्हणतो, हा अमुक जातीचा आहे, हा अमुक धर्माचा आहे. हे सगळे अर्थ आम्ही त्या माणसाला दिलेले आहेत. प्रत्यक्षात माणसाच्या आयुष्याला काहीही अर्थ नाही. अस्तित्ववादावर अनेक सिनेमे झालेत. काही नाटकं तर Jean Paul Sartre, जो याचा तत्त्वज्ञ होता, त्या तत्त्वज्ञानेच नाटके लिहिलेली आहेत. त्याच्यानंतर हॉलीवुडमध्ये अस्तित्ववादावर अनेक सिनेमे झाले. 'प्युअर फॉर्मलिटी'मध्ये एक माणूस आत्महत्या करतो. प्रत्यक्षात चित्रपटामध्ये गोळी झाडलेली दाखवलेली आहे. कोणी कोणावर झाडली हे काही नाहीये. गोळी झाडलेला माणूस धावत सुटलेला आहे आणि पोलिसांच्या हातात सापडलेला आहे. आणि पोलीस त्याला एका पोलीस स्टेशनमध्ये घेऊन येतात आणि त्याची चौकशी चालते. त्याच्यामध्ये एका फ्रेंच आणि एका पोलंडच्या नटाची भूमिका आहे. चित्रपट इटालियन आहे. या चित्रपटामध्ये पोलीस स्टेशनमध्ये एक आरोपी, एक पोलीस यांची फक्त झाडाझडती, एकमेकांशी चर्चा, असाच विषय आहे.

पण त्याच्यातून असं लक्षात येतं की आत्महत्या केलेला जो माणूस आहे, तोच पोलीस स्टेशनमध्ये आलेला आहे आणि तोच आपली जबानी देतो आहे. आणि हा संपूर्ण चित्रपट surreal, म्हणजे हा एक प्रकारचा अतिवास्तववादी चित्रपट आहे. की ज्याच्यामध्ये खरं काय, खोटं काय काहीच कळत नाही. बुद्धीला अतिशय खाद्य देणारा, एक वेगळी अद्भुत प्रकारची दृष्टी देणारा असा हा चित्रपट आहे. तो या अतिवास्तववादावर आहे. पोस्टमॉडर्निझम ही संकल्पनाच अशी आहे की, आधुनिकोत्तरवाद म्हणजे एक असं सत्य ज्याचा आम्ही शोध घेत आहोत. एक गुन्हा घडला, त्याचा शोध घेणे म्हणजे सत्याचा शोध घेणे. पण अंतिम सत्य आमच्या हातात कधीच लागत नाही. आता एक साधं उदाहरण घ्या- आजकाल खूप व्हिडिओज् व्हायरल होतात. त्या व्हिडिओज्चा शोध घ्यायला गेलं, तर त्याच्यामध्ये फेक, मोर्फ, खरं, खोटं याची इतकी सरमिसळ झालेली असते, की मुळात खरं काही होतं की नव्हतं, याचा शोध लागत नाही. एक १७ व्या शतकाचा दाखला देणारा एक संस्कृतचा कागद की, ज्याच्यामध्ये मॉडर्न मॅनेजमेंटची सगळी तत्त्वं त्या स्तोत्रात लिहिलेली होती म्हणून व्हाट्सॲपवर एक इमेज प्रसिद्ध झाली. बघितल्यानंतर तो ग्रंथ मुळात वाचलेला जो विद्वान होता तो म्हणाला की याच्यातल्या काही ओळी वाचल्याच्या मला आठवत नाही. मग त्याने तो 'चर्पटपंजरी' नावाचा जो ग्रंथ आहे, तो १८ व्या/१७ व्या शतकात लिहिला गेला आहे, त्या ग्रंथाचा शोध घेतला आणि तो शोध घेतल्यानंतर तो ग्रंथ हाती सापडणं त्याला मुश्किल झालं, पण तो सापडला. त्यानंतर त्याने मूळ ग्रंथ पाहिला, त्याच्या लक्षात आलं, की हे जे व्हाट्सॲपवर दाखवले आहे, ते मॉर्फ केलेले आहे. आता तुम्ही किती वेळा सांगणार हे खोटं आहे? पोस्टमॉडर्निझम असं म्हणतो की, आता खरं सत्य उरलेलं नाही. सत्य म्हणजे लोकांच्या भावनेला हात घालून असत्याला सत्याचा मुलामा देणं चालू आहे. एका नेत्याच्या सभेला १०० लोकही जेमतेम नव्हते. दुसऱ्या दिवशी हजारो लोकांचा फोटो छापून

आला. तिथे मीटिंग अटेंड करायला गेलेला जो माणूस होता, तो म्हणाला, इतके लोक तिथे नव्हतेच. परंतु जेव्हा असं सर्वेक्षण घेण्यात आलं की, हा फोटो आणि तो फोटो दाखवला आणि लोकांना वोट करायला लावलं, तेव्हा त्या नेत्याचे जे फॉलोवर्स होते, त्यांनी सांगितले की, हजारो लोक सभेला उपस्थित होते. असे का सांगितले, तर त्यांचे त्या नेत्यावर प्रेम आहे. म्हणजे भावनेच्या आहारी जाऊन असत्यावर सत्याचा मुलामा चढवणे, याला म्हणतात पोस्टमॉडर्न ट्रूथ. हे पोस्टमॉडर्निजमचे अनेक आयाम आहेत. आता सत्य तुम्हांला कधीही मिळणार नाही. खरं-खोटं काहीच कळणार नाही. याचे कारण सत्यावर असत्याचे इतक्या प्रकारचे थर जमलेले आहेत की, ते खोदून काढता काढता शेवटी हाती काहीच लागणार नाही. कुठलीही गोष्ट पाहा, कुठलीही बातमी पाहा.

**अथर्व** : हे पुस्तक प्रकाशित होऊन जवळपास दोन वर्षे झाली आहेत. यातील काही लेख त्याही आधी दिवाळी अंकांत प्रकाशित झाले होते. 'उंबेर्तो डी' हा मी 'पुणे पोस्ट'मध्ये वाचला होता. 'मलेना' हा 'मौज' दिवाळी अंकात प्रकाशित झाला होता. मला हे दोन लेख आठवत आहेत नक्की. या नंतर किंवा या पुस्तकात समाविष्ट नसलेल्या आणि तुम्हांला आवडलेल्या चित्रपटाबद्दल सांगू शकाल का?

**डॉ. मुलमुले** : असे अनेक चित्रपट आहेत जे आवडले, पण त्यांच्यावर अजून लिहिलेले नाही. अशा चित्रपटांमध्ये व्हिटोरिओ डी सिकाचा 'टू विमेन' हा सिनेमा आहे, ज्याच्यामध्ये सोफिया लॉरेनची भूमिका आहे. अकिरा कुरोसावाचे अनेक चित्रपट आहेत.

विशेष करून मला अतिशय तीव्रपणे लिहावं वाटतं असा एक सिनेमा आहे- 'कमिंग होम'. आणि हा चित्रपट आहे, झाओ झिमेन ह्या चिनी दिग्दर्शकाचा. तर चीनचे सिनेमे हे अतिशय सुंदर असतात. चीनमध्ये हुकूमशाही आहे आणि तिथे राजकीय कॉमेंट करता येत नाही. तुम्हांला राजकीय राजवट जी आहे त्यावर टीका करणारा सिनेमा काढता येत नाही. आपल्याकडे ते स्वातंत्र्य आहे. पण चीन काय तशा अर्थाने स्वतंत्र देश नाही. त्याच्यामुळे राजकीय विषय वगळून ते या विषयाकडे वळले- मानवी नातेसंबंध, रोजच्या कहाण्या, कौटुंबिक कहाण्या. त्याच्यामुळे त्या चित्रपटांमध्ये जे दिग्दर्शक आहेत, त्यांनी मानवी नातेसंबंधांवर इतके सुंदर चित्रपट काढलेले आहेत, कारण त्यांचे क्षेत्र आता सीमित झालेले आहे आणि पूर्ण प्रतिभा त्यावर एकाग्र झालेली आहे. 'कमिंग होम' नावाचा चित्रपट आहे, ज्याच्यामध्ये एक चिनी स्त्री आहे, तिचा एक नवरा आहे आणि हा नवरा सरकारविरोधी क्रांतीमध्ये सापडतो. आणि सरकार त्याला पकडते आणि त्याला जवळजवळ वीस वर्षे जेलमध्ये पाठवते. आणि तिथे त्याचे रिफॉर्मेशन होते. म्हणजे त्याने माओचे तत्त्वज्ञान अंगीकारणे. म्हणजे तो झाला दुरुस्त. आणि वीस वर्षांनंतर त्याला सोडण्यात येते. तोवर या स्त्रीला फार हालअपेष्टांना तोंड द्यावं लागलेलं आहे. तिची फार ससेहोलपट झालेली आहे. आणि त्याच्यातून तिची स्मृती कमी झालेली आहे. तिला एक मुलगी आहे, त्या मुलीने कसेबसे तग धरून आपलं आयुष्य एक व्हॅलिड आन्सर म्हणून उभे केलेले आहे आणि ती आपल्या आईला सांभाळते आहे. आता या आईची स्मृती कमी होत चाललेली आहे. तिला आस आहे की, कधीतरी ती आपल्या नवऱ्याला भेटेल. तिच्या नवऱ्यावर तिचे अतिशय प्रेम आहे. आणि तिला वाईट वाटते की, हा पकडला गेला आणि जेलमध्ये आहे. आणि तो कधीतरी येणार, सुटणार आणि मी माझा आनंदाचा संसार करणार. याची वाट पाहता पाहता, कष्ट करत तिचा मेंदू कमजोर व्हायला लागतो. तिला स्मृतिभ्रंश व्हायला लागतो. आणि मग शेवटी एकच वाक्य ती धरून बसते की 'तो येणार आहे.' आणि या माणसाची जेलमधून सुटका होते. आणि तो माणूस जेव्हा घरी परत

येतो, तेव्हा ही बाई तिला अनेक पुरुषांनी त्रास दिल्यामुळे कुठल्याही इतर पुरुषाला जवळ येऊ देत नाही. यालासुद्धा ती ओळखत नाही. आणि ती यालाही जवळ येऊ देत नाही. हा हळूहळू तिच्या घरी पियानो दुरुस्त करणारा माणूस म्हणून प्रवेश मिळवतो. तिच्या स्मृतीला धक्का न लागता, तिच्यावर जबरदस्ती न करता तिची जवळीक साधतो. तिचा नवराच तिचा मित्र होतो, जवळ जातो; पण ती याला नवरा म्हणून ओळखत नाही. ती म्हणते माझा नवरा जेलमध्ये आहे आणि एक दिवस तो येणार आहे. शेवट इतका सुंदर आहे आणि काव्यमय आहे, की नवरा कुठून येणार, तर त्या ब्रिजवरून, कारण पलीकडे तुरुंगाचा रस्ता आहे आणि आणि त्या तुरुंगातून तो हा पूल ओलांडून येणार आहे. ती त्या पुलाच्या पायथ्याशी वाट पाहत रोज जाऊन उभी राहत असते. तर ती या माणसाला, जो तिचा नवराच आहे पण त्याला ती ओळखत नाही, त्याला सोबत घेऊन जाते, आणि म्हणते आपण इथं जाऊ आणि बसू, तो येणार आहे. आपण त्याची वाट पाहू. आणि ही बाई आपल्या नवऱ्याची, बाजूला नवराच आहे, त्याच्यासह त्या येणाऱ्या माणसाची वाट पाहते. आता हा नवरा इतका संवेदनशील आहे की, आपल्या बायकोचं मन मोडत नाही, तिच्यावर जबरदस्ती करत नाही किंवा तिला सांगून उपयोगही नसतो; कारण तिचा मेंदूच काम करत नाही. तोही तिच्यासोबत तिथे उभा राहतो. येणाऱ्या स्वतःची वाट पाहत, जो ऑलरेडी आला आहे, पण आता एका अर्थाने तो कधीही येऊ शकत नाही कारण तिची स्मृती तिथे गोठून गेलेली आहे. ती आता अशा नवऱ्याची वाट पाहत आहे जो बाजूला असूनही ती त्याला ओळखत नाही. तिच्या स्मृतीपुरती तिची ही जी वाट पाहण्याची प्रक्रिया आहे, तिचा हा जो इंतजार आहे, तो आयुष्यभर संपणार नाहीये. 'कमिंग होम' असे त्या सिनेमाचे नाव आहे. आणि झाओ झिमिन किती सूचकतेने सांगतो बघा, की चिनी सामान्य माणूस, सामान्य स्त्री काय कशाची वाट पाहतेय? त्या येणाऱ्या उद्याची वाट पाहतेय जो कधी येणार नाहीये त्यांच्या आयुष्यात. पण त्यांनी आशा सोडलेली नाही. त्यांचं स्वातंत्र्य जे आलं पाहिजे होतं, त्याचा जो आनंद आहे, त्यांचं जे काही स्वप्न आहे, ते स्वप्न पाहत राहणं याच्या पलीकडे त्यांच्या हातात काहीच नाही. तर असा तो काव्यमय शेवट असलेला सुंदर सिनेमा आहे. त्याच्यावर लिहायचं आहे. असे अनेक चित्रपट आहेत. अनेक संकल्पना आहेत.

**अथर्व** : तुम्ही पुस्तकात म्हटल्याप्रमाणे, चिनी सिनेमाबद्दल आता बोललातच, पण क्रोएशियन, ब्राझिलियन, जपानी चित्रपट तुम्ही पाहिलेत. यांपैकी जे तुम्हांला आवडले, त्याबद्दल थोडक्यात सांगू शकाल का?

**डॉ. मुलमुले** : एक क्रोएशियन सिनेमा मी पाहिला. क्रोएशियात सिनेमा बनतात का हेही आपल्याला माहीत नाही. क्रोएशिया कुठे आहे हेही माहीत नाही. क्रोएशिया म्हणजे पूर्वी युगोस्लाविया नावाचा देश होता. नंतर त्याचं विघटन झालं. मार्शल टिटो त्याचा मुख्य होता. त्या युगोस्लावियाचं विघटन होऊन नंतर त्याचे सर्बिया आणि क्रोएशिया असे दोन देश तयार झाले. ते सतत युद्ध करत असतात. लोक मारले जात असतात. क्रोएशियामधील युद्धजन्य पार्श्वभूमीवरील हा चित्रपट आहे.

'सर्फसेनीक्रुक' असं त्या चित्रपटाचं क्रोएशियन नाव आहे. या चित्रपटामध्ये एक कवी आहे. त्याच्याकडे आश्रयाला आलेली दोन मुलं आहेत. या मुलांच्या घरचे सगळे लोक मारले गेलेले आहेत बॉम्बिंगमध्ये. यांना आपल्या मावशीकडे जायचं आहे आणि ती कुठेतरी क्रोएशियात राहते असं यांना माहीत आहे. नेमके कुठे राहते यांना माहिती नाही. तो कवी जो आहे तो एकटा आहे, म्हातारा आहे, आणि त्याच्या आयुष्यात आता काहीच उरलेलं नाही. आता ही मुलं त्याच्याकडे आश्रयाला

आल्यामुळे त्याच्या आयुष्यात एकच ध्येय उरले आहे की, या मुलांना सेफली त्यांच्या मावशीकडे पोचवणे. आणि तो या सगळ्या बॉम्बिंग आणि गोळीबारातून त्यांना कसं नेऊन सोडतो, ह्यावर तो सिनेमा आहे. या सिनेमात हा कवी असल्यामुळे, त्याला पूर्ण चित्रपटभर स्वतःचं लटकलेलं प्रेत, फाशी घेतलेलं, सगळीकडे दिसत राहतं मधूनमधून. ते पाहिल्यावर मला ते इतके अद्‌भुत वाटले की, हा माणूस सतत स्वतःची निर्भत्सना करत असतो, की मी वाचवू शकत नाही लोकांना, की मी हे युद्ध थांबवू शकत नाही, लोकांना मी समंजसपणा शिकवू शकत नाही, तर याच्यापेक्षा मरून गेलेलं काय वाईट? आपल्याही मनात असा विचार येतो, याच्यापेक्षा मरून गेलेलं काय वाईट? तर तो सतत स्वतःचं लटकलेलं प्रेत अधूनमधून बघत राहतो. आणि त्याच्या त्या कविता आहेत मध्ये-मध्ये. असा हा सुंदर क्रोएशियन सिनेमा आहे.

**अथर्व** : सर, तुम्ही पुस्तकात लिहिले आहे की, भारतात घडत असलेल्या गोष्टींबद्दल, म्हणजे तुम्ही पुस्तकात सांगितलेली उदाहरणे द्यायची तर, स्वतंत्र भारताने अनुभवलेली युद्धे, भारत इंग्रजांच्या सत्तेचा भाग असताना अनुभवलेली दोन महायुद्धे, फाळणीनंतर झालेले कदाचित जगातील सर्वांत मोठे स्थलांतर यांवर फारसे सिनेमे निघालेले नाहीत. याचे काय कारण असावे, असे तुम्हांला वाटते?

**डॉ. मुलमुले** : पहिली गोष्ट अशी आहे की, चित्रपट तंत्रज्ञान भारतात उशिरा आले. पाश्चात्त्य देशात चित्रपट सुरू झाला १८९४ साली. आपल्याकडे सुरू झाला १९१३ साली. १९१३ साली दादासाहेब फाळके यांनी पहिला सिनेमा काढला, 'राजा हरिश्चंद्र'. त्याच्यानंतर १९३३ साली बोलपट आला. त्याच्या खूप आधी पाश्चात्त्य देशात चित्रपट बोलायला लागला होता आणि उत्तम चित्रपट निर्माण झाले होते. आपल्याकडे तंत्रज्ञानच उशिरा आलं. कारण आपला देश पारतंत्र्यात होता. त्याच्यामुळे प्रत्येक गोष्ट इकडून-तिकडून विकत घ्यावी लागायची. तेवढे पैसे नव्हते. अशा प्रकारच्या खटपटीत आपला सिनेमा सुरू झाला. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, भारताने परतंत्र असताना ब्रिटिशांच्या हाताखाली दोन्ही महायुद्धात भाग घेतला. फाळणी ही एक अशी जागतिक घटना आहे, जगामध्ये एका जिवंत देशाचे असे दोन तुकडे-तीन तुकडे कुठे झालेले नव्हते. फाळणीमध्ये कोट्यवधी लोक विस्थापित झाले, काही दिवसांच्या अवधीत. आणि जवळजवळ आठ लाख लोकांचा जीव गेला. इतकी भीषण भयंकर घटना घडली. त्याच्यानंतर १९६२ साली चीनशी युद्ध झालं. १९६५ साली पाकिस्तानशी युद्ध झालं. पुन्हा एकदा कारगिल युद्ध झालं. तीन युद्ध स्वतंत्र भारताने केली. भारताची फाळणी झाली. परतंत्र भारताने दोन महायुद्धांत भाग घेतला. परंतु आपल्याकडे प्रतिभेची वानवा असल्यामुळे, आपल्याकडे ज्यांनी सिनेमे काढले, त्या निर्मात्यांना ही व्यापक दृष्टी नव्हती. मराठी चित्रपटसृष्टी चांगली होती. मराठी चित्रपटसृष्टीत 'प्रभात'सारख्यांनी 'कुंकू', 'माणूस', त्याच्यानंतर 'शेजारी', 'संत तुकाराम' असे सिनेमे काढले. 'सावकारी पाश' हा पहिला पॅरलल सिनेमा, जो बाबुराव पेंटर यांनी तयार केला होता. हिंदी सिनेमात पहिला पॅरलल सिनेमा १९७४ साली आला, 'सारा आकाश'. संपूर्ण हिंदी सिनेमात इसवी सन २००० पर्यंत, फाळणीवर एकही सिनेमा झाला नाही. पहिला युद्धपट १९६४ साली आला 'हकीकत', जो चेतन आनंदनी तयार केलेला होता. पाश्चात्त्य देशांमध्ये महायुद्धावरती कमीत कमी २००० चित्रपट आहेत. दुसऱ्या महायुद्धामध्ये हिटलरने ५० लाख ज्यू लोकांचा छळ केला, मारले त्यांना, जीव घेतला, या घटनेला 'होलोकॉस्ट' म्हणतात. 'होलोकॉस्ट मुव्हीज्' नावाचा सेक्शनच आहे, ज्याच्यामध्ये आजवर जवळजवळ ८०० च्यावर सिनेमे निर्माण झाले, एकाच घटनेवर. आणि या होलोकॉस्ट

मुव्हीज्– आजही ऑस्करच्या रेसमध्ये एक ना एक होलोकॉस्ट मुव्ही असते. प्रत्येक दिग्दर्शकाला एक होलोकॉस्ट मुव्ही तयार करावीशी वाटते. स्टीवन स्पीलबर्गचा अत्यंत गाजलेला होलोकॉस्ट मुव्ही म्हणजे 'शिंडलर्स लिस्ट'. ऑस्करच्या स्पर्धेत एक ना एक युद्धपट तरी असतो, होलोकॉस्ट मुव्ही असतो. स्वतंत्र भारतामध्ये युद्धाने इतकी वाताहत झाली, आमचे सगळे निर्माते फाळणीचे दुःख भोगूनच मुंबईला आले होते, पंजाबी, बंगाली, सिंधी. पण यांनी तद्दन गल्लाभरू मसालापट काढले. यांनी सत्य परिस्थितीवर आधारित सिनेमे काढले नाहीत. त्याला अपवाद मी सांगितला. 'सावकारी पाश', 'कुंकू', 'माणूस' हे 'प्रभात'चे सिनेमे अतिशय सुंदर होते. नंतर मग राजकुमार स्टुडिओचेही सिनेमे चांगले होते. थोडक्यात सांगायचं म्हणजे हिंदी मसाला, गल्लाभरू चित्रपटांनी आमची अभिरुची खराब करून टाकली. आघाडीचे जे दिग्दर्शक होते, त्यांनी गाण्यांची भरमार असलेले मसालापट काढले फक्त. ज्याच्या अत्यंत तकलादू अशा कहाण्या, आणि त्याचा तो एकच एक फॉर्म्युला. एक तर भावा–भावांची ताटातूट होणे, किंवा मग प्रेमाचे त्रिकोण, या दोन फॉर्मुल्यांवर हजारो सिनेमे काढले. प्यार–प्यारवर सगळे सिनेमे. संपूर्ण जगामध्ये चहामध्ये दूध आणि चित्रपटात गाणी हे फक्त भारतीय उपखंडातच होतं. जगभर गाणी टाकून कोणी सिनेमे बनवत नाही. सिनेमात गाणी टाकणे ही अस्सल भारतीय कला आहे, यामुळे रसभंग होतो. आणि हे अवास्तव आहे. तिकडे अतिवास्तववाद होता, इकडे अवास्तववाद आहे. अचानक तबला, पेटी, सतार घेऊन बगीचात कोण आले बरे, यांच्यामागे वाजवत वाजवत? 'गुलाबी आँखे जो तेरी देखी.' बरं, हिरो गाणं म्हणतोय इतकं सुरेख. लता मंगेशकरच्या आवाजातील गाणे हिरोइन म्हणते. हे सगळे अवास्तव आहे. हिंदी सिनेमाच्या गाण्याने जेवढा अपार आनंद दिला आम्हाला, तेवढाच चित्रपटात ती गाणी टाकल्यामुळे, चित्रपटाने आमचा सूड घेतला. अतिशय गल्लाभरू सिनेमे आपण काढले. वास्तववादी सिनेमे काढले नाहीत. जीवनदर्शन देणारे, चित्रपटमाध्यमाचा खरा उपयोग करणारे सिनेमे फार तुरळक. मी सांगितले ना, फाळणीवर २००० पूर्वी एकच सिनेमा झाला. तो म्हणजे भीष्म सहानी आणि श्याम बेनेगल यांचा 'तमस'. 'तमस' हे पहिले चार भागांचे सीरियल म्हणून आले. नंतर त्याचा सिनेमा झाला. एकच आणि एकमेव. बाकी फाळणीचा ओझरता उल्लेख असलेले तुरळक सिनेमे आहेत. तेही फार नाहीत. 'ललकार', 'बॉर्डर' असे गल्लाभरू युद्धपट जरी धरले, तरी युद्धपट आणि फाळणीपट यांची संख्या २५ च्यावर नाहीये. असे का झाले, याचे कारण असे आहे की, समाजामध्ये जेव्हा या गोष्टीवर लेखनच होत नाही, तर मग त्या गोष्टीवर चित्रपटही होत नाहीत. लोकांना हेच आवडते म्हणून ते तेच देत राहिले. ते जे देत राहिले, ते लोक पाहत राहिले, कोणी त्याचा विचार केला नाही. अजून एक गोष्ट अशी की, निर्मात्यांना फक्त पैसा कमवायचा होता. असा सिनेमा तयार करायचा कलात्मक, त्याचे पैसे भरून आले नाही तर काय करायचे? मग 'तीसरी कसम' शैलेंद्रने काढला आणि त्याच्यापायी बरबाद झाला. निर्माते श्रीमंत झाले, पण त्यांनी त्याची परतफेड चांगले सिनेमे काढून केली नाही. असा तो विषय आहे सगळा. साहित्यातही कस नाहीये. साहित्य कुठे निर्माण झालं फाळणीवरती? 'ट्रेन टू पाकिस्तान' ही एकमेव कादंबरी आहे खुशवंत सिंग यांची. त्याच्यामुळे साहित्यही फार कमी निर्माण झाले. सादत हसन मंटोच्या कथा आहेत, थोड्याबहुत इतर काही कथा आहेत.

**अथर्व** : तुम्ही पुस्तकात असे लिहिले आहे की, हा स्वतंत्र लेखाचा विषय आहे. सर, ही मुलाखत दिल्याबद्दल खूप धन्यवाद.

❑

# व्ही. एस. नायपॉल यांची मुलाखत

## मुलाखतकार : तरुण तेजपाल आणि जोनाथन रोझेन

## अनुवादक : वर्णमुद्रा



नायपॉल : मला आधी हे सांगा की, तुमची रेंज काय असणार आहे, म्हणजे मला कोणत्या विषयावर केंद्रित व्हायला हवं आहे ते कळेल. आपण फक्त पुस्तकांवरच बोलणार आहोत का?

**तुम्हांला आवडेल नं ते?**

तो जरा मोठाच विषय होईल मग. कारण की, पुस्तके बरीच आहेत. विषय रंगत गेला तर नेमकं आणि फोकस्ड असणं बरं. माझा उत्साहसुद्धा वाढेल मग.

**'अ वे इन द वर्ल्ड' हे पुस्तक लिहायला कठीण होतं का?**

कठीण म्हणजे, कशा प्रकारे?

**त्यात अनेक तुकडे आहेत. अजूनही त्यांचे सांधे काही नीट जुळून येत नाहीयेत.**

ते पहिल्या पानापासून ते शेवटापर्यंत संपूर्ण सलगपणे असं लिहिलं गेलं आहे. बरेचसे लेखक आपलं लिखाण आयुष्याच्या उत्तरार्धात निष्कर्षाप्रत आणतात. तसं पुस्तक लिहितात शेवटी.

**तुम्हीसुद्धा तसंच काही करणार आहात का?**

होय. लोक काय करतात– उदाहरणार्थ वॉ, त्याच्या 'वॉर ट्रिलॉजी' मध्ये किंवा अँथनी पॉवेल– एखादं त्यांच्यासारखं पात्र निर्माण करतात, त्याच्याकरवी ते आपली साहसं पुन:श्च घडवून आणतात. पॉवेल त्याच्या लेखनातून त्याच्याचसारखं असलेलं, परंतु तो नसलेलं पात्र उभं करतो. कारण त्याला

स्वत:ला काही प्रभावी भूमिका निभवायची नसते. हा एक प्रकारे वैध असा फॉर्म नाहीये, जो आपण लोकांवर लादत असतो. ह्यातून कसं बाहेर पडायचं यावर मी गेली काही वर्षे विचार करतो आहे.

**कसं बाहेर पडायचं?**

तुम्हांला नाही कळलं, मी काय म्हणतो आहे ते?

**मला वाटतं की, तुमचा अर्थ – तुम्हांला एक स्पेस ठेवायची आहे. उदाहरणार्थ मार्सेल प्रुस्त लेखक आणि मार्सेल नॅरेटर – 'रिमेंबरन्स ऑफ थिंग्ज पास्ट'मध्ये जसा आहे.**

नाही. मी असा विचार करतो आहे – अं. ठीक ओह येस. तसं समजा. मी विचार करत होतो की, तुम्ही युद्धाविषयी लिहीत आहात नं, तर तोच एक प्रचंड असा अनुभव म्हणून तुम्ही लिहायला हवं, वॉ काय करतो, तो त्यातील 'वॉ'चं पात्र शोधून काढतो. मी फिक्शन लिहिताना असं पात्र शोधून काढतो जे माझ्या पार्श्वभूमीला पूरक ठरेल. गेली अनेक वर्षे मी ह्यावर विचार करतो आहे. त्याचे उत्तर म्हणजे त्याला धैर्याने सामोरे जाणे– म्हणजे तोतया पात्र नाही तर खरंखुरं उत्क्रांत झालेलं.

**मला भीती वाटते की, तुमचं आत्मचरित्र या पश्चिमेच्या प्रचंड इतिहासावर कितीसं ओव्हरलॅपिंग करतं याची. स्वत:विषयी लिहिणं म्हणजे एक प्रकारे त्या अतिविशाल जगाविषयीच लिहिणं असतं, असं तुम्ही मानता का? हा अनुबंध निर्माण व्हावा म्हणून तुम्ही हेतूत: काही प्रयत्न करता, की, तो नैसर्गिकरीत्या फुलू देता?**

नैसर्गिकरीत्या, ते उत्क्रांत होतं. कारण ते एक प्रकारे शिकणंच असतं नाही का? आणि तुम्ही काय शिकलेले असता ते तुम्ही नाकारूही शकत नाही. तुम्ही कुठे कुठे प्रवास केलेला असतो, तो नाकारता येत नाही. तुमच्या जीवनातील सहजप्रवृत्ती तुम्ही नाकारू शकत नाही. एका लहानशा गावात माझं बालपण गेलं आणि तारुण्यात पदार्पण करताना मी मोठ्या जगात आलो. हे सगळं तुमच्या लेखनातून उमटत जातंच. तुम्हांला कळतंय ना मी काय म्हणतो आहे ते?

**कळतंय, पण मला जरासं चकित व्हायलासुद्धा होतंय.**


प्रयत्न करा. समजून घ्या. थेट सरळपणे बघा त्याकडे आणि सोपं करून घ्या, म्हणजे आपल्याला पुढे जाता येईल.

**मला वाटतं की जे तुम्ही सोडून जाऊ इच्छित होता. तिथूनच तुम्ही सुरुवात केली आणि तिथेच परतून आलात– तुम्ही त्याचाच जास्तीत जास्त अभ्यास केला तुमच्या चिंतनाच्या मध्यवर्ती स्थानी तुम्ही ते आणलंत खरंतर आणि त्याला प्रचंड महत्त्व दिलं. त्रिनिदादला एक लहान जागा म्हणून तुम्ही संबोधलं खरं, परंतु त्याविषयी तुम्ही हेसुद्धा लिहिलं की, कोलंबस आणि रॅलीह यांनासुद्धा त्रिनिदाद हवं होतं म्हणून. तुम्ही कधी तिकडे लक्ष केंद्रित केलं आणि पश्चिमेलाही त्रिनिदादची आकांक्षा होती हे तुम्हाला कधी उमगलं? जो की एक मोठा विषय होऊन बसला मग तुमच्यासाठी?**

खूप काळ मी ते लिहीत होतो. बरेच दिवस लोकांचं काही त्याकडे लक्ष गेलं नाही. त्यामुळे माझं ते सगळं संशोधन एक प्रकारे माझं माझ्या एकट्यापुरतंच राहिलं. परंतु ते घडणं हा तसा एक योगायोगच होता. त्याविषयी मी काही सजग नव्हतो. आणखी एक असं की, ते सर्व काही राजकीय अथवा विवाद्य नव्हतं. आता तर एक प्रकारे १९५० साली लिहिलेलं ते जिवंतसुद्धा म्हणता येणार नाही. परिस्थितीतील सत्य एखाद्यापर्यंत पोचत असेल– तर त्याला वैश्विक म्हणावं.

**तुम्ही नमूद केलं आहे की, वाचक जरा उशिरानेच वळले तुमच्याकडे– तुम्हांला असं वाटतंय का,**

**की जग आता तुमच्याशी संपर्क साधत आहे? हा बदल जगातच घडून आला आहे की वाचकांमध्येसुद्धा?**




हा बदल जगातच घडून आला आहे. मी लिहायला सुरुवात केली, तेव्हा लेखनमूल्यांची जगाला जाणच नव्हती, असे म्हणावे लागेल. 'द लॉस ऑफ एल डोरॅडो' हे माझं पुस्तक तुम्हाला माहीत आहे? त्यामध्ये रॅलीह आणि मिरांडाविषयीचं संशोधन आहे. ते जेव्हा प्रकाशित झालं, त्यावेळी इंग्लंडमधील एका प्रथितयश वर्तमानपत्राच्या साहित्य-संपादकानं मला कळवलं होतं की, हे लिखाण म्हणजे जणू काही एखादा निबंध आहे फक्त, कारण की हा विषयच तसा फारसा मोठा नाहीये. तो गृहस्थ मूर्ख होता. पण ह्यावरून तुमच्या लक्षात येईल की, जग कसं बदललं आहे आता ते.

**ज्या मानसिक स्थित्यंतराचा/विस्थापनाचा तुम्ही सामना करत आहात, त्याला हे जग आता अधिक समजून घेते आहे, असे तुम्हांला वाटते का?**

आता अशी एक व्यापक स्थिती आलेली आहे. परंतु लोकांना अजूनही एकच एक सांस्कृतिक स्थिती वाटत असते, जी खरं तर अस्तित्वात नाहीये. सगळ्या संस्कृती ह्या एकमेकांच्या सरमिसळीतून तयार झालेल्या आहेत. रोमचं पाह - इटूरिया होतं आधी तिथं आणि रोमच्या सभोवताली सिटी स्टेट्स होती. किंवा पूर्वेकडे म्हणजे ईस्ट इंडिज लोक - भारतातील लोक, ते पुन्हा एक भारत शोधायला बाहेर पडले, नंतर तेथील मुस्लीम शासकांचा प्रभाव हेसुद्धा एक आहेच. लोक सतत इकडून तिकडे जात येत राहिले आहेत.- जग काही स्थितिशील नव्हतं कधीच.

**त्या जगाचं प्रातिनिधिक उदाहरण द्यायचे झाल्यास, त्यापैकी एक तुम्ही स्वतःच आहात असे तुम्हांला वाटते का?**

मला नाही तसं वाटत. मी नेहमीच पुस्तकाचा विचार करत असतो फक्त. तुम्ही पुस्तक व्हावे म्हणून लिहीत असता. त्याबाबतची पूर्तता करत असता. ते जिवंत व्हावं, एक दस्तावेज त्यातून तयार व्हावा, म्हणून वारंवार ते दुरुस्त करत असता. त्यात काही न्यून राहू नये आणि ते चांगलं व्हावं म्हणून धडपडत असता. मी कुणाचा प्रवक्ता होऊ इच्छित नाही आणि माझ्याकडून कुणी तशी अपेक्षासुद्धा ठेवू नये, असं मला वाटतं.


**'अ वे इन द वर्ल्ड'मध्ये तीन शोधकर्ते धोका पत्करून त्रिनिदादमध्ये परत आले आहेत. तुमच्या अलीकडच्या लेखनातून असं लक्षात येतं की, तुम्ही बिचकत आहात, कदाचित तुम्हांला पुन्हा तिथे जावं लागेल, बरेचदा- त्या जागेविषयीचा विनाशकारी पैलू, जो कदाचित आजकाल तुम्हांला पछाडून टाकतो आहे.**

असं भलतंच बोलू नका. ते फार घाबरवून सोडणारे आहे. मी तिकडे काही वेळा गेलोय; पण आता मी तिकडे पुन्हा परत जाणार नाहीये.

**परंतु असं वाटतंय की, त्रिनिदाद तुम्हांला वारंवार खेचून घेतंय.**

नाही. मी ते कल्पकतेने पूर्ण केले आहे. हे बघा, लेखक आपल्या बालपणीच्या आठवणी जशा असतात, त्यावर खूप मेहनत घेत असतो. बालपण समजून घेणं हे कठीण असतं- ती सुरुवात असते,

एक वेगळीच पार्श्वभूमी असते, गडद अशी आणि लेखक तो टप्पा पार करून तरुण अथवा प्रौढ होतो, त्यासोबतच ते सगळं संपुष्टात येत असतं. सुरुवातीची ही पुंजी फार महत्त्वाची असते, जिला समजून घेत लेखक ती पूर्णत्वास नेत असतो. ती संपृक्त असते, संपूर्ण. त्यानंतर मग अडचणी सुरू होतात. नंतर तुम्हांला तुमच्या बुद्धीवर अवलंबून राहावं लागतं, तुमच्या आंतरिक मजबुतीवर. होय, पुढचं सगळं मग ह्या आंतरिक सुदृढतेतून वर येतं.




**तुमच्या 'द वे इन द वर्ल्ड' ह्या शीर्षकाने मी भारावून गेलो होतो. मला 'पॅराडाईज लॉस्ट'चा शेवटच आठवला– जणू काही आपली हकालपट्टी होते आणि आपण भटकत राहतो. आपलं घराबाहेर पडणं हेच आपलं जगात प्रवेश करणं असतं?**

मला वाटतं की, तुम्ही कुठे राहता, यावर ते अवलंबून असतं. हा योग्य प्रश्न आहे की नाही आणि त्याचं उत्तर देता येईल किंवा कसे, हे मी सांगू शकत नाही. तो वेगळ्या पद्धतीने विचारता येईल.

**मला वाटतं की, मी तुम्हांला तुमची 'जग' ही कल्पना काय आहे, ते विचारतो आहे.**

लोक अतिशय साधेपणाने जगू शकतात, नाही का? विचार न करता, दूर राहून. मला वाटतं की, जिथे तुम्ही प्रवेश करता आणि विचार करू लागता– तुम्ही शिक्षण घेता, प्रश्न उपस्थित करू लागता– कारण की त्या मोठ्या जगात तेच करावं लागतं आणि एखाद्या विशिष्ट प्रांताचं व्हावं लागतं.

**विशाल जगाची कल्पना करत तुम्ही मोठे झालात का? अशी कल्पना, जी 'जग' ह्या शब्दात सामावली आहे?**

बाहेर एक जग आहे, याबाबत मी नेहमीच सजग होतो. एका कृषक, कलोनियल समाजात मी लहानाचा मोठा झालो आहे, हे मी कधी मानलं नाही. आपण स्वत:ला असं संकुचित अथवा दमित करून घ्यायला नको, असं मला वाटतं.

**१९५० मध्ये तुम्ही त्रिनिदाद सोडून ऑक्सफर्डला आलात– साता समुद्रापारच्या एका परकीय भूमीत, एक महत्त्वाकांक्षा घेऊन. तुम्ही कशाच्या शोधात होता?**

मला आपण कुणीतरी सुप्रसिद्ध व्यक्ती झालो पाहिजे, असं वाटत होतं. लेखक झालो पाहिजे हेसुद्धा वाटत होतं– सुप्रसिद्ध लेखक. ह्यात एक विसंगती मात्र अशी होती की, आपण काय आणि कशावर लिहिणार आहोत, हे मात्र मला तेव्हा माहिती नव्हतं. महत्त्वाकांक्षा भौतिकाला ओलांडून पुढे गेली होती. सिनेदिग्दर्शक श्याम बेनेगल एकदा मला म्हणाले होते की, ते सिनेमा बनविणार आहेत, हे त्यांना त्यांच्या वयाच्या सहाव्या वर्षीच उमगलं होतं. आता मी काही त्यांच्याइतका सजग नव्हतो म्हणा– तरीही माझ्या वयाच्या दहाव्या वर्षी मीही लेखक व्हायचं ठरवलं होतं मात्र.

मी कलोनियल गव्हर्नमेंटच्या शिष्यवृत्तीवर ऑक्सफर्डला गेलो. ती शिष्यवृत्ती, तुम्हांला जे व्हायचं ठरवलं असेल ते, करून टाकणारी होती.

मी डॉक्टर किंवा इंजिनीअर होऊ शकलो असतो, परंतु ऑक्सफर्डला मी फक्त इंग्रजीवर लक्ष केंद्रित केलं. अर्थातच ती इंग्रजी भाषा होती आणि ते ऑक्सफर्ड होतं म्हणून नव्हे, तर मला त्यामुळे त्रिनिदादपासून लांबवर राहायला मिळणार होतं म्हणून. मला वाटत होतं की, तीन-चार वर्षे असं दूर राहून मी मला स्वत:ला जाणून घेऊ शकेन. मला माझे विषय सापडतील आणि काहीतरी चमत्कार घडून मी लेखक होऊन जाईन. व्यावसायिक शिक्षणाची वाट सोडून मी हा इंग्रजीचा सरधोपट मार्ग स्वीकारला- एक निरर्थक डिग्री, जिला काहीही किंमत नव्हती.

पण, मला त्रिनिदाद मात्र सोडायचंच होतं. ते कलोनियल शोषित जगणं आणि ती (ह्याची मुळं माझ्या हिंदू भारतीयपणात असावीत.) कुटुंबकलहाची स्थिती, ज्यामध्ये तुमची किंमत तुम्ही किती नैतिकता पाळता, ह्यावर ठरायची. तो उदारमतवादी असा समाज नव्हता- धडपणे कलोनियलसुद्धा नव्हता आणि धड हिंदूसुद्धा नव्हता. मला दिसत होतं की, बाहेरच्या मोठ्या जगात तुमची योग्यता तुमच्या कर्तृत्वावर ठरत होती- आपल्याला काय व्हायचं आहे, ह्याची त्या जगात मोकळीक होती.

**आपलं कुटुंब जिथून आलं होतं, त्यापासून विलग होणं?**

हो. मला वाटतं की, एखाद्याकरिता सदैवच हा काही नैतिक मुद्दा नाही होऊ शकत. लोकांना तुम्ही काय रोचक गोष्ट सांगत आहात, ह्यात रस असतो, नाही तर मग त्यांना तुमच्यात काही स्वारस्य उरत नाही. इंग्लंडमध्ये हे खरोखरच घडतं- इथे मला लोकांकडे पाहण्याचा उदार मार्ग सापडला होता. मी आजही लोकांकडे तसंच पाहतो.

**तुम्ही ऑक्सफर्ड एंजॉय केलं का?**

खरं म्हणजे मी ऑक्सफर्डचा दुस्वासच केलाय. त्या पदव्या आणि त्या तमाम विद्यापीठीय संकल्पना. मी त्यासाठी खूप मेहनत घेतली होती. माझ्यासोबत शिकणाऱ्यांच्या तुलनेत मी बराचसा हुशार म्हणावा असा होतो. मी बढाई नाही मारत- तुम्हांला माहीतेय, एक प्रकारे काळाने ते सिद्ध केलंच आहे. बाहेरच्या जगासाठी मी खूप तयारी केली होती. खरोखरच ऑक्सफर्ड म्हणजे एकप्रकारचा एकटेपणा आणि निराशा होती. कुणाच्या नशिबी ते येऊ नये असेच मी म्हणेन.

**तुम्ही त्रिनिदादमध्येच राहिला असता तर काय झाले असते, असा कधी विचार येतो का तुमच्या मनात?**

मी कदाचित आत्महत्या केली असती. माझ्या एका मित्राने केलीच- स्ट्रेसमुळे बहुतेक. तो मिश्र वंशाचा होता. खूप लोभस आणि बुद्धिमान होता. ती एक मोठीच हानी ठरली बघा.

**हा तुमच्या 'अ हाऊस फॉर मि. बिस्वास'मधील मुलगा तर नव्हे?**

होय, तोच होता माझ्या मनात तेव्हा. आम्ही एक प्रकारे आपापली कृतज्ञताच शेअर केली. त्याचं जाणं भयानक होतं.

**तुमच्या पूर्वायुष्यातील जखमा तुम्हांला अजूनही जाणवतात का?**

मी ते सोडू शकलो, ह्याबद्दल मी स्वत:ला फार भाग्यवान समजतो. तिथे राहणं फार भयंकर आणि अत्याचारात राहणं होतं. आता इथून मला ते सगळं स्वच्छपणे दिसतं : त्या लागवडी- कदाचित तो त्या नव्या जगाचा भागही असेल, पण ते निरंकुश होतं, स्वायत्त. आता मी त्यातून बाहेर पडलोय म्हणा, पण कदाचित त्याविषयी भरपूर विचार केल्यामुळेच मी बाहेर पडलो, असं म्हणता येईल. मी विचार करतो की, मी तिथेच संपून गेलो नाही ही किती भाग्याची गोष्ट आहे माझ्याकरिता. तिथलं जगणं कष्टाचं आणि

सुरुवातीपासूनच प्रयत्नसाध्य होतं.

**तुमचं लिहिणं ही तुमच्या जीवनाची मध्यवर्ती गरज म्हणून आहे का? सगळ्या गोष्टींतून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग असल्यासारखं?**

लिहिण्याने मला महत्त्वाकांक्षी बनवलं. किंवा असंही असावं की, मी माझ्या वडिलांपासून ते घेतलं– ते लेखक होते, पत्रकार होते आणि कथासुद्धा लिहीत असत. माझ्याकरिता हे फार महत्त्वाचं होतं. माझे वडील त्यांच्या कथांमधून आमची हिंदू पार्श्वभूमी चितारत असत. ते फार क्रूर असं जग होतं, त्यांच्या कथा वाचून मला ते उमगलं होतं. त्यामुळे मी आंतरिकरित्या जो घडत गेलो आणि त्यामुळेच मग मी बाह्यपरिस्थितीत कधी माझा शत्रू शोधला नाही. आपण आत्मपरीक्षण केलंच पाहिजे– आपल्या कमकुवत जागा तपासल्या पाहिजेत. माझा आजही त्यावर विश्वास आहे.

**तुम्ही असं म्हणाला आहात की, लिहिणं ही खरोखरच एक उदात्त म्हणावी अशी गोष्ट आहे.**

होय. माझ्यापुरतं तरी ते उदात्त असंच काम आहे. उदात्त ह्याकरता की, त्याचा थेट सत्याशी सामना आहे. तुम्हांला तुमच्या अनुभवांशी सामना करावाच लागतो. ते तुम्हांला उमगलं तर जग तुम्हांला उमगलं, असं समजा. सखोल समज आली तर लिहिणं म्हणजे एक अविरत यात्रा असते. ते खूपच उदात्त सुंदर आहे.

**तुम्ही लिहायला सुरुवात कधी केली?**

कादंबरीवर मी १९४९ मध्ये काम करायला सुरुवात केली. ती एक हास्यास्पद आणि मनोरंजक कल्पना होती– त्रिनिदादमधला एक काळा मनुष्य स्वत:ला एका आफ्रिकन राजाचं नाव ठेवतो. ह्या कल्पनेचा विस्तार करावा, असं काही मी योजलं होतं.दोन वर्षं मी त्यावर विचार केला, तेव्हा मी तरुण होतो आणि मला बरंच काही समजायचं होतं. घर सोडण्यापूर्वी मी त्या लेखनाला सुरुवात केली होती आणि ऑक्सफर्डच्या एका प्रदीर्घ सुट्टीमध्ये मी ते पूर्णसुद्धा केलं. मला आनंद अशासाठी झाला होता की, एखादं मोठं पुस्तक मी लिहून हातावेगळं करू शकलो होतो. अर्थात त्याचं पुढं काहीच झालं नाही.

नंतर मी कठीण परिस्थितीत ऑक्सफर्ड सोडलं, गंभीरपणे लिखाण करायला तेव्हाच सुरुवात झाली होती. मला माझा स्वत:चा आवाज, माझा टोन सापडला होता– ते माझं म्हणावं असं होतं, नाटकी किंवा उसनं असं नव्हतं. माझा हा गंभीर स्वर मात्र मला एका वरवरच्या उदासीत ढकलत होता, अर्थात हे फार काळ टिकलं नाही, मी हस्तलिखित एकाकडे सोपवलं आणि तो म्हणाला की, हे कचऱ्यात फेकून दे, एकेकदा तर मला वाटलं की त्याचा गळा दाबावा, परंतु आतून मला, तो चुकीचं बोलत नाहीये, हेसुद्धा कळत होतं.अनेक दिवस मला वाईट वाटत राहिलं, कारण पाच वर्षं उलटून गेले होते आणि काहीही घडत नव्हतं. हे बघा, लिहिणाऱ्यासाठी हे फार गरजेचं असतं.

मी ठरवलं की आता आपलं उपजीविकेचं साधनच हे ठरवायचं– आयुष्यच पणाला लावायचं. मग काहीतरी झालं : त्या निराशेतून मला माझा आवाज सापडला. माझी म्हणावी अशी सामग्री माझ्या हाती लागली. दोन साहित्यिक गोष्टी मला स्फूर्तिदायक ठरल्या– माझ्या वडिलांनी लिहिलेल्या कथा आणि एक स्पॅनिश पिकारेस्क शैलीतील कादंबरी, पहिल्यांदा ती १५५४ साली प्रकाशित झाली होती. 'लॅझॅरिल्लो टॉर्मेस.' ते एका लहान गरीब मुलाविषयीचं छोटंसं पुस्तक होतं, जो मुलगा स्पॅनिश साम्राज्यात वाढला होता. मी त्या कथनपद्धतीच्या प्रेमात पडलो. ह्या दोन गोष्टींची मी सांगड घातली आणि मला लक्षात आलं की

हे आपल्या व्यक्तिमत्त्वाशी मेळ खाणारं आहे– अस्सल आणि मूळ आणि खरोखरच ह्या दोन वेगवेगळ्या गोष्टी एकत्र येऊन माझं भरणपोषण करून गेल्या.

**तुम्ही 'मिग्युएल स्ट्रीट' लिहायला सुरुवात केली तेव्हा हे सगळं घडत होतं का?**

हो. ते खूप कठीण होतं, एखाद्याने असं प्रथमच कशाविषयी तरी लिहू पाहणं. पुढे ते कॉपी करायला मग सोपं असतं म्हणा. त्यामुळे जे पुस्तक मी लिहिलं– ते असं मिक्श्चर होतं, माझं निरीक्षण, फोकलोअर, वर्तमानपत्रांतील कात्रणं आणि वैयक्तिक स्मृतींचं– अनेक लोक हे करू शकतात, पण त्यावेळी ते एक काम होऊन गेलं मात्र.

आज विचार करा की, त्या काळात, १९५५ मध्ये 'मिग्युएल स्ट्रीट'सारखं लिखाण करणं. आज लोकांना भारत आणि तत्सम कॉलनीज् असलेल्या देशांविषयी कुतूहल आहे, पण त्या काळात तर तसं लिहिणं ह्याला लिखाणच समजत नसत. ते पुस्तक प्रकाशित होण्यापूर्वी चार वर्षे माझ्यापाशी पडून होतं आणि ती स्थिती फार अवघड होती. मी फार निराश झालेलो होतो त्यावेळी. आजही माझ्यावरील त्या काळातील तो झाकोळ पूर्णपणे गेलेला नाहीये.

**१९५५ मध्ये दोन पुस्तके तुम्ही लिहिलीत. 'द मिस्टिक मॅस्स्युयर' आणि 'मिग्युएल स्ट्रीट' पण पाहिलं पुस्तक प्रकाशित व्हायला १९५७ साल उजाडलं आणि कथासंग्रह प्रकाशित व्हायला १९५९ पर्यंत वाट पाहावी लागली.**

माझं जीवन खडतर होतं. तुम्ही तरुण असता, महत्त्वाकांक्षी असता, तुम्हांला जगात तुमची उपस्थिती नोंदवायची असते, अशावेळी दोन वर्षे वाट पाहणे हा फार मोठा काळ वाटत असतो. मी फार त्रास सहन केला त्यावेळी, अखेर एकदाचं 'द मिस्टिक मॅस्स्युयर' प्रकाशित झालं. आणि माझ्याच वर्तमानपत्राने ते पुस्तक खारीज केलं (तेव्हा मी 'न्यू स्टेट्समन'मध्ये काम करायचो.) एक ऑक्सफर्ड डॉन, जो नंतर बराच सुप्रसिद्ध झाला, त्याची गणना 'अ लिटिल सॅव्हरी फ्रॉम कलोनियल आयलंड' अशी केली गेली. अ लिटिल सॅव्हरी, म्हणजे त्यामागच्या कष्टांना काही मोलच नव्हतं.

त्यावेळच्या ज्या पुस्तकांचं गुणगान व्हायचं ना, ते पाहिलं तर आज फार मनोरंजक वाटेल. आता ते सांगण्यातही काही हशील नाही, ठीकाय, आज स्थिती अशी आहे की, गेली चाळीस वर्षे माझ्या पुस्तकांच्या आवृत्त्या निघताहेत. त्यावेळी मात्र मी उद्ध्वस्त झालो होतो. ह्या अनुल्लेखाने दुखावलो होतो. आज लोक हे फार सहजपणे घेतात, म्हणतात की, त्याविषयी तक्रार कशासाठी. मी तक्रार नाही करत आहे, मी त्या परिस्थितीतून गेलो आहे, हे सांगतोय.

**तुमच्या आत्मविश्वासावर तुम्ही तगून गेलात?**

होय. मला स्वत:विषयी कधी शंका नव्हती, अगदी लहानपणापासून, मला वाटायचं की, हे मी करू शकतो सहज.

**'अ हाऊस फॉर मिस्टर बिस्वास' तुम्ही लिहायला घेतलंत, ते तुमची पहिली कादंबरी प्रकाशित झाली होती म्हणून?**

होय. विषयाच्या शोधात मी हताशपणे भटकत होतो. ती इतकी निराशाजनक स्थिती होती की मी पेन्सिलीने लिहीत होतो– मला भरवसा वाटत नव्हता. माझ्या विचारांत कुणीतरी माझ्या वडलांसारखं होतं, जो आपल्या आयुष्याच्या अखेरीस आपल्या आयुष्यात घडलेल्या घटनांविषयी, वस्तूंविषयी विचार करतो की, हे कसं काय घडलं असावं?

जवळपास नऊ महिने कोणत्याही अंत:प्रेरणेविना मी नुसतं हमालासारखं खरडत होतो.

**दररोज लिहीत होता?**

अगदी दररोज असं नाही, कारण की, थोडीतरी अंत:प्रेरणा लागतेच, नाही तर फार जडपणाने होतं मग ते. पुन्हा, त्याचवेळी मी एका रिव्ह्युअरची भूमिकासुद्धा पार पाडत होतो. कुणीतरी मला 'न्यू स्टेट्समन'मध्ये रिव्ह्यूज् द्यायला सुचवलं. ते मग मला धडाधड एकामागून एक पुस्तकं पाठवू लागले, मी फार परिश्रमपूर्वक ते सगळं करू पाहत होतो, पण नीटपणे मला ते जमत नव्हतं. नंतर मग त्यांनी मला जमैकाविषयीची पुस्तके पाठवली, आणि ते सुंदर, सहज लिखाण मग मला भावलं. मी त्यातून मोजकं, थोडक्यात एखाद्या पुस्तकाविषयी कसं लिहायचं– की जे वाचून वाचकांना जणू ते पुस्तक आपणच वाचलं आहे असं वाटेल, हे शिकलो. अखेरीस एकदा कादंबरी पूर्णत्वास गेली आणि मग सगळं नीट झालं. महिन्यातून तीनेक आठवडे तरी मी ह्या कामालाच जुंपून घेतलं होतं त्यावेळी. मला वाटायचं की, लवकरच माझ्या ह्या कादंबरीविषयीची प्रशंसा माझ्या कानांवर पडणार आहे. मी एक मोठी झेप घेऊ पाहत होतो, तरुण आणि उत्साही होतो, मोठ्या पल्ल्याचं लिखाण हातून घडावं ह्याकरता कटिबद्ध होतो, मला वाटायचं की, असं काही ठोस काम हातून झाल्याशिवाय आपलं काही अस्तित्व निर्माण होणार नाही. ते दिवस असे होते की, कुणी रस्त्यात थांबवून जर का मला म्हटलं असतं की, चल मी तुला एक हजार पाउंड देतो, तू लिहू नकोस, तर मी त्याला धुडकावून लावलं असतं. मला एकच कळत होतं की, मला हे पुस्तक पूर्ण केले पाहिजे.

**पुस्तक कसं स्वीकारलं गेलं?**

प्रकाशकाने ते वाचलं तेव्हापासूनच ते उत्तमरीत्या स्वीकारले गेले, त्यावर वाचकांच्या उड्या पडल्या, हे आनंदाने सांगितलं असतं, पण अर्थातच तसं काही घडलं नाही. हेसुद्धा सांगायला आनंद वाटला असता की, जगाने जागं होऊन त्याची नोंद घेतली होती, अर्थात तेसुद्धा घडलं नाही. माझ्या आधीच्या पुस्तकाप्रमाणेच हे पुस्तकसुद्धा फक्त होऊन गेलं इतकंच, त्याला आपला मार्ग काढायला जरा वेळ लागला.

**'अ हाऊस फॉर मिस्टर बिस्वास' हे एकप्रकारे तुमच्या आधीच्या तीन पुस्तकांपासून तुम्ही फारकत घेणं होतं, ज्या की सोशल कॉमेडीज् होत्या, हलक्याफुलक्या विनोदापासून दूर होत तुम्ही गंभीर आणि सीरियस टोनकडे गेलात.**

खरं म्हणजे टोन काही गंभीर म्हणता येणार नाही. त्या पुस्तकात तशी धमालच आहे. कदाचित तो वाचाळ विनोद नसेल, कमी उपाहसात्मक असेल, परंतु तो खात्रीने सगळ्यांना भावणारा असा विनोद होता. माझ्या कोणत्याही पुस्तकातलं एखादं पान मी तुम्हांला वाचून दाखवतो, तुम्ही कदाचित ते गांभीर्याने घेतलेलं असू शकते, पण मी सांगतो की, तुम्हांला हसू येईल. विनोद सखोल असायला हवा. कॉमेडी अधिक प्रगल्भ व्हायला हवी. विनोदी दृष्टिकोन असल्याशिवाय आपलं निभवणार नाही. सतत धीरगंभीर, ट्रॅजिक अशा स्थितींत आपण राहू शकणार नाही– त्याला हे असं विनोदाचं अस्तर असणं गरजेचं आहे.

**'अ वे इन द वर्ल्ड'मध्ये तुम्ही लिहिलंय, ती एक विसंगतीची कल्पना होती, जी की आपल्यापासून दूर नसते, किंबहुना तीच आपल्याला जपून ठेवत असते. ती त्या क्षोभाची आणि आवेगाची दुसरी बाजू होती, ज्यामुळे जमावाने त्या काळ्या पोलिसाला जाळून टाकले होते. तुमच्या अलीकडच्या पुस्तकांत**

**त्रिनिदादविषयी असलेल्या विनोदाची ह्यामध्ये आठवण येते, आणि ह्या विनोदाची दुसरी बाजू– उन्माद– म्हणता येईल त्यानंतर आलेल्या पुस्तकांमध्ये.**

ते फार कुतूहलाचं आहे, नाही का– हे तेच लोक आहेत की, ज्यांनी एका पोलिसाला जिवंत जाळलं आहे, जे आता नाचगाणी करून त्याविषयीच्या गमतीदार गोष्टी सांगणार आहेत.

**व्यक्तिशः मला त्यातील 'आम्ही' ह्या शब्दाने धक्का बसला– त्या घटनेत तुम्ही तुमचा स्वत:चादेखील समावेश करताहात.**

हे बघा, ते पोर्ट ऑफ स्पेनमध्ये घडतं. तिथे, त्या पर्यावरणात मी वाढत–घडत होतो, त्यामुळे तो 'आम्ही' आला आहे. ती विसंगती आमचीच होती, जी 'कॅलिप्सो'मधून दिसते– तो आफ्रिकन आहे. नंतरच्या आयुष्यात उशिरा मला उन्माद आणि विसंगत वर्तनाचा आकळ आला.

**आणि तुम्ही तो जास्तच मानला?**

मी त्याने जास्तच घाबरलो. विसंगतीने भरलेल्या अशा लोकांना, की जे एकीकडे गमतीदार गाणी लिहू शकतात, तेच एखाद्या पोलिसाला जिवंत जाळून टाकण्याची कुवतही बाळगून असतात. क्रौर्य मला घाबरवतं.

**मला कळलं नाही, पण 'अ वे इन द वर्ल्ड' चा शेवटही 'द एनिग्मा ऑफ अरायव्हल'सारखाच अंत्येष्टीने होतो.**

तो एक निखालस अपघात समजला पाहिजे. तुम्ही आता हे विचारले नसते तर कदाचित माझ्या कधी ते डोक्यातसुद्धा आले नसते.

लिहिताना माझं भान मृतदेह, अंत्यविधी, सैनिकी तुकड्या ह्यावर अधिक होतं. त्याची सुरुवातच ''एका तुकडीतील माणसाचं ड्रेसिंग.'' होते आहे आणि नंतर तुकड्यांच्या शुश्रूषा करण्यासाठी रेड हाऊसमध्ये जाणं– जिथे मी कामाला होतो, आणि रॅलिहच्या त्या कथेत सैनिकी तुकड्या खूपच आहेत.

**हा विकसित झालेला नैतिक दृष्टिकोन आहे की 'द वे ऑफ द वर्ल्ड'मधीलच दृष्टिकोन आहे?**

एखादा वयाने मोठा होत जातो तसतसा तो परिस्थितीला अधिक निडरपणे सामोरा जायला लागतो, अशी एक शक्यता असते. तुम्ही तरुण असता तेव्हा, तुमच्यासमोर काही पर्याय उपलब्ध असतात. खरंच, मृत्यूच्या दिशेने सरकणे ही एक वस्तुस्थिती आहे– कोणत्या गोष्टी ह्याकडे तुम्हांला ढकलत असतात, हे मला नाही सांगता येणार. वाचकांनी ते ठरवावे; लेखकाने स्वत:चा न्यायनिवाडा स्वत: करू नये.

**पूर्वीच्या काल्पनिक कथांच्या घटकांची पुनर्रचना करण्याबद्दल तुम्ही जागरूक आहात का?**

हो. योग्य त्या कोनातून त्या सामग्रीकडे पाहायचं. आणखी वेगळ्या पद्धतीने ते लिहिता आलं असतं का, हा विचार करायचा आणि त्यातूनच पुन्हा नवी सामग्री मिळवायची.

**तुमच्या नंतरच्या रचनांमध्ये तुम्ही काहीसे सहृदय झाला आहात का? माझ्या असे लक्षात आले आहे की, तुम्ही अधिक स्वीकारशील झाला आहात.**

स्पष्टपणे सांगा. मी कधी सहृदय नव्हतो? माझा पाषाणहृदयीपणा कुठे दिसतो तुम्हांला? सोदाहरण दाखवून द्या.

**आहे की, 'इन अ फ्री स्टेट'...**

ते पुस्तक एका विलक्षण दु:खद आणि वैयक्तिक ताणातून लिहिले गेले आहे. ते मी फार

काळजीपूर्वक लिहिले आहे– एखाद्या घड्याळाच्या काटेकोरपणे किंवा एखाद्या अभियांत्रिकी निर्मितीसारखे.

ती एक सुघड अशी निर्मिती होती. १९७९ मध्ये, अगदी पहिल्यांदा मला अभिवाचनाविषयी न्यूयॉर्कमधून विचारणा झाली, आणि त्यावेळी मला त्या लिखाणात असलेल्या अद्वितीय हिंसेविषयीची जाणीव झाली. त्या क्षणापर्यंत मला ते भान नव्हतं, म्हणून ते हेतूत: लिहिले होते, असे नाही.

मला स्वत:लासुद्धा धक्का बसला त्या हिंसेमुळे. विनोद सुरू असतात, लोक हसत असतात; आणि एकाएकी खाडकन ते गप्प होऊन जातात.

तो एक अस्वस्थ करणारा अनुभव होता. कदाचित ज्या पद्धतीने तो रचला गेला, त्यामुळेसुद्धा तसं झालं असेल– माझ्या वैयक्तिक वेदनेपलीकडचा, माझ्या क्षोभापलीकडचा.

**तुमच्या लेखनपद्धतीविषयी काही सांगाल?**

मी फार हळूहळू लिहितो.

**सुरुवातीपासूनच?**

तरुण होतो तेव्हा वेगाने लिहायचो– दिवसाला हजारेक शब्द सहजगत्या. आता नाही होत तेव्हढं लिहून. एखादा चांगला दिवस उगवला तर तीनेकशे शब्द फारतर. म्हणजे कितीतरी कमी.

**कधी लिहूनच होत नाही असं?**

आजकाल बरेचदा. बहुतेक दिवस असेच जातात.

**हेमिंग्वे म्हणायचा की, लिहिले नाही असा दिवस उगवला तर मरण जवळ आणणारा दिवस समजायचा तो.**

मी तेवढा भावनाप्रधान नाहीये. फार तर मी अस्वस्थ जरूर होईन.

अनुभवाने मी एवढा शहाणा तर निश्चितच झालोय की, नाही लिहिलं गेलं तर नाही. माझ्या डोक्यात जर का ते पक्कं असेल तर ते कागदावर उतरेलच कधी ना कधी. कदाचित व्यक्त होण्याची योग्य संधी ते शोधत असेल.

**तुम्हांला वाटतं का की, भाषा फक्त वहन करते, जसा की, जॉन अपडाईक म्हणतो, नृत्य आणि झगमगाट.**

हे बघा, लोकांना जे करायचं असतं, तेच ते करत असतात. आपलं लिखाण पारदर्शक असावं, असं मला वाटतं– वाचकांनी अडखळावं वाचताना, असे होऊ नये. मी काय सांगू पाहतो आहे आणि काय मांडतो आहे, हे त्यांना नीट कळावं अशीच अपेक्षा मी करतो. 'वा वा काय सुंदर लिहिले आहे', असे त्यांनी नेहमीच म्हणावे, हे मला अपेक्षित नाही. तसं होत असेल तर ते अपयश आहे लेखकाचं.

**कल्पनाच गुंतागुंतीची असली तर लेखनही अव्यवस्थित होतं.**

हो, अगदीच. मी पारिभाषिक शब्द टाळतो. परिभाषा आपल्या यत्र-तत्र-सर्वत्र वेढून आहे– आपण वर्तमानपत्रातून ती वाचतच असतो, मित्रांच्या संभाषणात ती असते– आणि एक लेखक म्हणून तुम्हांला ती आळशीसुद्धा बनवत असते. आळशीपणे तुम्ही शब्द वापरायला लागता, असं व्हायला नको. शब्द मूल्यवान असतात. ते ऐपतदारीने वापरले पाहिजेत, असे मला वाटते.

**इंग्रजी साहित्याविषयी तुम्ही निराश आहात का?**

नाही, मी निराश नाही. आता इंग्रजी साहित्यच उरलेलं नाहीये, विखंडित असं असेल, परंतु ते

पूर्वीसारखे आता राहिलेले नाही आणि पुन्हा तसे लिहिले जाईल, असेही वाटत नाही. इथे इंग्लंडमध्ये तर ते फारच वाईट मार्गाला लागले आहे. आता त्याचं अस्तित्वच नाहीये–पण भूतकाळात खूप काही होऊन गेलं आहे, कदाचित त्यामुळेसुद्धा वाईट असं काही वाटत नसेल.

**उगवत्या भारतीय लेखकांविषयी काय? त्यांच्याविषयीसुद्धा तसंच वाटतं का?**

मी तसं काही तपासून पाहिलं नाहीये, पण भारतात खूप लोक लिहिताहेत. कित्येक शतकांपासून भारतात बौद्धिक जीवनच नव्हते. तो एक धर्माधारित लोकसमूह होता, आणि त्यांना लेखनाची गरज वाटत नव्हती. पुढे जेव्हा ह्याच लोकसमूहातून एक वर्ग उदयाला येऊ लागला की, जो कारखानदारीत, आर्थिक क्षेत्रात, शिक्षणात हातपाय पसरायला लागला, तर तेव्हा त्याला जाणीव झाली की, काय घडतंय, ते समजावून घेतले पाहिजे. लोक लेखकांकडे वळले, जे लेखन त्यांना मार्गदर्शक ठरेल, प्रवृत्त करेल, उत्तेजित करेल, असे ते वाचू लागले. भारतात आजघडीला खूपजण लिहीत आहेत, असे मला वाटते. परिस्थितीनुरूप ते बाहेर येईल.

**हिंसेच्या प्रश्नावर येऊ पुन्हा, हा 'अ वे इन द वर्ल्ड'मधील एक परिच्छेद पाहा, मी वाचतो बघा– पार्श्वभूमीवर सतत हिंसेची छाया पसरली आहे, अशा वातावरणात मी लहानाचा मोठा झालो. रस्त्यांवरील भाषेत क्रौर्य भरलेलं होतं, ते आदिम असेल किंवा आदिम नसेलही : पण माणसामाणसातील बोलण्यात, मुले आणि पालकांत, त्यांना केल्या जाणाऱ्या शिक्षांमध्ये आणि हे सगळं अध:पतन तुम्हांला प्लान्टेशन काळात घेऊन जात होतं.**

होय. अगदी सहजपणे लोक बोलताना मी ऐकत होतो, जसा की एखादा मालक गुलामाशी बोलतोय : तू चड्डीत मुतेस्तोवर हाणीन तुला; पाठीची चामडी सोलीन तुझ्या. हे ऐकणं अवघड होतं, तुम्हांला नाही वाटत?

**तुम्ही सतत प्रक्षोभाला विरोध करून तो सोपा करू पाहत आहात – वसाहतवादावर म्हणा किंवा गोऱ्यांनी काळ्यांना केलेल्या गुलामीमध्ये तुम्हांला तो दिसतो. तुमच्यासाठी सरळसाधा शत्रू नाहीये कुणी.**

अर्थातच नाहीये. हे म्हणायला सोपं आहे. कोणत्याही प्रकारे ते उपयुक्त होऊ शकत नाही, कुठल्याही वादात वा चर्चेत ते पूरक ठरू शकत नाही. तो एक गप्पा मारण्याचा विषय आहे फक्त. वसाहतवाद्यांवर खापर फोडणं फार सोपं आहे. हे लोक वसाहतवादी काळात फार शांत होते; ते एक प्रकारे सबॉर्डिनेशनच्या जीवनाची तयारी करत होते. आज आता वसाहतवाद नाहीये तिथे, ते निर्भीडपणे बोलू शकतात आता. पण इतर माणसे कितीतरी आधीपासूनच निर्भीडपणे बोलत होती.

**तुमच्यावर अत्याचार करणाऱ्यांचा कह्यात तुम्ही गेल्याची टीका झाली आहे तुमच्यावर.**

कुणी केलीय ती?

**उदाहरणार्थ, डेरेक वॉलकॉट.**

मला माहीत नाही. अशा गोष्टी मी वाचत नसतो. तुम्ही हे मला विचारण्याऐवजी त्यांनाच विचारायला पाहिजे. अशा गोष्टी तुम्हांला तुमच्याशीच पडताळून घ्यायच्या असतात. मी नाही सांगू शकणार अशा बाबतीत काही. तो एक प्रदीर्घ असा कार्यकाळ आहे.

**मला असं म्हणायचं होतं...**

तुम्ही असं कसं विचारता आहात की, मी ब्रिटिशांच्या किंवा गोऱ्या मालकांच्या बाजूला गेलो,

किंवा त्यांच्या कह्यात गेलो. माझ्या लिखाणातून हे दिसतं?


**मी नाही म्हणतोय असं.**

मग विचारता का आहात?

**कारण की, तुम्ही कायमच स्पष्टीकरण देणं टाळलं आहे, पण तुमच्या अवतीभवती टीकाकार आहेतच नं, त्यांना कुणीच उत्तर देत नाहीये.**

हे बघा, हा त्यांचा प्रश्न आहे. तुम्ही माझं 'द मिडल पॅसेज' वाचलं आहे? ते पुस्तक सांगतं आहे की, काळे लोक हे कधीच गोऱ्यांसारखे होऊ शकणार नाहीत, तसे झाले तर तो एक मोठा अपराध होईल. १९६२ मध्ये त्यांनी विचार केला की, स्वातंत्र्य येऊ घातले आहे, त्या गोष्टीने त्यांना जरा गोऱ्यांजवळ आणलं.

**नॉनफिक्शन म्हणावं असं 'द मिडल पॅसेज' हे तुमचं पहिलंच लिखाण होतं.**




एखाद्याला पूर्णतः कल्पित रचणारा समजणं काहीसं चुकीचं आहे. कल्पित रचता येईल अशी सामग्री फार कमी असते खरं तर. लेखक म्हणून तुम्हांला सतत सजग राहावं लागतं, अवधान ठेवावं लागतं, अवलोकन करावं लागतं, आणि संवेदनशील असावं लागतं. गंभीर लेखक असणे म्हणजे तुम्ही जे आधी केले आहे त्यापुढे जाणे. मला पुढे जाण्याची गरज भासली. मी आधी जे काम केलं होतं, ते मी पुन्हा करू शकणार नाही, असे मला जाणवले– घरात स्वत:ला कोंडून घेऊन कादंबऱ्यांचे लेखन करण्याचे नाटक करणे मला जमणार नव्हते. मला बाहेरचं जग बघायचं होतं, प्रवास करायचा होता, माझं जग शोधायचं होतं– आणि शैलीला एक नैसर्गिक मार्ग काढायला लावायचं होतं. आनंदाची बाब म्हणजे– वांशिक सरकारांनी, ज्यांना आपण वंशवादी नाही आहोत असा देखावा निर्माण करायचा होता, मला आमंत्रणे दिली आणि तो प्रदेश फिरवून आणला. तिथून माझ्या भटकंतीची सुरुवात झाली आणि त्यातूनच 'अ मिडल पॅसेज' आलं.

**भारतात तुम्ही बरेचदा गेलात. पस्तीस वर्षांपूर्वी पहिल्यांदा भेट दिली आणि पुन्हा पुन्हा येतच राहिलात, कधी लिहिण्यासाठी तर कधी सुट्ट्या घालविण्यासाठी. भारताकडे इतका ओढा असण्याचं कारण काय आहे?**

तो माझ्या पूर्वजांचा देश आहे. माझा जन्म त्या गतस्मृती बाळगून असलेल्या घरात झाला, आजी–आजोबांसोबत ते संपलं अर्थात. त्यापलीकडे मी पोचू शकलो नाही, बाकी उरली ती एक संपूर्ण पोकळी होती. जिचे अन्वेषण पुढे 'एरिया ऑफ डार्कनेस'च्या रूपाने झाले.

**तुम्हांला असं वाटतं का की, एक लेखक म्हणून तुमचं काम आणि सामग्री ही, तुम्ही पूर्वी कोण होता आणि आज जे तुम्ही आहात ते कसे झालात, इत्यादींवर अवलंबून असते?**

जेव्हा तुम्ही माझ्यासारखे– जन्म अशा ठिकाणी की तुम्हांला जिथला इतिहासच माहिती नाही, तो सांगणारंसुद्धा कुणी नाही, आणि मुळात इतिहास म्हणता येईल असं काही जिथे अस्तित्वातच नाही, असला तरीही कागदोपत्री नोंद असलेला केवळ असेल, असा जन्म घ्याल, तेव्हा तुम्ही आपलं मूळ शोधू पाहालच, की आपण कुठून आलेलो आहोत ते.

त्याला खूप वेळ द्यावा लागेल. तुम्हांला आयतं–वयतं असं काही ते मिळणार नाही, की हे असं

असं ते जग आहे, हे बघ आणि लिहून टाक.

तुम्ही जेव्हा फ्रेंच किंवा इंग्लिश लेखक असता, तेव्हा एका भव्यदिव्य वारशासह आणि संस्कृतीसह जन्मलेले असता. पण जेव्हा माझ्यासारखे जन्मलेले असता, कुठल्याशा दूरस्थ देशात, शेतीत काम करणाऱ्या समाजात, तेव्हा तुम्हांला एकेक गोष्ट शिकून घ्यावी लागते. लिहिणं ही एक शिकणं आणि माहिती करून घेण्याचीच प्रक्रिया ठरली माझ्यासाठी.

**गेल्या पस्तीस वर्षांत तुम्ही भारताविषयी तीन पुस्तके लिहिली : 'ॲन एरिया ऑफ डार्कनेस', 'अ वुंडेड सिव्हिलायझेशन', आणि 'अ मिलियन म्युटिनीज नाऊ', दर पुस्तकागणिक तुमचं आकलन बदलतं होतं.**

तीन पुस्तके लिहून झाली, बघा. कृपया एक गोष्ट लक्षात घ्या की, मी ते लिखाण पहिल्यापेक्षा पुढचं अधिक सरस करावं म्हणून केलेलं नाहीये. तीनही पुस्तके आपापल्या जागी योग्य आहेत, कारण मला वाटतं की, तिन्हींमध्ये त्या त्या वेळचं सत्य उतरलं आहे. तिन्हींची शैली वेगवेगळी आहे : एक आत्मचरित्रात्मक आहे, एक विश्लेषणात्मक आहे आणि एक तेथील लोकांना येणाऱ्या अनुभवांवरून लिहिलेले आहे. वेगवेगळ्या काळात ती लिहून झालीत, आणि अर्थातच भारतासारख्या देशात लोक वेगवेगळ्या काळातच जगत असतात. त्यामुळे आपण असे म्हणू शकतो की, 'ॲन एरिया ऑफ डार्कनेस' अजूनही तिथे आहे–

आक्रमणं आणि पराभवांची विश्लेषणं, ती एक मानसिक जखम, आजही आहेच. 'म्युटिनीज'मध्ये लोक आपला लहानसा का असेना आवाज शोधत आहेत, आणि त्यांच्या गरजांवर बोलत आहेत– जे की खरं आहे. ती पुस्तकं स्वयंसंपूर्ण अशी म्हणता येतील– आजही ते वास्तव असलेली, आजही कालसुसंगत, आजही महत्त्वाची.

ह्या सगळ्यांतून एक लक्षात घ्या की, मी एक लेखक आहे शेवटी– एक परिच्छेद, एक प्रकरण, एक विभाग, एक पुस्तक लिहिणारा मनुष्य. ती कारागिरी आहे. केवळ भाष्य करणं हे लेखकांचं काम नसतं. त्यामुळे माझं पुस्तक वेगवेगळ्या पातळ्यांवर माझ्या कारागिरीचं दर्शन घडविणारं असायला हवं. 'ॲन एरिया ऑफ डार्कनेस' हा कारागिरीचा एक उत्तम नमुना आहे –प्रवास, स्मृती आणि वाचन यांचं एक असामान्य मिश्रण आहे ते. 'अ मिलियन म्युटिनीज नाऊ'मध्ये एक शोध आहे की, देशात देशातील माणसं महत्त्वाची आहेत याचा. ती एक अतिशय थकवणारी शैली आहे, प्रवास करणे, लोकांना भेटणे आणि त्यातील घटितं नोंदविणे. जर का तुम्हांला त्यांच्याशी काय नि कसं बोलायचं आहे ते माहिती नाही, त्यांना तुमच्याशी काय बोलायचं आहे ते माहिती नाही, ह्यांतून एखादं पुस्तक निष्पन्न होणं, कठीण आहे सगळं. तुम्ही तुमच्या स्वभावानुसार तुमचा निर्णय ठरविणार. मी आधी हे लक्षात घेऊन, मग समोरच्या व्यक्तीशी बोलायचो आणि बघायचो की, तो स्वतःविषयी काय बोलतो ते त्याचे अनुभव असणार, त्या पाठीमागून तुम्हांला ठरवावं लागणार काहीतरी, आणखी काहीतरी, आणि आणखी काहीतरी. प्रत्यक्ष प्रवासात ते पुस्तक घडत होतं, प्रत्यक्ष लिहिणं हे नंतरचं, नेहमीप्रमाणेच वेळखाऊ काम असणारच होतं. त्यामुळे ती पुस्तके म्हणजे वेगवेगळ्या प्रकारच्या कलाकुसरी आहेत असे समजा, एक लक्षात ठेवा की मी एक कारागीर आहे, वेगवेगळ्या कलाकुसरी करणारा. दरवेळी काही नवीन करण्याचा मी नेहमीच प्रयत्न केला आहे.

**तुमच्या नॉनफिक्शन लिखाणाविषयी लोकांना मुलाखत देताना तुम्ही टेपरेकॉर्डरचा वापर करता का?**

कधीही नाही. त्याने श्रम वाचतात आणि गोष्टी काटेकोर होतात – त्या मला ताब्यात ठेवतात. तसेच, लोकांना हे करणं कठीण वाटतं, पण माझ्याकडून काही मजकूर प्राप्त करायचा असेल तर दीड तास पुरेसा असतो.

**मुलाखत घेणारा भेटल्यावर तुम्ही तत्काळ मुलाखत द्यायला सुरुवात करता का?**

पहिल्यांदा मी त्यांना भेटतो, त्यांच्यासोबत बोलतो; नंतर त्यांना भेटायला बोलावतो. नव्वद मिनिटांत दोन किंवा तीन हजार शब्द होतील एवढा मजकूर मी देऊ शकतो.

**'ॲन एरिया ऑफ डार्कनेस'मध्ये भरपूर प्रक्षोभ आहे, भारतीय पत्रकारितेचा जितका भारताविषयी आहे तसाच. तुम्हांला असं वाटतं का की समजून घेण्याऐवजी लेखकाला प्रक्षोभ अधिक उपयुक्त आहे?**

लेखनाची तुलना पत्रकारितेशी करणं मला आवडत नाही– पत्रकारिता म्हणजे बातमी असते, जिचं महत्त्व त्या त्या दिवसापुरतं असतं. माझं लिखाण समाजातील आणि संस्कृतीतील प्रेरणांचा आणि स्रोतांचा शोध घेणारं लिखाण आहे, विशेषतः भारतीय समाजातील. ही पत्रकारिता नाही. मला हे दुरुस्त केलं पाहिजे – कुणीही करू शकेल असं हे काम नाहीये. ही एक अधिक भरीव अशी देणगी आहे. मी पत्रकारांचा स्पर्धक समजत नाही स्वतःला.

**पण प्रक्षोभ हा समजूतदारपणापेक्षा उपकारक ठरतो का?**

तो केवळ प्रक्षोभच आहे, असे नाही. ती खोलवरची अशी भावना आहे. सखोल अशी काही भावना असल्याशिवाय लेखन शक्यही नाही – मग ती पत्रकारिता होते. जेव्हा खोलातून तुम्ही घुसळून निघता, तुम्हांला लक्षात येतं की ही उघडीवाघडी भावना अशीच तुम्ही नाही मांडू शकत आणि मग तुम्हांला त्याविषयी काही एक निर्णय घ्यावा लागतो. मग ते त्या भावनेला घासून–पुसून आकार देण्याचं काम सुरू होतं, त्यालाच तू ते काय आकलन समजूतदारपणा वगैरे म्हणतोस ते, ह्यातून लेखन घडतं. ह्या दोन गोष्टी परस्पर विसंगत नाहीयेत– समजूतदारपणा प्रक्षोभानंतरचीच अवस्था म्हटली पाहिजे. मला त्याला भावना म्हणणं आवडेल, सखोल भावना. भावना लिखाणासाठी आवश्यक आहे.

**'ॲन एरिया ऑफ डार्कनेस' वाचून मला एक प्रश्न विचारायचा आहे तो असा की, संभ्रमित हिंदू मानस तुम्ही मांडले आहे, ते तुम्हांला चित्ताकर्षक वाटले एकीकडे आणि त्याचवेळी तुम्हांला ते भयंकरसुद्धा वाटते आहे. मला वाटते की, मी हे योग्यरीत्या मांडत असेल तर मला आनंदच होईल.**

तुम्ही नेमकी नस पकडली आहे. ते तसंच आहे भीतिदायक आणि मोहकसुद्धा. लोक आपल्या निष्क्रियतेकरिता त्याचा उपयोग करून घेत आहेत. भवताल वाईट आहे आणि तुम्ही गोंधळलेले आहात, जग दिग्भ्रमित असताना विचारांच्या त्या छोट्याशा खोलीत शिरून त्याने पछाडले जाणे काहीसे दिलासादायक आहे. मला तशा विचारविश्वात प्रवेश करायला सोपं गेलं. 'अ बेंड इन रिव्हर' लिहिण्यापूर्वी मी त्याच वैचारिक स्थितीत होतो. एक भ्रम म्हणून मला जगाची वेगळी जाणीव होती – मी जरी ते कल्पित रचत होतो, तरी ते सगळं वास्तव माझ्या अवतीभोवती गरगरत होतंच.

**तुम्ही खूप भटकंती केली आहे – भारत, इराण, पश्चिम आफ्रिका, दक्षिण अमेरिकेचा आतील भाग, अजूनही तुम्हांला फिरणं आवडतं का?**


आताशा ते कठीण झालंय, तुम्हांला माहीत आहेच. एखाद्या ठिकाणी मी गेलो आणि त्या जागेविषयी जर का मी काही लिहिले नाही तर मला ते व्यर्थ वाटतं. त्या एका अनुभवाला आपण

मुकलो, असं वाटतं. एकदा दहा दिवस ब्राझिलमध्ये होतो, पण काहीच लिहिलं नाही. तसं, अर्जेंटिनाविषयी आणि फॉकलँडविषयी थोडं लिहिलं म्हणा, पण ते अनुभवाने पछाडणं असं नव्हतं– मी त्यावर काम करायला हवं होतं. एक प्रकारे ते वाहून गेलं माझ्यातून. आयुष्यातले वाया गेलेले क्षण म्हणावे लागतील ते. मी सुट्ट्या घालविणाऱ्या प्रकारातला मनुष्य नाही.

**व्हॅलेरी म्हणतोच की, जग म्हणजे ते जे तुम्ही पुस्तकात नोंदवत असता. तुम्हांला काय वाटतं?**

किंवा ज्याविषयी तुम्ही विचार करता, ज्याचं तुम्ही चिंतन करता. तरच तुम्ही त्याचा आनंद घेऊ शकता, त्याला काही अर्थ देऊ शकता. नाहीतर कुत्र्याच्या गोंडस पिल्लासारखं जगणं काय कामाचं? व्हूफ् व्हूफ्, मला खायला द्या आता, व्हूफ् व्हूफ्!

**'बियाँड बिलीफ', हे तुमचं नवं पुस्तक. पुन्हा एकदा तुम्ही इस्लामकडे वळला आहात. 'अमंग द बिलीव्हर्स'मध्येसुद्धा तुम्ही ती चिकित्सा केली आहेच. पुस्तक प्रकाशित करताना धर्मरक्षकांच्या काटेरीपणाचा काही त्रास होईल असे वाटते का?**




काही लोक क्रिटिसाईज करतील मला, परंतु मी फार काळजीपूर्वक त्यातील श्रद्धा ह्या भागाला हाताळले आहे. मी केवळ ऐतिहासिक आणि सामाजिक परिणामांचा विचार केला आहे. अर्थातच सगळ्यांच्याच पुस्तकाची चिकित्सा होतच असते, की ते कसे असायला हवे होते अशी. पण लक्षात घ्या की, हे मतप्रदर्शन करणारे पुस्तक नाहीये. शेवटी पुन्हा मला मीच अलीकडे अधोरेखित केलेल्या मुद्द्यापाशीच यावं लागेल, की पुस्तकात सगळ्यांचं मिळून एकत्रित असं चित्र आहे : मी लिहिलेल्या शोध घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या इतर पुस्तकांत जसं आहे, की माझं पुस्तक प्रवासाविषयी नसून ज्या लोकांमध्ये राहून मी प्रवास केला, त्या लोकांविषयी ते आहे. लोक महत्त्वाचे आहेत. ज्या लोकांना मी भेटलो, त्यांच्याविषयी मी लिहिलंय, त्यांच्या अनुभवांविषयी लिहिलंय, त्या अनुभवांतून मी समाजाविषयी भाष्य करतो आहे. हे एक वैयक्तिक अनुभवांचं पुस्तक आहे, त्यामुळे तुम्ही म्हणता तसा काही दोष त्यातून दिसणार नाही, असे वाटते. तुम्ही असे नाही म्हणू शकणार की, अमूक मजकूर हा एखाद्याला अपायकारक आहे असं. मी वैयक्तिक अनुभवांचं निरीक्षण करून एक पॅटर्न मांडला आहे तिथे. थोडक्यात असं म्हणता येईल की, हे पुस्तक म्हणजे वेगवेगळ्या कथा आहेत. गोष्टी आहेत.

**'अ टर्न इन द साऊथ' किंवा 'अ मिलियन म्युटिनीज नाऊ'मध्ये आहे त्यासारखे?**

होय, अगदी. पण ह्या पुस्तकातील आव्हान वेगळे आहे, कारण शैलीबाबत मी फार काटेकोर आहे, ती आधीच्यासारखी येऊ नये ह्याबाबत. तीस प्रकारची भाष्ये ह्यात येतात आणि ती वेगवेगळ्या पद्धतीने यावीत, असा मी प्रयत्न केला आहे. वाचकांना ते करत असलेले उल्लंघन समजणार नाही, असा तो प्रयत्न आहे. त्या कथा म्हणून वाचल्या जाव्यात, हे मला अपेक्षित नाहीये.

**तुम्ही एखादे पुस्तक हातावेगळे करता, तेव्हा तुमचा निचरा झाला आहे असे वाटते का?**

हो, सगळ्यांचाच होत असावा. ही एक खूप संथ अशी कार्यवाही आहे– पुस्तक संपले की मी थकून गेलेला असतो. आताशा माझ्या डोळ्यांत काहीतरी बिघाड होत चालला आहे. मला असे वाटते आहे की, मी आंधळा होईन. बोटं सुजतात, मला ती टेपमध्ये आवळून ठेवावी लागतात. प्रचंड

मेहनतीची ही फळं आता दिसत आहेत. नंतर काहीही न करता येणारी ती पोकळी येणार आहे. मागील नऊ महिन्यांपासून मी ती अनुभवतो आहे.

**तुम्हांला पुन्हा लेखनप्रवृत्त करेल असं काय घडायला हवं, असं तुम्हांला वाटतं ?**

खरं म्हणजे मी स्वतःच आतून उत्तेजित झालो आहे, मला लिहावेसे वाटते आहे.

**नवं काही आलंय मनात ?**

लांबलचक लेखकीय कारकीर्द घालविणाऱ्या प्रकारातला मी लेखक नाही. बरेचसे लोक मर्यादित अनुभवविश्व असूनही एक पुस्तक लिहितात. मी गद्य लेखक आहे. गद्य लेखकाला अनेक पातळ्यांवर, संवेदना, निरीक्षण, विचार इत्यादी सजग राहावं लागतं. खूप काम असतं ते. बहुतेक लेखकांना आपल्या जगण्याविषयी लहानसे काहीतरी सांगायचे असते. माझी कारकीर्द तसली नाही. मला लिहिण्यासाठी खूप खूप शोधत जावं, असं वाटतं. तितकी शक्ती असती तर मी अधिक काही लिहिले असते; खूप काही आहे, लिहावे असे. पण आता माझ्यात ती ताकद उरली नाही, ती शारीरिक स्थिती राहिली नाही. तुम्हांला माहितीये, शारीरिकदृष्ट्या विकलता आली की दिवसचे दिवस असे वाया जात राहतात.

मी झपाट्याने वृद्धत्वाकडे झुकतो आहे.

ह्या लेखकीय कारकिर्दीला मी माझं खूप काही दिलं आहे. बरं वाटावं म्हणून खूप दिवसांपासून प्रयत्न करतो आहे. जगणं, लिहिणं, विचार करणं तुम्हांला थकवतच असतं.

मला वाटते एवढे पुरेसे झाले का ?

**होय.**

मी उगाचच वेळ वाया घालवला, असं वाटतं का तुम्हांला ?

**अर्थातच नाही, मी नीट विचारले नं प्रश्न ?**

तुम्ही कदर केली माझी.

**तुम्हाला मुलाखती देणं आवडत नाही.**

नाही, कारण की विचार हे मौल्यवान असतात, बोलून आपण ते गमावून बसतो.

❑

(पॅरिस रिव्ह्यू, अंक १४८, सन १९९८ मधील मुलाखतीचा अनुवाद.)



# तत्त्वभान दर्शन




‘वर्णमुद्रा’ प्रकाशित आणि श्रीनिवास हेमाडेलिखित ‘तत्त्वभान’विषयी प्रा. डॉ. सुरेंद्र दरेकर यांनी लिहिलेल्या एकूण दहा परिचय-लेखांपैकी हा चौथा लेख या अंकात देत आहोत.

**मनोज सुरेंद्र पाठक**

## तत्त्वभानच्या निमित्ताने - ४
## प्रज्ञापृथ्वीचा रावो .....!

**म्हणोनि आम्ही आपुलिया स्वेच्छा वोलावों लाहों ।**
**येथ जरी सलगी करू बिहों । तरी निवो कें पां ? ।।** (ज्ञा.अ.९-५)

महाराष्ट्राच्या वैचारिकतेची घडण लक्षात घेता ‘तत्त्वज्ञान जिवंत ठेवण्यासाठी’ (लेखांक ०९, ०९ मे २०१४) हा पुस्तकातील लेख महत्त्वपूर्ण आहे. लेखक श्रीनिवास हेमाडे यांनी या विषयाची प्रस्तुती अतिशय सुगम युक्तिवादाच्या रूपात केलेली दिसून येते. (सुप्रसिद्ध ब्रिटिश तत्त्ववेत्ते बर्नार्ड विल्यम्स

यांच्या ‘Essays and Reviews 1959-2002' प्रकाशन २०१४ निबंध संग्रहातील ‘Why Philosophy needs History' या निबंधावर प्रा. मे. पुं. रेगे यांनी ‘नवभारत’ जुलै १९८० अंकाच्या संपादकीयात या विषयाचे विवेचन केलेले होते.) त्यानुसार इतिहास व तत्त्वज्ञान यातील गतीशील अनुबंध समजून घेणे अगत्याचे असते. तत्त्वज्ञानाचा अभ्यास तत्त्वज्ञान म्हणून करणे व कल्पनांचा इतिहासस्वरूपात करणे यात मूलभूत फरक दिसून येतो. साधारणतः इतिहासाच्या रूढ अभ्यासपद्धतीनुसार एखादा विचार ज्या परिस्थितीत निर्माण झाला, त्या चळवळीचा उद्गाता, पार्श्वभूमी, विश्लेषण युक्तिवाद रूपातील मांडणी, त्याची कालसंगत अनिवार्यता व महत्त्व इत्यादी घटकांधारे ती त्याची केलेली नोंद असते; तर तत्त्वज्ञानाच्या इतिहासात अशा कल्पनांचे परीक्षण करणे त्याची सखोलतेने तर्ककठोर चिकित्सा करणे अभिप्रेत असते.

या प्रकारची काटेकोर तपासणी प्रत्येक कालातील बदललेल्या प्रवर्तित आशयानुसार करायची असते. अशी चिकित्सा झाली तरच तो विचार जिवंत होत समकालीन वैचारिक कक्षेत प्रविष्ट होतो. प्रा रेगे यांनी हे सोळाव्या शतकातील देकार्तचे उदाहरण देत अधोरेखित केले आहे. पुढे ‘असे काटेकोरपणे भारतीय तत्त्वज्ञानाबाबत घडते काय?’ असा रोखठोक सवाल प्रा. रेगे संपादकीयात उपस्थित करतात. या दृष्टीने यातील कर्मसिद्धांत, चातुर्वण्य, मोक्ष पुरुषार्थ, जातिव्यवस्था इत्यादी घटकांची तार्किक चिकित्सा करत त्यांची समकालीन प्रस्तुतता पाहिली तर काय हाती येते, या संबंधातील विवेचन लेखात केले आहे. या संदर्भात राजा राममोहन लोकहितवादी फुले ते कॉम्रेड शरद पाटील, असा व्यापक आढावा घेत भारतीय परंपरा व त्यामागील दर्शनप्रणाली का व कशी इतिहासजमा झाली, याचे विवरण रेगे देतात.

थोडक्यात औपनिषदिक तत्त्वविचार व दर्शने यांचा संकल्पनांचा इतिहास रूपाने अभ्यास करण्यास यापुढेही प्रत्यवाय नसला तरी त्यातील गौतम श्वेतकेतू अक्षपाद कणाद यांना समकालीन तत्त्ववेत्ता म्हणता येईल काय?, असा प्रश्न प्रा. रेगे उपस्थित करतात. या संपादकीयाला ‘वाट पुसत’ प्रस्तुत लेखक श्रीनिवास हेमाडे यांनी चिकित्सक परिप्रेक्ष्यातून या संदर्भातील उत्तरकालीन चित्र मांडलेले आहे. यात प्रा. सुरेंद्र बारलिंगे (बर्नार्ड विल्यम्स व डॉ. सुरेंद्र बारलिंगे या दोघांचे परात्पर गुरू गिल्बर्ट राईल), दि. य. देशपांडे, प्रा. अंतरकर, प्रा.प्रदीप गोखले आदी मराठी महाराष्ट्रीय धरून भारतीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकितांचा उल्लेख त्यांनी केला आहे. तथापी, लेखक याबाबत पुरता समाधानी नसून सद्यकालीन अकादमिक विद्याशाखीय अभ्यास व्यूहरचनेत बर्नार्ड-रेगे या विचाराला समासात ठेवल्याचे मत त्यांनी समारोपात व्यक्त केले आहे.


अर्वाचीन महाराष्ट्रातील वैचारिकतेचा तत्त्वज्ञानीय आढावा रेगे यांनी महाराष्ट्र फाउण्डेशन पुरस्काराला (१९९४) उत्तर देताना केलेल्या भाषणात सविस्तर घेतला आहे. यात ते ज्याला विचारातून तत्त्वज्ञान करणे (doing philosophy or philosophize) या अर्थाचे श्रेय फक्त रानडे व टिळक यांनाच देतात. एक दृष्टिपात (Eye opener) रूपातील ते एकूणच भाषण मुळातून वाचण्यासारखे आहे. या सर्व पार्श्वभूमीवर रेगे यांच्या भूमिकेत अखेरच्या काही वर्षात झालेला बदल (!) व त्यास अनुलक्षून महाराष्ट्रातील वैचारिक वर्तुळातून झालेल्या तीव्र प्रतिक्रिया याचा विचार महत्त्वपूर्ण ठरतो. केवळ त्याचे सूतोवाच म्हणून मे. पुं. रेगे यांच्या ‘विवेकवाद, विज्ञान व श्रद्धा’ या ग्रंथाला वसंत पळशीकर यांनी लिहिलेली या परिवर्तन भूमिकेचा सांगोपांग आढावा घेणारी प्रस्तावना महत्त्वाची ठरते. त्याचप्रमाणे या ग्रंथाचे एका मर्यादेत का होईना दि. य. देशपांडे यांनी ‘आजचा सुधारक’च्या फेब्रु.२००५च्या अंकात

केलेले सडेतोड व सटीक परीक्षणही लक्षात घेणे गरजेचे आहे. प्रा. रेगे यांच्या हयातीतच सुरू झालेल्या या चर्चाविश्वाचा आलेख मांडणारे प्रा. सुनीती देवसंपादित 'मे. पुं. रेगे यांचे तत्त्वज्ञान' हा बृहद्ग्रंथ इत्यादी संदर्भ महत्त्वपूर्ण ठरतात. उदा. सुनीती देव यांच्या ' प्रा. रेगे आणि ईश्वर' या लेखाला प्रतिसाद देताना रेगे म्हणतात, मी स्वाभाविकपणे धार्मिक असलेला माणूस नाही. मी प्रार्थना करीत नाही. पण प्रार्थना करता येत नाही, याचे मला वाईट वाटते. कधीतरी मनोभावे प्रार्थना करण्याची क्षमता मला प्राप्त होईल, ईश्वरनिष्ठांच्या मांदियाळीत कधीतरी प्रवेश मिळेल, अशी आशा आहे.'' तसेच 'परंपरागत श्राद्ध' या लेखात प्रा. रेगे म्हणतात, ''पुढे आईवडिलांच्या श्राद्धाचा प्रश्न आला. तोपर्यंत माझं मन बदललं होतं. मी नास्तिक कधीच नव्हतो. पण आता मी ठाम इहवादीही राहिलो नव्हतो. किंवा इहवादाचा पारलौकिकाशी सुसंगत असा अर्थ लावू लागलो होतो.''

या तऱ्हेचे भूमिकेतील आमूलाग्र परिवर्तन केवळ रेगेच नव्हे तर इतरही काही अग्रणी विचारकांमध्ये काहीशा वेगळ्या अंगाने झालेले आढळून येते. त्या त्या व्यक्तींनी त्याची स्पष्टीकरणे देण्यात कुचराई केली की त्यामागे आणखी काही कारणे संभवतात, या दृष्टीने हा विषय कोणीच फारसा गांभीर्याने घेतला नाही हे नेमके कशाचे सूचक म्हणावे? माझे विवेचन मी कंसात घातले, ते मागे सांगितले तसे विषयाचा पुरक अर्थान्वय म्हणून बाकी काही नाही. 'तत्त्वभान'च्या पुढील खंडात या सर्व मूलगामी गोष्टींचा विचार लेखक श्रीनिवास हेमाडे करतील, या अपेक्षेसह इथे शब्दांना विराम देणे योग्य ठरेल.)

❑

(फोटोसौजन्य : डॉ. रूपा रेगे नित्सुरे यांच्या वॉलवरून साभार)



# पी. विठ्ठल यांची फेसबुक पोस्ट

नैतिक अध:पतन म्हणजे नेमके काय? हे समजून घ्यायचे असेल तर सोबतची बातमी पाहा.



लोकमत

ग्रंथपालाचा कारनामा : पीएच. डी. संशोधकाकडून ५० हजार रुपयांची लाच घेताना मुलगा एसीबीच्या जाळ्यात

## २,६७,५८८ रुपये वेतन, तरी मागितली १० हजारांची लाच

लोकमत विशेष

लोकमत न्यूज नेटवर्क

डॉ. एराज सिद्दीकी (आरोपी ग्रंथपाल)

| | |
|---|---|
| SECTION OF ESTABLISH. | 1 Post of Librarian |
| NAME | E. A. SIDDIQUI |
| CODE | [illegible] |
| | 7 PayCommission |
| PayMPS-CP | Level- 14 |
| BASIC PAY | 1,57,400 |
| REMARKS | |
| OFFCL PAY | 1,57,400 |
| LEAVE SAL | 0 |
| C.L.A. | 120 |
| SPL PAY | 0 |
| ADD HRA | 0 |
| 7PC DA | [illegible] |
| 7PC TA | [illegible] |
| EMPLR CON NPS(14%) | 0 |
| H.R.A. | [illegible] |
| IRA | 0 |
| TOTAL | 2,67,588 |
| GROSS SAL | 2,67,588 |
| GROSS TOT | 2,67,588 |

मुख्य आरोपी असलेल्या एराज सिद्दीकीचे ऑगस्ट महिन्यातील वेतन प्रमाणपत्र.

### २.६७ लाख वेतन तरी पैशांची हाव

### संशोधकांकडून उकळले पैसे

### पहिला हप्ता घेताना...

### मुख्य आरोपी ग्रंथपाल फरार

- डॉ. वाल्मीक सरवदे, प्रकुलगुरू

Hello Chhatrapati Sambhajnagar
Page No. 1 Aug 20, 2024
Powered by: erelego.com

वरिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या एका ग्रंथपालाने पीएच.डी.च्या संशोधक विद्यार्थ्यांकडून सुमारे पाच लाख रुपयांची लाच मागितली. या लाचेतील पहिला पन्नास हजार रुपयांचा हप्ता ग्रंथपालाच्या वकील मुलाने स्वीकारला. ही लाच घेताना अँटिकरप्शन ब्यूरोने तीन जणांना अटक केली. 'महाज्योती'ची फेलोशिप मिळणाऱ्या आपल्याच विद्यार्थ्याकडून दरमहा दहा हजार रुपये आपण घ्यावेत, असे या गाईडला का वाटले असावे?

देशभरात अशा सुमार आणि भ्रष्ट मार्गदर्शकांचा सध्या सुळसुळाट झालेला आहे. कधीतरी एखादे दुसरे नाव असे समोर येते. विद्यार्थ्यांकडून लाच घेण्याची प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे. पीएच.डी.ची मौखिक परीक्षा (Viva) हा तर स्वतंत्र चर्चेचा विषय ठरावा. बहिस्थ परीक्षकांच्या आगमनापासून ते त्याच्या प्रस्थानापर्यंत विद्यार्थ्यांना किती दिव्य कसरती कराव्या लागतात, हे न सांगितलेले बरे. हॉटेल, जेवण, मानधन, भेटवस्तू, सत्कार, पर्यटन या सगळ्या गोष्टीची पूर्तता केल्यानंतर 'डॉ.' म्हणून मिरवणारे विद्यार्थी आणि त्यांचा व्हायवा घेणारे ज्ञानी (?) परीक्षक हे एक भयंकर विकृत चित्र सध्या पाहायला मिळत आहे. 'प्रोग्रेस रिपोर्टवर सही हवी असेल तर येताना दोन पार्कर पेन घेऊन ये ' असा आदेश देणारे जसे गाईड आहेत, तसेच 'पाच-पन्नास किलो गहू, ज्वारी घरी आणून दे' असे म्हणणारेही आहेत. (अर्थात प्रत्येक वेळी मार्गदर्शकच दोषी असतो असे नाही, तर काही विद्यार्थीही भ्रष्ट मार्गाचा अवलंब करतात.)

अर्थात या विषयाच्या खूप खोलात शिरलो तर प्रचंड घाण निघण्याचीच शक्यता जास्त आहे. पण एक लक्षात घ्या, 'आपण म्हणजे कुणी अफाट महाज्ञानी, व्यासंगी विद्वान आहोत' या अहंकारात बुडालेली सुमार माणसे मुळात भ्रष्ट वृत्तीचीच असतात. 'गाईड' ही संशोधनासाठी केलेली एक तांत्रिक सोय असते. विद्यार्थ्यांनी आपल्या मार्गदर्शकांशी चर्चा करून निवडलेल्या विषयाच्या अनुषंगाने संशोधनकार्य वेळेत पूर्ण करावे, हा त्यामागचा उद्देश असतो. अशावेळी संशोधन केंद्र किंवा विद्यापीठाकडे वेगवेगळ्या कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. वेळोवेळी प्रगती अहवाल वगैरे सादर करावे लागतात. यासाठी गाईडची सही आणि शिक्का आवश्यक असतो. किंबहुना त्याशिवाय पुढे काहीच घडत नाही. नेमका याच गोष्टीचा फायदा 'मार्गदर्शक/ प्राध्यापक' घेतात.

विद्यार्थ्यांना सही देण्यास टाळाटाळ करणे, भेट नाकारणे, वेगवेगळ्या अटी घालून देणे, वारंवार चकरा मारायला लावणे, त्यांचे आर्थिक आणि शारीरिक, मानसिक शोषण करणे (स्त्री संशोधकांना येणारे अनुभव आणखी भयंकर असतात.) मागच्या काही वर्षांत शासनाकडून वेगवेगळ्या प्रकारच्या शिष्यवृत्ती दिल्या जातात. संशोधकांना दरमहा मोठी रक्कम मिळते. ही रक्कम पाहून अनेक प्राध्यापकांना (स्वतःला प्रचंड पगार असूनही) विद्यार्थ्यांकडून पैसे किंवा भेटवस्तू घेण्याचा मोह होतो.

अर्थात अशा 'विकृत आणि भ्रष्ट' प्राध्यापकांची संख्या अगदीच नगण्य असते. पण दुर्दैवाने हे 'नगण्यच' समग्र शिक्षणक्षेत्राचे भ्रष्ट चित्र तयार करायला हातभार लावतात. आणि त्यामुळे एकूणच संशोधनावर प्रश्नचिन्ह तयार होते. मागे एका शासकीय बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'पीएच.डी. करून काय दिवे लावणार?' असा खोचक प्रश्न विचारला होता. त्यावेळी अनेकांनी त्यांना धारेवर धरले होते; पण त्यांच्या बोलण्यात जराही 'तथ्य' नव्हते, असे तरी कसे म्हणता येईल?

शिक्षक म्हणून, मार्गदर्शक म्हणून नैतिकता गमावून बसलेल्या माणसांची संख्या अशीच वाढत गेली तर निरुपयोगी 'प्रबंधांनीच' ग्रंथालये भरलेली दिसतील. असो.

(वरील प्रकरणातील विद्यार्थ्याने पोलिसांकडे तक्रार करण्याचे धाडस दाखवले म्हणून या

‘अपप्रवृत्तीचा’ एक अभद्र चेहरा समोर तरी आला. असे किती चेहरे असतील? )

**पी. विठ्ठल**

**बन्सी सातपुते :** सर, महाविद्यालयाचे २० मार्क्स देण्यासाठी प्राध्यापक विद्यार्थिनींकडे शरीरसुखाची मागणी करतात.

**आशा पैठणे :** अरे बापरे! हे भयंकर आहे..!!!

माझ्या माहितीतले एक जण विद्यार्थ्यांकडे प्रवासाकरता गाडीची व्यवस्था करा.. दारू पाजवा.. बायकोसाठी दागिने.. महागडे कपडे मागत.. पण..

**कदम अजय :** त्या संशोधक विद्यार्थ्याला शिक्षणाचा खरा अर्थ समजला आहे. त्याला मानाचा नमस्कार आणि लायकी नसलेल्या अशा लोकांना शिक्षा काही होत नाही.. विद्यापीठांमध्ये असे फालतू लोक काय कमी नाहीत.. पुन्हा त्यांचा सत्कार होतो. सेवेत रूजू होतात काळजी नसावी सर. या डॉ. नावाचं वलय आणि प्रा. होण्याचं स्वप्न दोन्हीचा अंत जवळ आला आहे.. हे थांबणार आहे सर्व.

**प्रशांत आरवे :** इतकी भिकारचोट वृत्ती रगड पैसा मिळविणाऱ्यांत कुठून येत असेल? प्री-सबमिशन व्हायवाला येणारे Professor दर्जाचे लोक महाविद्यालयाने प्रवासखर्च दिल्यावरदेखील विद्यार्थ्याला पाकीट, जेवण मागतात.... हे इतके भिकारचोटपणा का करीत असतील????

**अविनाश गायकवाड :** अतिशय वाईट! सुदैवाने आपल्या भागात अशा व्यक्ती पाहण्यात आलेल्या नाहीत याचं समाधान आहे.

**सुरेश जोंधळे :** आपण कुठल्या भागात राहणारे आहात, सर?

**नितीन बोरसे :** Avinash Gaikwad खोटं आहे, ही युनिव्हर्सल कीड आहे.

**आरतीश्यामल जोशी :** बहुतांश प्राध्यापकांनी नैतिकतेची वाट लावली आहे. एक तोळा सोनं माझ्या नावाच्या पावतीने आण, असे आदेश देणारे प्राध्यापक ही मला माहिती आहेत. मुळात यांना विद्यार्थी का पोसतात, हाच प्रश्न पडतो. आणि दुसऱ्या बाजूला सर, फेलोशिपची रक्कम पाहा, खरंच सांगा महिना इतक्या रक्कमची गरज असते का? सरकारचा मला हा दुष्ट हेतू वाटतो. विद्यार्थांना फेलोशिप देऊन अपंग करायचे, उमेदीचे वर्ष वाया घालवायचे... हे पैसे संपले की विद्यार्थी हतबल होतो, नोकरी मिळत नाही, फुकट पैसा मिळतो, तोवर मजा करायची, नंतर काय... फेलोशिप मिळालेली मुलं नंतर काय करतात याचे संशोधन व्हावे. एक फेलोशिप झाली की दुसरी... आणि रद्दी संशोधन असतं. किती मुलांना आपल्या संशोधनावर बोलता येते. खूप डबकं झालं आहे. सगळं साफ करायची एक मोहीम असावी असं वाटतं आणि दुःख ही होतं की, व्यवस्थेचा दुरुपयोग पाहून.

**प्रशांत आरवे :** रवीन्द्र दामोदर लाखे, विद्यापीठात मुली एम.ए. ला आल्या की त्या पीएच.डी.ला Guide म्हणून आपल्या वाट्याला याव्या, यासाठी प्रयत्न करणारे महाभाग आहेत. सुंदर मुली Research scholar म्हणून आपल्यालाच मिळाव्या, यासाठी प्रयत्न चालतो...या स्थितीला नेऊन ठेवलंय आपण शिक्षण... असल्या लोकांपेक्षा खुलेआम भडवेगिरी करणारा दल्ला परवडला, किमान उजळ माथ्याने तो मिरवीत तरी नाही.

**डॉ. प्रकाश खेत्री :** वास्तव, सर..

अनेक नावाजलेले साहित्यिकही अशा प्रकारचा गोरखधंदा करत आहेत... अद्याप उघडकीस

आले नाहीत.

**प्रशांत आरवे :** अ.भा साहित्य संमेलनाचे एक अध्यक्ष असेच एका नवोदित कवयित्रीसोबत हॉटेलात सापडले.

**सुधाकर शेलार :** या संदर्भात आम्ही आमच्या पुस्तकात मागेच इशारा देऊन ठेवला आहे! (साहित्य संशोधन : वाटा आणि वळणे, सुधाकर शेलार, अक्षर वाङ्मय प्रकाशन पुणे, तिसरी आवृत्ती १ मे २०२४ पृष्ठ १७३.)

**विष्णू चव्हाण :** सर, तुमच्या लेखामुळे अशा भिकारी वृत्तीचे प्राध्यापक थोडे फार जरी सुधरले तरी बऱ्याच संशोधक विद्यार्थ्यांवरील आर्थिक ताण नक्कीच कमी होईल. वास्तव लेखन केल्यामुळे तुमचे आभार, असं वास्तव लिहिण्याची हिम्मत फार कमी लेखक करतात.

**नूतन कुमार पाटणी :** Ph.D. च्या मौखिक परीक्षेला काही पर्याय उपलब्ध नाही का... असा एक प्रश्न पडला...

- मौखिक परीक्षेची खरंच गरज आहे काय? असल्यास त्याची गरज कितपत असावी?
- मौखिक परीक्षेसाठी बाह्य विद्यापीठातील तज्ज्ञ यांना पाचारण करणे शक्य आहे काय?
- Ph.D. सारख्या शास्त्रीय आधार असलेल्या परीक्षेसाठी, एकाच शिक्षकाऐवजी दोन शिक्षकांची नेमणूक करणे शक्य नाही काय?
- Ph.D. च्या विद्यार्थ्यांना, आठवड्यातून एकदा तरी मंचावरून आपले मत मांडून, दिलेल्या विषयावर डिबेट करता येईल, असे वक्तृत्व विकसित करण्यासाठी प्रयत्न करावेत.
- तद्वतच, मौखिक परीक्षाच रद्द करण्याविषयी विचार व्हावा.
- तसेच, मौखिक परीक्षेस साजेसे असे ५० मार्कांची प्रश्नपत्रिका अस्तित्वात आणता येते का?
- प्रत्येक प्रश्न एक मार्काचा असावा.
- हो किंवा नाही, असेच त्याचे स्वरूप असावे.
- ५० प्रश्न, ५० मिनिटे
- आपले मत कळवावे. असो

**श्रीधर खांदापूरकर :** खरं तर त्या विद्यार्थ्याचा जाहीर सत्कार केला पाहिजे, ज्याने आपली व्यथा समाजासमोर मांडलेली आहे.

**बापू सोनवणे :** सर, आपल्या लेखणीत धार आहे. वास्तव मांडण्याचं धाडस करणारे समाजहितदक्ष विरळेच आहेत. आपल्या लेखणीस आणखी बळ मिळो. एक सकारात्मक चळवळ शिक्षणक्षेत्रात सुरू व्हायला हवी, ज्याद्वारे सर्व नकारात्मक बाबींचा नायनाट व्हावा. अनेक शुभेच्छांसह....

**प्रमोदकुमार दौंड :** बहुतेक Ph.D. करणाऱ्या सर्वांचाच यासारखा अनुभव आहे. फक्त काय कुठे नादी लागता, आपले काम होणे महत्त्वाचे असते. या प्रवृत्तीने सर्व शांत बसतात. थोडक्यात पकडले तर चोर अन्यथा शिरजोर अशीच अवस्था सर्वत्र आहे. यामुळे Ph.D. इच्छा असूनही बरेचजण करण्याचे टाळतात. काहींना Ph.D. करणे आवश्यकच असते. त्याचाच गैरफायदा गाईड घेत असतात. असो, बात निकलेगी तो फिर दूर तलक जाएगी....

**सुमित गुणवंत :** फेलोशिप मंजूर होण्यासाठी अधिकाऱ्याला, Ph.D. पूर्ण करण्यासाठी गाईडला,

आणि नोकरी मिळवण्यासाठी संस्थेपासून तर जिथं जिथं शक्य होईल तिथं तिथं मोकळ्या हाताने द्यावेच लागते. आणि असा देत देत गाईड झालेला प्राध्यापक पुन्हा तेच चक्र सुरू करतो.. इथून तिथून सारेच भ्रष्ट आहेत.. आणि यात विशेष म्हणजे प्रतिष्ठित वाटणारे-दिसणारे लोक जास्त पुढे आहेत. सगळ्याच क्षेत्रात..

**रवींद्र बनकर :** शिक्षणाचा बट्ट्याबोळ चालू आहे सगळा..., येणारा काळ आणखी अवघड आहे...एकीकडे धनाढ्य लोक खोकी देऊन भरती होताहेत तर दुसरीकडे शिकलेल्या, पात्र विद्यार्थ्यांचा दररोज लोंढा तयार होतोय... काळ सोकावतो आहे, कुणाचा तरी बळी द्यावा किंवा घ्यावा लागणार आहे क्रांतीसाठी... नुसतेच मूक मोर्चे काढून कुणी ऐकत नसतंय.

**शिवशंकर घुमरे :** फार गंभीर बाब आहे. या प्रवृत्तीचा मी जाहीर निषेध करतो. या गाईडच्या संदर्भात या अगोदरही विद्यापीठात तक्रारी केल्या होत्या. परंतु विद्यापीठाने याकडे दुर्लक्ष केले. तक्रारदार विद्यार्थ्यांचे अभिनंदन.

**हेमंत खडके :** आपण सर्वच भयंकराच्या दारात उभे आहोत.

❑





**खट्टरकाकांचे विनोद-आख्यान**

**हरिमोहन झा**

**अनुवाद : वसंत केशव पाटील**

**किंमत : ₹ ४२४/-**

**सवलतीत ₹ ३५०/- ला पोस्टेजसह घरपोच मिळेल.**

**संपर्क : वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स, शेगाव, जिल्हा बुलढाणा**
**९९२३७२४५५०**
**नमूद केलेला मोबाईल नंबर ९९२३७२४५५० हाच व्हॉटसअॅप नंबर आहे, पत्ता त्यावरच कळवता येईल.**

**अकाउंट डिटेल्स :**
VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK

**किंवा**



## । वर्णमुद्रा पब्लिशर्स ।

**(वर्णमुद्राची अलीकडची प्रकाशित २५ पुस्तके)**

६०) झुरळ आणि इतर काहीबाही, प्रमोदकुमार अणेराव, ३२४/-,
६१) अभिजात, शैलेंद्र मेहता, ५२५/-, निबंध
६२) जगणं वाचणं, डॉ. राजेंद्र मलोसे, ४४४/-, कादंबरी
६३) हजार रक्तवर्णी सूर्य, राही डहाके, २४२/-, कविता
६४) जगावेगळी जीवने, शिरीष चिंधडे, ३२४/-, निबंध
६५) केवळ काही वाक्यं, उदयन वाजपेयी, अनुवाद : प्रफुल्ल शिलेदार, ३०४/-, कविता
६६) तरंगत तरंगत जाऊ घरंगळत, हेमंत गोविंद जोगळेकर, २२४/- कविता
६७) अश्वत्थयुग्मांचे श्लोक, संतोष विठ्ठल घसिंग, ५७५/-, कविता
६८) दुराव्याची धूळ व्यापून, बाळकृष्ण सोनवणे, २५०/- कविता
६९) अपरंपारावरच्या कविता, रवींद्र लाखे, ३०४/-, कविता
७०) तत्त्वभान, श्रीनिवास हेमाडे, ६८०/-, निबंध
७१) गनिमी काव्याचे नमुने, विश्वास कणेकर, ३००/-, कविता
७२) पेसोआच्या कविता, महेश्वर लव्हेकर, ४२४/-, कविता
७३) वुहानचा वाफारा, विजय तांबे, ४२४/-, कथासंग्रह
७४) सृजनस्रोत, शिरीष चिंधडे, ४२४/-, ओळखपर लेख
७५) सगळेच पर्याय संपले आहेत, उषा हिंगोणेकर, ३७५/-, कविता
७६) काळोखाचा राजपुत्र, सुप्रिया आवारे, ३००/-, समीक्षा
७७) सायलेंट आणि इतर कविता, सागर अचलकर, १५०/-, कविता
७८) असीम प्रदेश, मुग्धा देशपांडे, १५०/-, कविता
७९) खट्टरकाकांचे विनोद-आख्यान, हरिमोहन झा, अनुवाद : वसंत पाटील, ४२४/-, लेख
८०) गळ्यावरचा निळा डाग, सुनंदा भोसेकर, २५०/- कविता
८१) आधार, पंकज कुरुलकर, ६५०/-, कथा
८२) समाधानांचे निराकरण, प्रकाश हरी कार्लेकर, ६५०/-, कविता

---

**मुख्य वितरक :** वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स शेगाव, जिल्हा बुलढाणा मो. : ९९२३७२४५५०

**उपवितरक :** १) पुस्तकवाला ॲण्ड कंपनी, पुणे मो. : ८६२४९७७०२९
२) मैत्री पब्लिकेशन, पुणे मो. : ९६५७२४०८२४
३) वाल्डन बुक स्टोअर, पुणे मो. : ९७६६९७५१६५
४) बुककट्टा अमरावती, मो. : ८३७८८९५९१६


**मुख्य कार्यालय :** वर्णमुद्रा पब्लिशर्स, पृथक, रामकृष्णनगर, शेगाव, जिल्हा बुलडाणा ४४४ २०३

**E mail :** varnamudra.editors@gmail.com Website : www.varnamudra.com Mo. : 9923724550


# अलीकडे प्रकाशित झालेली पुस्तके




४२४/- लेख




१५०/- कविता




६५०/- कविता




६५०/- कथा

वर्णमुद्रा इ-जर्नल सप्टेंबर-ऑक्टोबर २०२४ हा अंक मालक, मुद्रक व प्रकाशक मनोज सुरेंद्र पाठक यांनी
वर्णमुद्राच्या वेबसाईटवर प्रकाशित केला असून, अंकाची मुद्रित प्रत
। पृथक । रामकृष्ण सोसायटी, एसबीआय कॉलनी, शेगाव, जिल्हा बुलढाणा - ४४४२०३ येथून केवळ खाजगी वितरणासाठी प्रकाशित केली.
ईमेल : varnamudra.editors@gmail.com वेबसाईट : http://www.varnamudra.com/

मुख्य वितरक
वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स, शेगाव, मोबाईल नंबर : ९९२३७२४५५०
वर्णमुद्राचे उपवितरक
पुस्तकवाला ॲण्ड कंपनी, पुणे मोबाईल नंबर : ८६२४९७७०२९
वाल्डन बुक स्टोअर, पुणे मोबाईल नंबर : ९७६६९७५१६५
मैत्री पब्लिकेशन, पुणे मोबाईल नंबर : ९६५७२४०८२४
बुककट्टा, अमरावती मोबाईल नंबर : ८३७८८९५९१६